रचना



गणेशोत्सव विशेषांक २०२४

Counseling, Mental Health And Treatment, Psychiatric

HORIZONS BEHAVIORAL HEALTH PROFESSIONAL SERVICES, LLC

What We Do

Horizons is an outpatient behavioral health facility, serving McHenry County residents of all ages with a diagnosis of mental illness. Services include psychiatric diagnostic evaluations along with medication management and therapeutic injections, psychotherapy, family therapy, group therapy, and psychological testing.

Who We Serve

Child, Adolescent and Adult

+815-455-7100

500 Coventry Ln, #205, Crystal Lake, IL 60014

VISIT OUR WEBSITE:
HTTPS://WWW.HORIZONSBH.COM/



संपादकीय

प्रिय वाचक हो,
नमस्कार!
'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या' अशा आपल्या दरवर्षीच्या विनंतीला मान देत यावर्षी लवकरच गणरायाचे आगमन झाले आणि सगळ्यांची एकच धांदल उडाली. सोळा कला आणि चौसष्ट विद्यांचा हा अधिपती, बुद्धीची देवता, अगदी वेदांमध्ये, गणेश पुराण, मुद्गल पुराणांमध्ये ज्याचे उल्लेख आढळतात, असा हा भारदस्त देव. तरीही सगळ्याना हवाहवासा वाटणारा अतिथी म्हणजे गणपती बाप्पाच!

त्याचं यथोचित स्वागत व्हावं म्हणून लहानांपासून मोठ्यांपर्यंत नेहमीप्रमाणे सगळे उत्साहात कामाला लागले. मखर, सजावट,आरत्या,प्रसाद, ढोलताशा सज्ज झाले आणि अखेरीस वाजत गाजत गणरायाचे आगमन झाले. हे सगळे नेहमीचेच. परंतु दरवर्षी नवा आनंद देते.
यावर्षीचा गणेशोत्सवही असाच वैशिष्टयपूर्ण ठरला. मायभूमीपासून हजारो मैल दूर आलेल्या शिकागोमधील मराठी माणसाला आपला हा खास उत्सव साजरा करताना कसलीही उणीव भासू नये याची विशेष काळजी घेत शिकागो महाराष्ट्र मंडळाने मोठ्या दणक्यात गणेशोत्सव साजरा केला.

'रचना' ने ही गणेशोत्सवानिमित्त काही अभिनव उपक्रम राबवले, मुलांसाठी बाप्पाचं चित्र काढण्याची स्पर्धा आम्ही आयोजित केली होती. खरं तर गणपती हे असं दैवत आहे, त्याची मूर्ती रेखाटण्याची इच्छा प्रत्येक मराठी माणसाला कधी न कधी होतेच. कित्येक मोठमोठ्या चित्रकारांनीही गणपतीच्या आकर्षक रूपाची असंख्य रेखाचित्रं काढली आहेत, अजूनही दर वर्षी कुठे न कुठे गणेशाच्या रेखाचित्रांचे प्रदर्शन भरत असते. आम्ही आयोजित केलेल्या या स्पर्धेतील चित्रं पाहताना चिमुकल्या हातांनाही गणेशाचे रूप किती सुंदर रेखाटता येते, त्या चित्रातील मूर्ती किती भाव प्रकट करते, हे प्रत्ययाला आले. दुसरा उपक्रम म्हणजे 'सेल्फी विथ बाप्पा!' शिकागोच्या मराठी कुटुंबांनी बाप्पाचे कसे स्वागत केले, हे दाखवणारे अत्यंत सुंदर फोटो! या अंकात स्पर्धेतील चित्रं आणि बाप्पाबरोबरचे मराठी कुटुंबांचे फोटो तुम्हाला पाहायला मिळणार आहेत. या दोन्ही उपक्रमांना तुम्ही सर्वांनी भरघोस प्रतिसाद दिला त्याबद्दल तुम्हा सर्वांचे आभार मानावे तेवढे थोडेच.

‘रचना’च्या इतर अंकांप्रमाणेच याही अंकात उत्तमोत्तम साहित्याची रेलचेल आहेच. सुप्रसिद्ध लेखक विभूतिभूषण बंद्योपाध्याय यांची प्रा. विलास गिते यांनी बंगालीतून अनुवादित केलेली भयकथा वाचताना तुम्हाला निश्चितच एक थरार जाणवेल. शिकागोतले आमचे स्थानिक लेखक रश्मी चाफेकर, मंजिरी बर्वे, उमाताई दिघे, डॉ. चंद्रा वेदक, नीलाताई जोशी, शिल्पा देशपांडे, श्रद्धा भट, अश्विनी कुंटे, माधवदादा गोगावले, राजीव गोखले, श्रीदत्त राऊत, मीनाक्षी हेडाऊ, अलका धाराशिवकर, तरुण पिढीची प्रतिनिधी महिका देशपांडे यांचे ललित आणि वैचारिक साहित्य, आणि सर्वांना आवडणारी ‘रचना’ची वैचारिक, माहितीपूर्ण त्याचबरोबर रंजक, खुसखुशीत सदरे. ‘पाककृती’, ‘शब्दकोडे’, ‘तनमनाचा भोवरा’, ‘सुख म्हणजे सुखरूपता’, ‘सोशल एन्साइटी डिसऑर्डर’, शब्दांच्या व्युत्पत्तीविषयी खुसखुशीत चर्चा करणारे सदर ‘गंमत शब्दांची’, असा भरगच्च, रंजक आणि बुद्धीला चालना देणारा मजकूर या अंकात वाचायला मिळेल.मंडळाच्या विविध उपक्रमांचे वृत्तान्तही तुम्हाला वाचायला मिळतील.

मंडळी, जीवन हा ऊनसावलीचा खेळ आहे, असे आपण नेहमी म्हणतो.या सर्व आनंददायक उपक्रमांबरोबरच एक दुःखद घटनाही जड अंतःकरणाने सांगायची वेळ आलेली आहे, ती म्हणजे मंडळाच्या अध्यात्मपीठावर श्रीमद्भगवद्गीतेचे अत्यंत सुबोध असे निरूपण आपणा सर्वांना ज्या वत्सल मूर्तीकडून ऐकायला मिळाले, ज्यांनी आम्हा सामान्यांसाठी गीता अगदी सोपी, सुलभ केली त्या मा. रजनीताई पटवारी यांचे अलीकडेच दुःखद निधन झाले. ‘रचना’तर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली! या अंकात रजनीताईंना मानवंदना देणारा उमाताई दिघे यांचा लेख आणि नीलाताई जोशी यांची हृदयस्पर्शी कविता वाचून आपले डोळे पाणावल्यावाचून राहाणार नाहीत.

मंडळी, गणेशोत्सव म्हणजे आनंदाचा उत्सव, सृजनाचा उत्सव! सर्जन आणि विसर्जन हा सृष्टीचा नियम याची जाणीव करून देणारा उत्सव! हा उत्सव सर्वांना रिद्धी, सिद्धी आणि बुद्धीचे दान देणारा ठरावा, हीच शुभेच्छा!

आपले नम्र,
संपादक ‘रचना’



सुजाता महाजन



शिल्पा देशपांडे

अध्यक्षीय

नमस्कार मंडळी,

'रचना'च्या गणपती विशेषांकानिमित्त आपल्या सर्वांशी संवाद साधतांना मला आनंद होतो आहे. बघता बघता उन्हाळा संपत आलाही. उष्मा थोडा कमी होत चालला आहे. लवकरच फॉल येईल आणि निसर्गाचा कॅनव्हास अतिशय आकर्षक आणि उठावदार रंगांनी सजवेल. त्या पार्श्वभूमीवर मंडळाचे वेगवेगळे रंगतदार कार्यक्रम आम्ही घेऊन येणार आहोतच.

पण त्यापूर्वी मला आतापर्यंत झालेल्या कार्यक्रमांचा थोडक्यात आढावा घेऊन मंडळाच्या कार्यकारिणीच्या, आणि स्वयंसेवकांच्या कामाचा, कलाकारांच्या सादरीकरणाचा आणि आपल्या सर्वांच्या सहभागाचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करावासा वाटतो आहे. प्रत्येकाचाच नावाने उल्लेख जरी शक्य नसला, तरी सर्वांच्याच उत्साही सहभागाबद्दल, त्यांनी दिलेल्या छोट्या,मोठया योगदानाबद्दल मी आणि MMC कार्यकारिणी आभारी आहोत. मंडळाने जे काही चांगलं कार्य आतापर्यंत केलं आहे, त्याचा रास्त अभिमान आम्हाला आहे.

दरवर्षी उन्हाळा आला, की मंडळाची पिकनिक हे खास आकर्षण असतेच. वेगवेगळे गेम्स, चमचमीत मेनू यामुळे या कार्यक्रमात खूप धमाल येते. यावेळी पिकनिकसाठी नव्वदीच्या दशकातली रेट्रो थीम ठरवली होती. त्या काळातील पोशाख सर्वांनी परिधान केला होता. कराओके, गाणी, ढोल ताशा ,नाच आणि वेगवेगळे गेम्स यामुळे हा कार्यक्रम खूप रंगला. हिरव्यागार निसर्गाच्या पार्श्वभूमीवर 'साहित्यकट्टा'चा कार्यक्रम खास रंगला. सभासदांनी कविता, कथा, लेख सादर केले. यावेळी 'साहित्यकट्टा'च्या आयोजक आणि 'रचना'च्या संपादक सुजाताताई भारतात परत जाणार म्हणून सभासदांनी त्यांना शुभेच्छा व भावपूर्ण निरोप दिला. त्या जरी भारतात असल्या तरी सर्व कार्यभार तिथून चालवत राहणार आहेत हा दिलासा होता पण प्रत्यक्ष भेट होऊ शकणार नाही म्हणून कित्येकांनी हळहळ व्यक्त केली.

पाच किलोमीटर मॅरेथॉनचे हे तिसरे वर्ष होते. प्रचंड संख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम सर्वांनी यशस्वी केला. या कार्यक्रमातून जो निधी जमा झाला तो श्री. यजुर्वेन्द्र महाजन यांच्या 'दीपस्तंभ मनोबल' या उपक्रमाला देणगी म्हणून देण्यात आला. सामाजिक बांधिलकीची जाण यावर्षीची कार्यकारिणी अनेकविध मार्गाने जपते आहे याचेच, हे एक उदाहरण म्हणता येईल. मराठी संस्कृती जपतांना परंपरा, सणवार साजरे करणे आवश्यक आहेच, पण त्याबरोबर महाराष्ट्रात, भारतात सुरू असलेले चांगले सामाजिक उपक्रम तसेच काही निःस्वार्थी व्यक्ती निरपेक्षपणे कुठले कार्य करत असतील, तर त्याची माहिती इथे राहणाऱ्यांना होणे खूप आवश्यक असते. त्यांच्या कार्यामुळे इतर लोकही प्रेरित होऊन अशा कार्यात आपापल्या परीने मदत करू शकतात.

डॉ. शेखर भोजराज गेली तीस वर्ष भारतातल्या दुर्गम आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या भागात पाठीच्या मणक्यांच्या व्याधीसाठी उपचार केंद्रे चालवत आहेत. त्यांच्या या प्रेरणादायी कार्याबद्दल आणि त्यांच्या 'द स्पाईन फाउंडेशन' या संस्थेबद्दल आपल्याला त्यांच्याकडूनच ऐकायचे भाग्य लाभले होते. त्यांच्या व्याख्यानाने कितीतरी लोकांना या कार्यात जमेल तशी मदत करण्याची प्रेरणा मिळाली.

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने भारत सरकारच्या कॉन्सुलेट जनरल (CGI) ऑफिस, इंडिया हब आणि फेडरेशन ऑफ इंडिया असोसिएशन (FIA) यांच्या पुढाकाराने विविध ठिकाणी भव्य परेड आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांमध्ये महाराष्ट्र मंडळ शिकागो (MMC) च्या स्वयंसेवकांनी उत्साहपूर्ण सहभाग नोंदवला.

मंडळाच्या ढोल-ताशा व ध्वज पथकाने परेडमध्ये मराठमोळ्या जोशात गगनभेदी वादन व घोषणा करून संपूर्ण परिसर दणाणून टाकला. पारंपरिक मराठी गणवेशातील उत्साही वादक आणि तिरंग्याच्या रंगात सजलेले पथक — या सर्वांनी अमेरिकन भूमीवर भारतीयतेचा आणि मराठी संस्कृतीचा अद्भुत संगम घडवला. परेडदरम्यान ‘भारत माता की जय’ आणि 'वन्दे मातरम्’च्या घोषणा गुंजल्या. प्रेक्षकांनी मंडळाच्या सादरीकरणाला प्रचंड प्रतिसाद देत उत्स्फूर्त टाळ्यांचा वर्षाव केला. मंडळाच्या प्रतिनिधींनी भारतीय दूतावास आणि इतर संस्थांच्या प्रतिनिधींना भेट देऊन शुभेच्छा व्यक्त केल्या.

या उपक्रमांद्वारे मंडळाने समाजातील विविध संस्थांशी संवाद वाढवण्याचे आणि भारतीय तसेच मराठी संस्कृतीचा प्रसार करण्याचे कार्य यशस्वीपणे साध्य केले. स्वयंसेवकांच्या अथक परिश्रमांमुळे आणि एकत्रित प्रयत्नांमुळे महाराष्ट्र मंडळ शिकागोने पुन्हा एकदा आपल्या ‘एकता, संस्कृती आणि समाजसेवा’ या मूलमंत्राला उजाळा दिला.

जल्लोषात एकत्र साजरा करावा तर गणपती उत्सवासारखा सण नाही. महाराष्ट्र असो की महाराष्ट्र मंडळ शिकागो, गणपती उत्सवात उत्तम सजावट, ढोल ताशा, आणि सांस्कृतिक कार्यक्रम याला तोड नसतेच. याही वेळी सजावट टीमने गौरी आणि गणपतीची छान सजावट मांडली होती. सर्व कार्यक्रम त्यांच्या साक्षीने पार पडला. सुग्रास भोजन, स्थानिक कलाकारांचे कलाविष्कार याच बरोबर 'कालाय तस्मै नमः' ही एकांकिका फिलाडेल्फिया महाराष्ट्र मंडळाने यावेळी सादर केली. सरतेशेवटी गणपतीची ढोल ताशासकट मिरवणूक निघाली आणि जड अंतःकरणाने सर्वांनी गणपतीचं विसर्जन केलं गेलं. अनेक स्वयंसेवकांनी या कार्यक्रमात मोलाची मदत केली.

आपल्या नवीन पिढीला आपल्या संस्कृतीतल्या चांगल्या गोष्टी आत्मसात करता याव्यात म्हणून आपण सांस्कृतिक कार्यक्रम आणि इतरही कल्पक कार्यक्रम आयोजित करत असतो.

त्यांच्यासाठी म्हणून खास असे कार्यक्रम यावर्षी आम्हाला घेता आले. आपल्या छोट्या सभासदांनी अगदी उत्साहाने आणि आनंदाने या वेगळ्या उपक्रमांना प्रतिसाद दिला. श्री.यश हटकर यांनी चित्रकला कार्यशाळा घेतली. सौम्या सुभाष यांनी गणपती तयार करण्याची कार्यशाळा घेतली. आणि नुकताच सेवा या संस्थेने '९/११ कम्युनिटी सर्व्हिस इव्हेंट आयोजित केला होता त्यात मंडळाच्या कार्यकारिणी आणि सभासदांबरोबरच मराठी शाळेच्या विद्यार्थ्यांनीसुद्धा उत्साहाने भाग घेतला. नवीन पिढीसमोर चांगल्या कार्याचा आदर्श ठेवण्याची संधी यामुळे आम्हाला मिळाली.

आपली संस्कृती, सणवार परदेशात जपता यावेत, म्हणून मंडळ वेगवेगळे कार्यक्रम आयोजित करत असते. मंगळागौरीचा कार्यक्रम हा तसाच एक कार्यक्रम. यावेळी मंगळागौरीची नवदाम्पत्याकडून पूजा झाली, उखाणे, गाणी मनसोक्त खेळले गेलेले खेळ यामुळे हा कार्यक्रम सर्व स्त्रियांना आणि मुलींना अत्यंत आवडला. या निमित्ताने नवीन पिढीतील मुलींना पारंपरिक खेळातील मजा अनुभवता आली.

यावर्षी 'आम्ही सारे गवय्ये' तर्फे आयोजित केलेल्या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद लाभला. कित्येक नव्याने मंडळाचे सदस्यत्व घेतलेल्या मंडळींनी यात उत्साहाने भाग घेतला होता. नव्वदीच्या दशकानंतरची गाणी अशी थीम होती. यावेळी लहान मुलांनी अगदी आत्मविश्वासाने आणि उत्साहाने गाणी सादर केली. मंडळातील सदस्यांचे गायनातले कौशल्य सर्वांना अनुभवायला मिळाले. निखिल जाधवांचे वैशिट्यपूर्ण निवेदन खूप रंजक होते. कार्यक्रम अत्यंत श्रवणीय झाला. कार्यक्रमानंतर चविष्ट भोजनाची चव सर्वांनी चाखली. सरतेशेवटी गाण्यांवर ठेका धरत सर्वांनी नृत्य केले.

सप्टेंबरमध्ये MMC च्या शिकागो मराठी शाळेचे शैक्षणिक वर्ष सुरू झाले. शाळेची नवनिर्वाचित कार्यकारिणी अतिशय उत्तमरीत्या कार्यभार चालवत आहे. मी नुकतीच शाळेला भेट दिली होती. शाळेला लाभलेला चांगला प्रतिसाद पाहून प्रसन्नता वाटली. शाळेतल्या शैक्षणिक व इतर उपक्रमांत पालक उत्साहाने मदत करतात त्याबद्दल त्यांचे खरंच खूप कौतुक करावेसे वाटते. एकंदरीतच शाळेचे कामकाज, पालकांचा सहभाग आणि कार्यकारिणीचे कार्य पाहून समाधान वाटले.

नुकतेच मंडळाचे सदस्यत्व घेऊन बरीच नवीन मंडळी महाराष्ट्र मंडळ शिकागोत दाखल झाली आहेत. त्यापैकी कोणाला साहित्य, अध्यात्म, इतिहास, गायन, नृत्य, प्रवास किंवा आरोग्यविषयक गोष्टींमध्ये रस असेल, तर कार्यकारिणीशी सम्पर्क साधावा. या विषयांवरचे खास व्हॉट्सॲप मंडळातर्फे चालवले जातात आणि त्या ग्रूपचे वेगवेगळे कार्यक्रम सतत सुरू असतात. इच्छा असल्यास ते या ग्रूपमध्ये सहभाग घेऊ शकतात.

वर्षाच्या सुरुवातीला सर्वांच्या पाठिंब्याने निघालेली, सर्वांचा हातभार लागलेली ही महाराष्ट्र मंडळाच्या यावर्षीच्या कार्यकारिणीची निघालेली ही वारी आहे अशी माझी भावना आहे. वारीत जसे सर्व वारकरी भक्तिभावाने एकमेकांवर विश्वास ठेवून एकमेकांना साथ देत आपल्या उद्दिष्टाकडे, ध्येयाकडे अविश्रांत चालत असतात तसेच आम्ही आमच्या उद्दिष्टांकडे एकमेकांना साथ देत चाललो आहोत असे मला वाटते आणि यासाठी मी खरोखरच कृतज्ञ आहे.

हळूहळू वर्ष समाप्त होत आहे तरीही काही महत्वाचे कार्यक्रम अजून पार पडायचे आहेत. दिवाळीनिमित्त एक अतिशय रंजक कार्यक्रम आम्ही घेऊन येत आहोत. हा कार्यक्रम आणि यापुढे सादर होणारे सर्वच कार्यक्रम चांगले पार पडावेत म्हणून आम्ही सर्वच झटतो आहोत. तुम्ही नेहमीप्रमाणेच हे सर्व कार्यक्रम आपल्या उपस्थितीने यशस्वी करावेत, अशी विनंती करते.

मला यावेळी जोसेफ बार्बरा यांचे एक वाक्य आठवते, " Happiness is the real sense of fulfillment that comes from hard work." हा असा मनापासून केलेल्या कष्टांमुळे येणाऱ्या कृतकृत्यतेचा आनंद आम्हाला सर्वांना यापुढेही मिळत राहो, हीच सदिच्छा!

आपली नम्र,



नमीता वेदक
अध्यक्ष, महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५.

'रचना' चमू



सुजाता महाजन – संपादक



शिल्पा देशपांडे – संपादक



चेतन रेगे – सल्लागार



स्वरा सुर्वे – मुखपृष्ठ,
मांडणी आणि सजावट (गुढीपाडवा विशेषांक)



अनन्या भुसकुटे- मांडणी आणि सजावट
(मकरसंक्रान्त आणि गणपती विशेषांक)



निष्का पाटील - मुद्रितशोधन इंग्रजी

MMC Executive Committee (कार्यकारी समिती)



नमीता वेदक - अध्यक्ष

I have been a Chicago resident for over 35 years and have been actively involved in the Chicago Maharashtra Mandal since 1987 both as a foot soldier and as a member of various executive committees. I served as Vice President of the Mandal in 1999. More recently, I served as Board of Director in 2022, administrator of Chai Town Angat Pangat in 2023 and as a Vice President in 2024. Besides Maharashtra Mandal, I also have been active in other organizations including Ekjut Foundation, BAGC, BAPS and NAMI.

I was very active in Bollywood and was a lead actor in a bunch of films including Paheli (1976), Gangadham (1978) and Itihas (1985) before coming to the US. I have also acted in various Bombay Television/Doordarshan plays and performed on professional stage in Mumbai. I am a recipient of some awards for my performances in both film and stage. I am very much a people person and love to help wherever and whenever I can.



उर्मिला दामले – उपाध्यक्ष

महाराष्ट्र मंडळ शिकागोची २०१६ सालापासून सदस्य आहे. २०१८ पासून कार्यक्रमात सहभागी आणि २०२१ सालापासून कमिटीमध्ये सहभागी होऊन अध्यात्मपीठ, भजनसेवा, योगसाधना , डान्स टीम, ढोल ताशा, डेकोरोशन टीम, फूड टीम अशा अनेक उपक्रमात प्रत्यक्ष सहभागी होऊन मंडळात कार्यरत आहे. ह्या वर्षी मंडळाच्या उपाध्यक्षपदी राहून मराठी भाषा व संस्कृती इथे राहणाऱ्या महाराष्ट्रीय समाजापर्यंत पोहोचवण्याचा मानस आहे.



मनोज भट – उपाध्यक्ष

I have been living in Chicago since 1990 and have been an active member of Maharashtra Mandal Chicago (MMC) since then. During this time, I served as a BOD in several committees, volunteered at the 2011 BMM Chicago convention and in the 2019 Golden Jubilee celebration.
In addition, I was a volunteer and Board Member of the Grayslake Hindu Temple for almost 10 years.
I am honored to have been selected as the Vice President for MMC 2025, and I am very excited to contribute to the growth of our community and culture.

	**योगेंद्र राव – सचिव** I have been living in Chicago since 2020 and have had the pleasure of being an active member of Maharashtra Mandal Chicago (MMC) for the past four years. During this time, I have assisted the MMC Stage and Props team for several years and volunteered with the Food (Annapurna) team, as well as various MMC events. This year, I am honored to have been elected as the Secretary for MMC 2025, and I am very excited to contribute in more areas and help our community grow.
	**विशाल नवलकर – कोषाध्यक्ष** I have been a resident of Chicago since 2017. Have been actively volunteering in Marathi Shaala activities,as an assistant teacher in 2018. Also directed powada for Chicago Marathi Shaala in 2019. Volunteered in Dhinak Dhin Dha in 2022, There after a BOD is 2022, introducing unique events and ideas like Yoga , fitness club and MMC's first ever 5K in 2023 followed by 2024. Also an active volunteer in world vision and Vitalant. Looking forward to a successful 2025.

	**सौ. अश्विनी कुंटे** २०१३ पासून शिकागोची रहिवासी आहे. २०२० पासून महाराष्ट्र मंडळ शिकागोमध्ये स्वयंसेवक म्हणून कार्यरत आहे. २०२४ मध्ये मंडळाच्या कार्यकारिणीची सदस्य होते. तसेच महाराष्ट्र मंडळाच्या साहित्यकट्टा, बोलका कट्टा, अध्यात्मपीठ, आम्ही सारे गवय्ये , माझा News इ. साठी आयोजक म्हणून काम पाहिले आहे. मराठी शाळेत तीन वर्षे शिक्षक होते. तसेच ढोल-ताशा, फूडटीम, स्टेज टीम, डान्स टीम,रचना अंक इत्यादींमध्ये सक्रिय आहे. ह्या वर्षी देखील मराठी साहित्य आणि संस्कृतीचे प्रेम वृद्धिंगत करण्यासाठी प्रयत्नशील राहीन. अश्विनी कुंटे
	**सुनिला कुलकर्णी** नमस्कार, मी सुनिला कुलकर्णी. MMC 2025 ची एक BOD आहे. मी मंडळाच्या परंपरा टीमची धुरा सांभाळत आहे. आपण वर्षभर जे कार्यक्रम साजरे करतो, त्यांमध्ये आपल्या मराठी परंपरा गुंफण्याचं काम आमचा चमू करणार आहे. तसेच आपल्या "परंपरा" ह्या व्हाट्सअँप ग्रुपमध्ये आपण ह्या परंपरांचं महत्व, उगम आणि हा सुंदर वारसा आपल्या पुढच्या पिढीला देण्यासाठी, आताच्या काळात आपण त्या कशा सांभाळू शकतो, हे एकमेकांशी सुसंवाद करत जाणून घेणार आहोत! त्यासाठी आपल्या सगळ्यांचा सक्रिय सहभाग प्रार्थनीय आहे! लवकरच भेटूयात मंडळाच्या कार्यक्रमांमध्ये....

	**अरुंधती जाधव** I have been a MMC member since 2021. This year I have the responsibility of the YOUTH group/team. We are looking forward to and encouraging youth participation in various activities online as well as in various programmes. We have already started Atharvshirsh pathan every Sankashti of the month. We want youth to have a close connection with Maharashtraian personalities, traditions and culture. Today's young generation will be representing Maharshtra Mandal in future.
	**प्रियेश देशपांडे** मी २०१३ पासून शिकागोचा रहिवासी आहे . महाराष्ट्र मंडळ शिकागोचा २०१५ पासून सदस्य आहे. मागील काही वर्षं स्टेज टीम, आय.टी. टीम आणि फूड टीममध्ये सक्रिय सहभाग घेतला आहे. शिकागो मराठी शाळेसाठीही मी आय. टी. टीममध्ये काम केले आहे. या वर्षी मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये सहभागी होऊन आय.टी. टीम व स्टेज टीमची धुरा सांभाळत आहे व त्याद्वारे अधिकाधिक मराठी लोकांना मंडळाशी जोडण्याचा माझा प्रयत्न राहील.



विकास भालेराव

My name is Vikas Bhalerao, and I have been associated with Maharashtra Mandal Chicago and BMM for many years. I have always kept MMC as the beneficiary while working as Treasurer, a Member of the Finance Team, and a Member of Registration at BMM. While working in the core team of the committee as a Treasurer, I had the responsibility of IT work as well (being in IT for a long time). I suggested having an IT member in the core team, and I'm glad it's worked out well since then. We tried our best to make 2010 a memorable year. We had programs for all age groups and for the Diwali program, we had a lavish dinner and musicals in the Holiday Inn banquet hall in Schaumburg. We were very conservative while working in the Finance Team. People with advanced investment knowledge should take a little more risk for better returns.

MMC EXTENDED BOARD OF DIRECTORS (अतिरिक्त संचालक मंडळ)



चेतन रेगे

I am a resident for 18+ years, bibliophile and history buff.
Leadership & Initiatives:
* Member, MMC EC 2023 & 2025
* Secretary, MMC EC 2022
* Concept & Leader, CSM 350 – Chhatrapati Shivaji Maharaj Monument in Chicago (Come and join the ongoing movement)
* Concept & Admin, MMC Itihas Manch (2021 - Present)
* Admin, MMC Adhyatma Peeth (2021)
* Editor, MMC Rachana Magazine (2019)
Education & Arts:
* Teacher/Volunteer, MMC Chicago Marathi Shala (2017 - 2023)
* Directed, wrote, acted in, and coordinated theater plays & cultural programs
Commitment: Dedicated to preserving our incredible Indian heritage and building a strong Marathi community.



पल्लवी बेटसूर

Namaskar Mandali,
This is Pallavi Betsur. Introducing myself as one of the BODs in MMC Team 2025. I have been actively volunteering since 2020.Over the past few years, I have consistently volunteered in different teams like Decoration, Food, Dhol Tasha and Dance.This year I'm leading the Decoration team with a promise to showcase the best of creative minds. Looking forward to having a fantastic year. Thank you 🙏

	**प्राजक्ता जोशी** I have been living in Chicago since 2015 and an active member of Maharashtra Mandal Chicago for the past four years. I had the opportunity to serve in the MMC Stage and Props team, Decoration and YOUTH Team. This year I am excited to contribute to the MMC Flyers team, Stage Team and help the community grow.
	**अनुप देशमुख** I have been a Chicago resident for the past five years, actively participating as a volunteer in various events and projects organized by Mandal. In addition to my passion for pickleball and music, I enjoy dramatics and reading. I look forward to making new friends and helping to expand Mandal's reach among the Maharashtrian community in the Chicagoland area.
	**अर्चना श्रीपाल** नमस्कार मंडळी, मी अर्चना श्रीपाल. महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५ ची कार्यकारिणी सदस्य. माझे कुटुंबीय आणि मी २०१४ पासून महाराष्ट्र मंडळामध्ये कार्यरत आहोत. या वर्षी अन्नपूर्णा टीमची कार्यधुरा सांभाळण्याची जबाबदारी मी आणि माझे सहकारी सांभाळणार आहोत. मी आतापर्यंत परंपरा, ढोल-ताशा लेझिम, अंगत-पंगत, नृत्य तरंग अशा ग्रूपमध्ये काम केले आहे. या वर्षीही तुम्हां सर्वांना सोबत घेऊन, सर्व कार्यक्रमात भाग घेऊन, कार्यक्रमात सुग्रास भोजनाचा आनंद देण्याचा प्रयत्न करू.

MMC BOARD OF TRUSTEES (विश्वस्त मंडळ)



उल्का नगरकर



रश्मी चाफेकर



माधव गोगावले



जयदीप बुझरूक



राहुल थत्ते

MMC INVESTMENT ADVISORY COMMITTEE (गुंतवणूक सल्लागार समिती)



सुहास गोसावी



चैतन्य आगाशे



पराग जोशी

MMC Zoom कट्टे





संकल्पना आणि ग्राफिक्स : अमोल श्रीपाल

MMC साहित्यकट्टा



सुजाता महाजन



रश्मी चाफेकर



रश्मी वडवळकर



अश्विनी कुंटे



नमीता वेदक

MMC अध्यात्मपीठ



अनिरुद्ध दामले



नमीता वेदक



उर्मिला दामले



रेखा देवधर



माधव गोगावले



शिल्पा देशपांडे



हर्षा थत्ते

MMC इतिहासमंच



चेतन रेगे



माधव गोगावले



विशाल नवलकर



वैष्णवी नवलकर



शलाका पालकर - रेगे



नमीता वेदक

MMC आम्ही सारे गवय्ये



गौरी कुलकर्णी



मितेश कांबळी



विकास भालेराव



निखिल जाधव



नमीता वेदक

MMC YOUTH



अरूंधती जाधव



श्वेता हरणखेडकर



शीतल देशपांडे



नमीता वेदक



आरती खोत



चेतन रेगे

MMC अर्थविचार



नमीता वेदक



चैतन्य आगाशे



चेतन रेगे



मंदार जोगळेकर

MMC भजनसेवा



अनिरुद्ध दामले



उर्मिला दामले



गौरी कुलकर्णी



सुदर्शन अय्यंगार



नमीता वेदक

MMC योगसाधना



‘विशाल नवलकर



अनिरुद्ध दामले



पूर्वा कुलकर्णी



उर्मिला दामले



नमीता वेदक

MMC ढिपाडी ढिपांग



उर्मिला दामले



रसिका बांदेकर



नमीता वेदक

MMC चमक धमक



नम्रता पुरव



पल्लवी बेटसूर



नमीता वेदक

MMC परंपरा



पल्लवी बेटसूर



दीपा सावंत



सुनीला कुलकर्णी



प्रज्ञा जोगळेकर



नमीता वेदक

MMC अन्नपूर्णा



अर्चना श्रीपाल



अपर्णा खळदकर



पल्लवी पाटील



शीतल देशपांडे



नमीता वेदक

MMC आरोग्यधाम



उल्का नगरकर



रेखा देवधर



अनुपमा भट



चंद्रगुप्त शशिशेखर वेदक



नमीता वेदक

MMC फिटनेस क्लब



विशाल नवलकर



माधव गोगावले



नमीता वेदक



आनंद देशपांडे

MMC भ्रमणगाथा



कविता कुलकर्णी



रत्नांगी मालपेकर



मनोज भट



नमीता वेदक

MMC फॉरेवर यंग



दीपा सावंत



माधव गोगावले



कश्मिरा मगर



ज्योती गोगावले



नमीता वेदक

MMC शिकागोची बाग



दीपाली लांडे



श्वेता हरणखेडकर



प्रियेश देशपांडे



नमीता वेदक

MMC ढोल- ताशा



अनिरुद्ध दामले



सदानंद जोशी



चैतन्य आगाशे



पल्लवी बेटसूर



उर्मिला दामले



नमीता वेदक

MMC प्रतिसाद



उल्का नगरकर



चेतन रेगे



नमीता वेदक

शिकगो मराठी शाळा कर्यकारिणी



कविता वाडकर
शिकागो मराठी शाळा संचालिका



अक्षदा सावंत
शिकागो मराठी शाळा कोषाध्यक्ष



मयुरा देशपांडे
शाखा संचालिका -शॉम्बर्ग



निलेश अग्रवाल
शाखा संचालक - बफेलो ग्रूव्ह / व्हिलिंग



अरुंधती जाधव
शाखा संचालिका - नेपरव्हील



चेतन रेगे
महाराष्ट्र मंडळ - मराठी शाळा समन्वयक



प्रियेश देशपांडे
शाळा माहिती- तंत्रज्ञान प्रमुख

शिकागो मराठी शाळा विश्वस्त (सल्लागार)



दीपा सावंत



नमीता वेदक



प्रिया तेलवेकर



विशाल नवलकर

mmc रंगमंच व्यवस्था टीम

प्रियेश देशपांडे
योगेंद्र राव
अनुप देशमुख
अमोल श्रीपाल
मनोज जोशी
प्राजक्ता जोशी
अश्विनी कुंटे
मनोज कुंटे
रोहन गांधी
तुषार निमकर

mmc मजकूर लेखक टीम

रश्मी चाफेकर
चेतन रेगे
प्राजक्ता जोशी
वैशाली बेलसरे
शीतल देशपांडे
सुनिला कुलकर्णी
सुजाता महाजन (मुद्रितशोधन)
नमीता वेदक


॥ महाराष्ट्र मंडळ शिकागो ॥
गणेशोत्सव २०२५
फिलाडेल्फियाची विनोदवारी
अथर्वशीर्ष पठण
गणेश मूर्ती स्पर्धा
MMC ढोल ताशा पथक
गणपती विसर्जन मिरवणुकीमध्ये
नक्की सामील व्हा!
Saturday- August 23rd, २०२५
Barrington High School, 616 W Main St, Barrington, IL 60010
Program Timeline:
10.30 AM: रजिस्ट्रेशन
10 -11 AM: गणेश पूजन, आरती, प्रसाद, अथर्वशीर्ष पठण
11.00-12.30 : गीता पठण, फिलाडेल्फियाची विनोदवारी,
स्थानिक कार्यक्रम
1 - 2 .30 PM: जेवण
2. 30 to 4.00 : हेरिटेज विश्व मराठी एकांकिका स्पर्धेत गाजलेली,
पाच पारितोषिके विजेती धम्माल विनोदी एकांकिका
" कालाय तस्मै नमः "
4.15 -5.00 PM: ढोल ताशा आणि गणेश विसर्जन
कालाय तस्मै नमः
(We Bow to The Times)



-अनुक्रमणिका-

कथा		
• पदक	विलास गिते	४५
• कचकड्याचं सफरचंद	मंजिरी बर्वे	५४
• The creepy robot	Mahika Deshpande	६०
लेख		
1. • कलादिग्दर्शक श्री. नितीन देसाई - एक आधुनिक इकारस?	डॉ. चंद्रगुप्त वेदक	६२
• एक तरी ओवी अनुभवावी	श्रीदत्त राऊत	६५
• श्री भुर्शुंड गणेश	मीनाक्षी हेडाऊ	७१
• लहानपण दे गा देवा	रश्मी चाफेकर	७३
• लोणावळ्याची चिक्की	माधव गोगावले	७५
• झाडावरची नाठाळ फुलं	प्रशांत गौतम	७८
• हवायन तडका	राजीव गोखले	८२
• रजनीताई - एक अविस्मरणीय व्यक्तिमत्व	उमा दिघे	८४
साहित्यकट्ट्यावर सादर झालेले 'संगीत' या विषयावरचे लेखन		८५-९०
• संगीत	नीला जोशी	८५
• संगीत	अलका धाराशिवकर	८९
कविता		
• Poems	Shradha Bhat	९१

• प्रिय सुजाताताईस	शिल्पा देशपांडे	९४
• कविता	अवधूत जोशी	९५
• कविता	योगेश जाधव	९७
• केव्हातरी पहाटे	अश्विनी कुंटे	९९
• श्रावण संगीत	अलका धाराशिवकर	१०१
• अध्यात्मपीठाची ज्ञानदात्री कै. रजनीताई पटवारी यांना आदरांजली	नीला जोशी	१०२
• विसर्जन	संजीवनी कुलकर्णी	१०३
• पूर्वेचा कलंदर	दिपक वाकडे	१०४
• फक्त तू	दिपक वाकडे	१०५
• पांडवांचे प्रकटीकरण	श्रीमती सुहासिनी येवलेकर	१०७
• महाल पहाडी	श्रेया नेवाळकर	१०८
वृत्तान्त		
• MMC गणेशोत्सव वृत्तान्त	राजीव गोखले	१०९
• 5k वृत्तान्त	माधव गोगावले	१११
• शिकागोच्या भूमीवर घुमला 'ज्ञानोबा-माऊली'चा जयघोष	श्रीदत्त राऊत	११६
सदरे		
शब्दकोडे	अभिजित रायरीकर	१२०
गंमत शब्दांची आठवडा	डॉ. द.दि. पुंडे	१२२
सुख नव्हे सुखरूपता	प. पू. श्री. मंगेशदादा फडके	१२३
तन- मनाचा भोवरा • सोशल एनक्साईटी डिसऑर्डर	रश्मी वडवळकर	१२६

खवय्येगिरी • केरवळ्या	ज्ञानदा पवार	१२८
गणपती विशेषांक चित्रकला स्पर्धेतील सहभागी स्पर्धक आणि विजेते		१३०-१४०
MMC गणेशोत्सव २०२५ निमित्त झालेल्या अथर्वशीर्ष पठण स्पर्धेचा निकाल		१४१
कॅमेऱ्यातले क्षण • सेल्फी विथ शिकागोचे बाप्पा		१४२-१४४
• शब्दकोडे उत्तर		१४५
• MMC झूम कट्टयांच्या कार्यक्रमपत्रिका		१४६-१५०

- **या अंकात व्यक्त झालेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतील, असे नाही.**

पदक

- विभूतिभूषण बंद्योपाध्याय

('पथेर पांचाली' या थोर बंगाली कादंबरीचे लेखक विभूतिभूषण बंद्योपाध्याय यांनी अनेक भूतकथाही लिहिलेल्या आहेत. त्या भूतकथांपैकी ही एक कथा.)

काही वर्षांपूर्वी घडलेली ही घटना. आज जेव्हा त्या घटनेची आठवण येते, तेव्हा ती मला खरी वाटतच नाही. कदाचित ही घटना घडली तेव्हा मी आजारी असेन किंवा खूप उत्तेजित अवस्थेत तरी असेन. खरंच का ती घटना मी माझ्या डोळ्यांनी पाहिली? पण त्याच वेळी असंही वाटतं, की मी जे काही पाहिलं ते खरं होतं. केवळ कल्पनेची भरारी म्हणून त्याला उडवून लावता येणार नाही. तो अनुभव अगदी खरा खराच होता. आज त्याच्याबद्दल मला जे वाटतं ते काही सत्य नाही.

आज ती गोष्टच तुम्हाला सांगतो. पहिल्यांदा एक सांगायला हवं, की गेल्या दहा वर्षांत मला कुठल्याही आजारपणाचा त्रास झालेला नाही. माझं मन आणि बुद्धी- दोन्हीही अगदी निरोगी आणि ठीकठाक आहेत. चार वर्षांपूर्वी जेव्हा ही घटना घडली, तेव्हा माझं मन आणि शरीर पूर्णपणे निरोगी होतं.

मी एक शिक्षक होतो. माझं जीवन आपलं साधंसुधं होतं. शिक्षकाच्या जीवनात असं काय आगळंवेगळं घडणार? ज्याला अविश्वासनीय आणि असामान्य म्हणावं, असा कुठलाही अनुभव मला तोपर्यंत आलेला नव्हता एखाद्या सामान्य शाळामास्तरच्या रंगहीन आणि एकसुरी जीवनाची मला सवय होऊन गेली होती. शाळेचं काम आणि गृहस्थाला घरासाठी म्हणून करावी लागणारी कामं यातच माझे दिवस चालले होते.

उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा उघडली. पावसाळ्याचे दिवस होते. एकदा वर्गात शिकवत असताना मला दोन विद्यार्थी आपसात भांडताना दिसले. कुठल्यातरी वस्तूसाठी त्यांच्यामध्ये हिसकाहिसकी चालू होती. मी त्याबद्दल त्यांना रागावलो, तेव्हा वर्गातला एक मुलगा मला म्हणाला, "सर, कामाक्षीकुमार सुधीरकडचं पदक हिसकवायला बघतोय."

"पदक? कसलं पदक?" सुधीर उभा राहिला आणि म्हणाला, "सर, हे पदक माझं आहे."

मी दुसऱ्या विद्यार्थ्याकडे वळलो आणि विचारलं, "का रे, का हिसकावतो आहेस सुधीरचं पदक?"

त्या विद्यार्थ्यांचं संपूर्ण नाव होतं, कामाख्याचरण मौलिक. तो म्हणाला, "नाही सर! मला फक्त ते परत एकदा पाहायचं होतं, पण तो मला ते बघू देत नव्हता."

"हे बघ, ते पदक सुधीरचं आहे. ते त्याच्याकडून हिसकवण्याचा तुला काहीही अधिकार नाही. उगाच वर्गात गडबड करू नकोस."

नंतर मी 'वर्गात शांतता आणि मैत्रीपूर्ण वातावरण राखण्याची गरज' यावर एक छोटंसं व्याख्यान दिलं; पण त्या पदकाबद्दल आता मलाही कुतूहल वाटू लागलं होतं. मी सुधीरला विचारलं, "कुठे आहे ते पदक? आणि ते तुला कुठे मिळालं?"

माझी अशी कल्पना होती, की सुधीरला खेळाच्या स्पर्धेत मिळालेलं ते एखादं साधंसं पदक असावं. कलकत्त्यात दरवर्षी बॅडमिंटन, पोहणं आणि धावणे यांच्या स्पर्धा होत असतात. बहुधा त्यांच्यापैकी एखाद्या स्पर्धेतल्या सहभागाबद्दल सुधीरला मिळालेलं ते एक साधंसं पदक असावं, आणि तो मिरवण्यासाठी ते आपल्या मित्रांना दाखवीत असावा. कदाचित पदक मिळवल्याबद्दल त्याच्या कौतुकासाठी दुपारी शाळेला सुट्टी जाहीर होईल असंही त्याला वाटत असावं. त्यामुळे एकाच्या हातून दुसऱ्याच्या हातात असं फिरत फिरत ते पदक माझ्यापर्यंत आलं, तेव्हा मी अगदी उदासीनपणेच ते पदक हातात घेतलं. पण त्यावर नजर टाकताच ते काही खेळाच्या स्पर्धेत मिळालेलं साधंसुधं पदक नाही याची मला खात्री पटली. ते एक खूप जुनं, जडशीळ आणि कुशलपणे कोरलेलं पदक होतं. मला ते नीटपणे पाहायचं होतं.

वर्गात उजेड जरा कमीच होता; पण त्या पदकाच्या दुसऱ्या बाजूवर तरुण व्हिक्टोरिया राणीचा चेहरा कोरलेला दिसला. माझा चष्मा शाळेच्या ऑफिसमध्ये ठेवून आलो होतो. दरम्यान ते पदक पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी माझ्या टेबलाभोवती गर्दी केली. सर्वांना रागावून आपापल्या जागी परत जायला सांगितलं. एका विद्यार्थ्याला बोलावून म्हटलं, "या पदकावर काय लिहिलं आहे ते जरा वाचून दाखव बरं!" तो विद्यार्थी सहावीच्या वर्गातला होता. त्याने अडखळत अडखळत वाचलं,

"Crimea, Sebastopol, Victoria Regima...."

"आणि मागच्या बाजूला काय कोरलंय?"

"Sergeant S. B. Parkins,
Sixth Dragon Guards-
In the year 1854..."

मला खरोखर आश्चर्य वाटलं. क्रीमियन वॉरमध्ये सेबास्टोपलच्या रणांगणावर शौर्य दाखवल्याबद्दल कोणा सार्जेंट पर्किन्सला हे पदक बहाल केलं गेलं होतं. हे काही एखाद्या पोहण्याच्या किंवा तसल्या दुसऱ्या एखाद्या स्पर्धेत मिळालेलं असंतसं पदक नव्हतं.

त्या पदकानं माझ्या डोळ्यासमोर इतिहासातलं एक पर्वच उभं केलं. कोलकात्यामधल्या शाळेतल्या एका साध्यासुध्या वर्गात क्रिमिया आणि सेबास्टोपल यांची आठवण झाली... 'चार्ज ऑफ द लाईट ब्रिगेड' ही कविता आठवली. हे पदक क्रीमियामधून कोलकात्यातल्या नीलमणी दास गल्लीत राहणाऱ्या सुधीर साहा नावाच्या त्या मुलापर्यंत कसं बरं आलं असावं?

"इकडे ये सुधीर! कुठं मिळालं हे पदक तुला?"

"सर, हे पदक आजोबांनी दिलं मला."

"पण तुझ्या आजोबांकडे हे पदक कसं आलं हे ठाऊक आहे का तुला?"

"हो सर, ठाऊक आहे. माझ्या आजोबांना ते त्यांच्या बाबांकडून मिळालं. एका ब्रिटिश साहेबांने माझ्या पणजोबांकडे हे पदक गहाण ठेवलं होतं. माझ्या पणजोबांचं दारूचं दुकान होतं.

दारूचे पैसे देता न आल्याने त्या साहेबाने हे पदक पणजोबांकडे गहाण ठेवलं होतं, पण हे पदक सोडवून घेण्यासाठी तो साहेब कधीच परत आला नाही."

मी मनातल्या मनात काळाचा हिशोब केला. शहाऐंशी वर्षांपूर्वी त्या सार्जंट पार्किन्सला हे पदक मिळालं होतं. त्याला हे पदक समजा त्याच्या वयाच्या विसाव्या वर्षी जरी मिळालेलं असलं, तरी आज त्याचं वय एकशे सहा वर्षे असलं असतं. अनुमान काढलं, की या क्षणी तो सार्जंट पार्किन्स आपल्या कर्माप्रमाणे स्वर्गात किंवा नरकात कुठेतरी राहत असावा.

शनिवार असल्याने शाळा सकाळी अकरा वाजता सुटली. मी आपल्या गावी जायचं ठरवलं. ते पदक गावी नेऊन शेजारीच राहणाऱ्या माझ्या काकांना दाखवावं असं मला वाटलं. काकांचा इतिहासाचा चांगला व्यासंग होता, आणि ते पदक पाहून त्यांना आनंदच झाला असता. सुधीरकडून ते पदक घेतलं आणि गावाकडून आल्यावर ते परत करीन, असं त्याला सांगितलं.

शाळा सुटल्यावर मेसमधून बॅग घेतली आणि स्टेशनवर येऊन दुपारी अडीच वाजता सुटणाऱ्या ट्रेनमध्ये बसलो. ट्रेन दुपारी पाचनंतर गावी पोहोचली. तो भाद्रपदाचा महिना असून गावाकडे जाणारी वाट बरीच कोरडी होती. कोलकात्याहून बऱ्याच दिवसांनी आल्यामुळे पावसानं भिजलेली हिरवाई बघून मला आनंद वाटला. गावाकडच्या घरात कोणीही राहत नव्हतं. एक वयस्कर स्त्री माझ्यासाठी स्वयंपाक करून देत असे. तिला मी आत्या म्हणत असे. तिच्याकडून समजलं, की वृंदावन येथे आला आहे. वृंदावन हा माझा वर्गमित्र. सध्या बंगालबाहेर स्थायिक झालेला. खूप वर्षांनी त्याला भेटण्याच्या विचाराने मला आनंद झाला. चहा घेतला. ते पदक वृंदावनला दाखवण्यासाठी बरोबर घेतलं आणि बाहेर पडलो. नदीच्या काठाकाठाने चालत निघालो. दिवस पावसाळ्याचे असल्याने नदी दुथडी भरून वाहत होती. तिचं पाणी दोन्ही बाजूच्या गावांमध्ये आणि शेतांमध्ये शिरलेलं होतं. थोडा वेळ नदीकाठी एका खडकावर बसलो. वटवाघळं आपापल्या झाडांवर परतत होती. ती जागा अगदी निर्जन आणि एकाकी होती. पावसाच्या पाण्याच्या वेगाने येणाऱ्या ओहोळामुळे नदीचा काठ एका ठिकाणी भंगला होता आणि खालच्या बाजूला नदीचा प्रवाह खूप वेगाने आणि धोकादायकपणे वाहत होता. मला तो प्रवाह नीट पहावासा वाटला. काठावर उभा राहिलो. खाली नदीचं पाणी वेगाने खळाळत वाहत होतं. अचानकपणे एक विचित्र अशी तीव्र इच्छा झाली -- या उंच ठिकाणावरून खालच्या वाहत्या प्रवाहात उडी घ्यावी. ती विचित्र इच्छा प्रत्येक क्षणाबरोबर अधिकाधिक तीव्र होऊ लागली. पाण्याचा प्रवाह खूपच धारदार होता. वेगाने वाहणाऱ्या प्रवाहात उडी घेतल्यास आपलं काही खरं नाही हे मला ठाऊक होतं. आपल्याला पोहता येत नाही याची मला जाणीव होती, पण तरीही त्या प्रवाहात उडी मारण्याची अनिवार इच्छा होत होती. मला वाटत होतं, तिथे उभा राहिलो तर मला उडी घ्यावीच लागणार - नाही तर आपल्या आयुष्यातून आपण काहीतरी महत्त्वाचं हरवून बसू.

इच्छा नसतानाही मी नदीकाठापासून बाजूला झालो. माझं मन अस्पष्ट अशा दोन विरुद्ध भावनांमध्ये हेलकावत होतं, संमोहित झाल्यासारखं वाटत होतं. त्या ठिकाणाहून दूर जाण्याची इच्छा आणि सामर्थ्य मी हरवून बसलो. मला वाटू लागलं, की आपण जणू खूप जड झालो आहोत, आपल्याला हलता येत नाही. माझ्या उरल्यासुरल्या इच्छाशक्तीच्या साहाय्याने शेवटी मी त्या ठिकाणाहून कसाबसा दूर झालो.

वृंदावनकडे निघालो होतो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे मघाची ती इच्छा आता माझ्या मनातून पूर्णपणे नाहीशी झाली होती. काही वेळापूर्वी जणू दुसरीच कुणीतरी व्यक्ती माझ्या मनावर नियंत्रण ठेवत असावी असं मला वाटलं, आणि मनाच्या अनपेक्षित हेलकाव्याचं नवल वाटू लागलं. मनातील त्या विचित्र पण तीव्र इच्छांचा, त्यांच्या प्रवाहाचा अर्थ तरी काय होता ? हो, ट्रेनमध्ये खूप धूम्रपान केलं होतं खरं! अशा उकाड्यात तसं करायला नको होतं, आणि घरीही कडक चहाचे बरेच कप घेतले होते. कदाचित त्या गोष्टीमुळेही मला तसं वाटलं असावं. वृंदावनच्या घरी गेलो. बऱ्याच वर्षांनी त्याची भेट झाल्याने आनंद झाला. आम्ही रात्री उशिरापर्यंत गप्पा मारल्या. आमची सुखदुःखं, जीवन यांच्याबद्दल खूप बोलायचं होतं. भाद्रपद असल्याने वातावरण दमट होतं.

घरात गोंधळ वाटल्यामुळे वृंदावन म्हणाला, “जरा आपण मोकळ्या हवेत जाऊन गप्पा मारू. आज रात्री तू माझ्याबरोबरच जेव. तू इथेच जेवणार आहेस, असा आईने तुझ्या आत्याकडे निरोप पाठवला आहे.”

वृंदावन रहात होता ते घर दुमजली होतं. आम्ही गच्चीवर आलो. गच्चीवर एक छोटीशी खोली होती. त्या खोलीत वृंदावनचे काका राहतात हे मला ठाऊक होतं. घराच्या मागच्या बाजूला बांधकामासाठी लावलेली परात दिसली. मी विचारलं, “वृंदावन, इथे बांधकाम चाललंय की काय?”

“हो. काकांच्या खोलीची दुरुस्ती करायची आहे. पावसामुळे खोलीच्या उत्तरेकडच्या भिंतीचं प्लॅस्टर निघून गेलं आहे, विटाही बाहेर येऊ लागल्या आहेत. वृंदावन खोलीत गेला. मला मात्र बेचैन करणारी एक विचित्र अशी भावना जाणवू लागली. खोलीत गेल्यावर मला तहान लागली. पाणी आणण्यासाठी वृंदावन खाली गेला. मी खोलीत येरझारा घालीत होतो. खोली अंधारी होती. खोलीत एकटाच होतो. मी त्या बांबूंच्या त्या परातीजवळ गेलो आणि पुन्हा मनात मघाची ती इच्छा विजेसारखी चमकली. वाटू लागलं, इथून खाली उडी मारावी! छान होईल.
तिथून उडी मारण्याची खूप अनावर इच्छा झाली. उडी मारण्याच्या अगदी बेतात होतो, एवढ्यात मागून वृंदावनचा आवाज आला, “अरे, आत खोलीत ये ना! आईनं चहा पाठवलाय. तिकडे अंधारात काय करतोयस?”

चहा समोसे घेत घेत आम्ही गप्पा मारल्या. खूप वेळ आनंदात गेला. एका तासानंतर जेवण तयार झालं, की नाही हे पाहण्यासाठी वृंदावन खाली गेला. तो खाली गेल्यावर मला खोलीत गुदमरल्यासारखं वाटू लागलं. मी बाहेर गच्चीवर आलो, आणि गवंड्यांनी बांधलेल्या ठिय्यावर आल्यावर त्या अनिवार इच्छेनं माझ्या मनाचा पुन्हा ताबा घेतला. जणू कुणीतरी कानाशी कुजबुजलं, “हीच वेळ आहे! तुला रोखण्यासाठी आसपास कोणीही नाही. का उडी मारत नाहीस तू?” तर दुसरा आवाज कुजबुजला, “इथून उडी मारायला तू काय वेडा आहेस की काय? तुझ्या हाडांचा चुरा होईल ना इथून उडी घेतलीस तर!” मला चक्कर आल्यासारखं वाटू लागलं. मनात इतका गोंधळ झाला, की नीट विचारच करता येईना.

त्या संभ्रमावस्थेत किती वेळ होतो, आणि त्या दरम्यान नक्की काय घडलं, हे आठवत नाही. वृंदावनने मोठ्या आवाजात मारलेली हाक ऐकू आली. त्याने आपल्या हातांनी मला वर ओढलं, “बाप रे! इथून उडी मारत होतास की काय? नशीब, तू त्या बांबूंच्या ठिय्यावरच उडी मारलीस म्हणून वाचलास! झालंय काय तुला?” माझ्या मनात गोंधळ झाल्यासारखं वाटू लागलं. अस्वस्थ वाटू लागलं. काय झालं असेल ते मला खरोखरच आठवत नाही.

वृंदावनने मला खोलीत थोडा वेळ विश्रांती घ्यायला सांगितलं. सगळेजण म्हणाले, “उष्म्यामुळे आणि ट्रेनच्या प्रवासामुळे असं होत असतं. मला ठाऊक होतं, की मी खाली पडलो ते काही अपघाताने नव्हे. आपण काय करतो आहोत याचं पूर्ण भान ठेवूनच मी उडी मारली होती. पण ज्या क्षणी गच्चीवरून उडी मारली, तो क्षण काही मला आठवत नव्हता. तो महत्त्वाचा क्षण आठवण्याचा खूप प्रयत्न केला, पण व्यर्थ! थोडावेळ बिछान्यावर आडवा झालो आणि जरा बरं वाटू लागलं. मी कुशीवर वळलो तेव्हा माझ्या छातीला काहीतरी टोचल्यासारखं वाटलं. अरे हो! ते होतं खिशात असलेले सुधीरचं पदक! ते अगदी विसरूनच गेलो होतो की!

ते पदक वृंदावनला दाखवलं. त्यानं आणि त्याच्या घरातल्या प्रत्येकाने ते पदक फार कुतूहलानं आणि नवलाईनं पाहिलं. रात्री माझ्या खोलीत परतलो. तिथं दुसरं कोणीही नव्हतं, पण मला जाणवलं, की वृंदावनच्या खोलीतून बाहेर आल्यापासून खूप भीती आणि धास्ती वाटत आहे. त्या खोलीवर एकट्याने राहण्याची सवय होती, आणि एकट्यानं राहताना यापूर्वी कधीच बेचैनी वाटली नव्हती की भीतीही वाटली नव्हती. पण आता मात्र माझ्या त्या खोलीत अदृश्य अशा दुसऱ्या कुणीतरी अनोळखी व्यक्तीचं अस्तित्व जाणवत होतं. नक्कीच मला बरं वाटत नसावं. डोक्यात काहीतरी गडबड झाली असावी. दिवा बंद केला. माझ्या डोक्यामागे परसबागेवर उघडणारी मोठी खिडकी होती. पौर्णिमेनंतरची ती रात्र असल्याने स्वच्छ चंद्रप्रकाशात बाहेरचं सारं दृश्य स्पष्ट दिसत होतं. वारं खेळतं राहण्यासाठी खिडकी उघडी ठेवली. तासभर झोप झाली असेल नसेल, तेवढ्यात एका विचित्रशा जाणिवेने जाग आली. 'कुणीतरी' खिडकीतून माझ्याकडे पाहत आहे असं वाटू लागलं. मी जरा डोकं वर उचललं असतं, तर ती व्यक्ती दिसू शकली असती. 'ते कुणीतरी' माझ्याकडे अगदी टक लावून पाहत आहे असं जाणवत होतं. मी शहारलो. अस्पष्ट अशा त्या जाणिवेमुळे भीती वाटली. 'ते' काय होतं हे काय ठाऊक नव्हतं, पण त्याच्याकडे पाहण्याइतकं धाडसही होत नव्हतं. मी काही मागे पाहिलं नाही; पण खात्री होती, की 'त्याने' आपल्या मजबूत हातांनी खिडकीचे गज धरले आहेत आणि 'ते ' माझ्याकडे टक लावून पहात आहे. मी जरा मागे पाहिलं असतं, तर 'ते' दिसलं असतं. मी डोळे गच्च मिटून घेतले आणि काहीच पाहायचं नाही असं ठरवलं. बरं, झोपही येईना कारण खोलीत उंदीर मेल्यानंतर त्याचा सडल्यासारखा किंवा एखाद्या चिघळलेल्या जखमेवरचं बँडेज निघाल्यावर जसा आयोडिन, स्पिरिट आणि जखमेची दुर्गंधी यांचा एकत्रित असा दुर्गंध येईल, तसा दुर्गंध येत होता. बऱ्याच दिवसांत कोलकात्याहून इथे मुक्कामाला आलो नव्हतो, त्यामुळे नोकराने खोली नीट स्वच्छ केली नव्हती. 'ते' कोणीतरी जणू वारंवार सांगत होतं, “मागे वळ! मागे वळ आणि खिडकीकडे पाहा ना! का पाहत नाहीस मागे?”

कुठल्यातरी अपशकुनी, वाईट, सैतानी आणि हिंसक अशा शक्तीचं अस्तित्व मला खोलीत जाणवत होतं .त्या शक्तीला माझ्या दिशेने यायचं होतं. त्यात मी त्या शक्तीविरुद्ध झगडलो, पण व्यर्थ! ती शक्ती फरफटत फरफटत जणू संकटाकडे किंवा किंवा मृत्यूच्या बर्फगार शांततेकडे घेऊन चालली होती.

नाही !नाही! कधीही नाही! काहीही होवो आपण मागं पाहायचं नाही असे मी ठरवलं. कशी कोणास ठाऊक पण माझी खात्री पटली, की ती अपशकुनी शक्ती खोलीच्या आतल्या भागात काहीही करू शकत नव्हती. तिचा प्रभाव खोलीच्या बाहेरच तेवढा होता. त्या खोलीत पिढ्या न् पिढ्या आमच्या कुलदेवतेची पूजा होत होती, आणि मन म्हणत होतं, आमची कुलदेवताच त्या अघोरी शक्तीला खोलीच्या आत येण्यापासून रोखत आहे. अशा रात्री आपला आत्माच जणू आपल्याशी बोलतो. अचानक एका क्षीण अशा आवाजाने दचकलो. काय बरं असावं ते? माणसाचा एक क्षीण असा आवाज खिडकीजवळून ऐकू आला. जणू कुणीतरी खिडकीच्या गजांवर हळूच टकटक करून माझं लक्ष वेधण्याचा प्रयत्न करत होतं. एकदा दोनदा तीनदा मला खूप भीती वाटू लागली. कोणाला बोलवावं की मदतीसाठी ओरडावं की खिडकीकडे पाहावं? आठवलं, एका मोठ्या मुंगसाने खोलीच्या भिंतीत आपलं घर केलं होतं. दुपारी त्याला खोलीतून आतबाहेर करताना पाहिलं होतं. कदाचित त्या मुंगसाला भूक लागली असावी आणि ते खाण्यासाठी किडे वगैरे मारण्याचा प्रयत्न करीत असावं. असं असेल तर तो आवाज नक्कीच ....

या विचाराने माझा आत्मविश्वास परत आला. देवा रे! काय काय भीतीदायक विचार आले होते थकलेल्या मनात! मी सुटकेचा निःश्वास टाकला आणि कुशीवर वळलो. आता रात्र शांतपणे जाईल असं वाटलं आणि झोपण्याचा प्रयत्न करू लागलो, पण ही भावना काही फार वेळ टिकली नाही. मला सारखं वाटू लागलं, की कोणीतरी अदृश्य स्वरूपात आसपास आहे. त्याचं अस्तित्व जाणवू लागलं. ही जाणीव आणि तो अदृश्य आत्मा निवांतपणे विश्रांती घेऊ देणार नाही- हा विचार सतत एखाद्या सुईसारखा मनाला टोचू लागला.

मला पेंगुळल्यासारखं वाटत होतं, पण झोप मात्र येत नव्हती. डोळे उघडण्याची किंवा उठून बिछान्यावर बसण्याचीही भीती वाटत होती. आणि खिडकीवरची ती हळू आवाजात सतत चाललेली टकटक 'त्याच्या' उपस्थितीची जाणीव करून देत होती. जणू ती टकटक म्हणत होती, “मागं वळ! मागं वळ! खिडकीकडे पाहा!”

मला प्रचंड घाम येत होता. तो कदाचित हवेतल्या दमटपणामुळे असेल, अशी मी स्वतःची समजूत घातली. हळूहळू पहाट झाली. फटफटू लागलं. माणसांचे आवाज येऊ लागले. माझी भीती पळाली आणि सकाळी नऊ वाजेपर्यंत मी झोपून राहिलो.

उठल्यानंतर आवरून चहा घेतला आणि माझ्या इतिहासतज्ज्ञ काकांना भेटायला गेलो. काल वृंदावनकडे वेळ गेल्याने त्यांना भेटू शकलो नव्हतो .

काकांनी जे सांगितलं त्याने मी चक्रावूनच गेलो.

ते म्हणाले, "आता कसा आहेस, सुरेन?अरे, काल रात्री तुला पाहिलं; पण बरीच रात्र झाली होती म्हणून हाक मारली नाही तेव्हा मी गच्चीवर शतपावली करीत होतो. शिवाय तुझ्याबरोबर आणखी एक गृहस्थ होते. कोण होते रे ते? एखाद्या शिखासारखे उंच होते. तुझे मित्र होते का ते? आपल्या बंगाली लोकांमध्ये असा बांधा क्वचितच दिसतो."

मी चकित होऊन काकांकडे पाहिलं. काल रात्री तर माझ्याबरोबर दुसरं कोणीही नव्हतं.

मी म्हटलं, "काय म्हणता? माझ्याबरोबर काल रात्री एक उंच माणूस होता? नाही काका! माझ्याबरोबर तर कोणीच नव्हतं. मी अगदी एकटाच होतो."

यावर काका तर माझ्यापेक्षाही अधिक चकित झालेले दिसले

"खरंच? तुझ्याबरोबर दुसरं कोणीही नव्हतं? तू एकटाच होतास? माझी नजर तर काही इतकी अधू नाही!"

मी हसून म्हणालो, "अहो काका, कदाचित तुम्ही चकला असाल. आता वय झालंय तुमचं! काल रात्री माझ्याबरोबर खरंच दुसरं कोणीही नव्हतं. शिवाय तुमच्या घरासमोरच्या दाट झाडांच्या बागेतल्या सावल्यांमुळे स्पष्ट असं काही दिसत नाही. त्यामुळे कदाचित ...."

काकांना कोड्यात पडल्यासारखं झालं. ते म्हणाले, "नवलच म्हणायचं! माझी नजर काय खरंच इतकी कमी आहे? तू आंब्याच्या झाडाजवळ आल्यावर टॉर्च लावलास, तेव्हा तो उंच माणूस तुझ्यामागून चालताना दिसला. बागेतून बाहेर पडल्यावर तू टॉर्च बंद केलास आणि स्वच्छ चांदण्यात एक उंच माणूस तुझ्यामागोमाग जाताना दिसला. तो तुझ्यापेक्षा चांगला एक फूटभर उंच होता. तुझ्या अगदी मागे-मागेच जात होता. पण तुम्ही सावल्यांमधून चालला होता, त्यामुळे तो माणूस कोण आहे हे नीट समजू शकलं नाही. तुला हाक मारावी आणि त्या मित्राबद्दल विचारावं असंही वाटलं होतं. माझी नजर इतकी अधू आहे की काय?"

काकांना मी पुन्हा ठामपणे सांगितलं, की "काका! काल रात्री मी एकटाच होतो; आणि माझ्याबरोबर दुसरं कोणीही नव्हतं. कदाचित तुमच्या अधू नजरेमुळे तुम्हाला तसं वाटलं असेल."

नंतर वृंदावनला भेटायला गेलो. जुन्या दिवसांच्या आठवणी काढून त्याच्याशी गप्पा मारण्यात दिवस खूप चांगला गेला. दिवसाच्या स्वच्छ उजेडात आधीच्या रात्रीचा तो अनुभव इतका हास्यास्पद वाटला, की वृंदावनजवळ मी त्याचा उल्लेखही केला नाही.

संध्याकाळच्या ट्रेनने मला गाव सोडायचं होतं. वृंदावनबरोबर चहा घेतला आणि रेल्वे स्टेशनकडे निघालो. संध्याकाळचा काळोख खूप गडद होत चालला होता. गौरी पाडाच्या मोठ्या आमराईतून चाललो होतो. ती आमराई पार करण्यासाठी जवळजवळ पाच मिनिटे लागली असती.

अर्धी आमराई पार केल्यावर का कोण जाणे, मी मागे वळून पाहिलं; आणि जे दिसलं त्यानेजणू माझ्या संपूर्ण शरीरातून जणू विजेचा प्रवाह गेल्याप्रमाणे धक्काच बसला. मी जवळजवळ बेशुद्धच पडलो.

संध्याकाळच्या काळोखात तिथे ते कोण उभं होतं? माझं सारं शरीर ताठ झालं. भीतीच्या भयानक भावनेने माझ्या मनाचा ताबा घेतला .

कोण होतं ते?

एक अनोळखी आणि भीतीदायक अशी मनुष्याकृती संध्याकाळच्या त्या अंधारात मला दिसली. तो माणूस उंच होता. झुडपांच्या गचपणात ताठ उभा होता. तो एखाद्या इंग्रज सोजिरासारखा दिसत होता. त्याच्या डोक्यावर जुन्या काळच्या सोजिरांच्या डोक्यावर असायची तशी उंच आणि वैशिष्ट्यपूर्ण टोपी होती. ती टोपी एका स्टीलच्या पट्टीने हनुवटीला बांधलेली होती. जुन्या चित्रांमधून दिसते, त्याप्रमाणे. माझ्याकडे टक लावून पाहात असलेल्या एखाद्या पुतळ्यासारखा तो दिसत होता. माझ्यापासून तो फक्त दहा हात अंतरावर उभा होता. हा नक्की काय प्रकार आहे हे पाहण्यासाठी त्याच्याकडे धावलो, पण तो पुतळा काही हलला नाही.

आता तो माझ्यापासून अगदी काही हातांवर होता. त्या सोजिराची ताठ उभी आकृती आणि त्याच्या टोपीची स्टीलची पट्टी स्पष्ट दिसत होती.

माझे गुडघे थरथरू लागले आणि सगळ्या अंगाला जणू मुंग्या आल्या. डोकं पिसासारखं हलकं झालं आणि चक्कर आल्यासारखं वाटू लागलं. काही मिनिटांत चक्कर येऊन पडलो असतो. ती सोजिराची आकृती माझ्याकडेच टक लावून पहात होती. माझे पाय जणू पोलादासारखे जड झाले आणि जणू संमोहित झाल्यासारखा, असहाय असा तिथेच उभा राहिलो.

आणि नेमका त्याच निर्वाणीच्या क्षणी काही माणसं हातात कंदील घेऊन आमराईत शिरताना दिसली. त्यांच्या आवाजांनी पुन्हा बळ आलं आणि मी मदतीसाठी ओरडलो. ती माणसं धावत माझ्याजवळ आली आणि मला झुडपांच्या गचपणात उभा असलेला पाहून चकित झाली.

"तिथं काय करताय तुम्ही? मामला काय आहे, बाबू?" त्यांनी मला विचारलं. कंदिलाच्या प्रकाशात त्यांनी माझा चेहरा न्याहाळला आणि म्हणाले, "अरे, तुम्ही आहात होय! पण तुम्ही आजारी असल्यासारखे वाटता. तुमचा चेहरा पांढराफटक पडलाय काही दिसलं बिसलं की काय तुम्हाला? बौरी बागान ही काही चांगली जागा नाही, बाबू! संध्याकाळचे इथून जायला लोक घाबरतात"

त्यांच्यापैकी एकानं कंदील वर उचलला. ती आकृती अजूनही तिथेच उभी असलेली दिसली.

एका गावकऱ्यानं विचारलं, "तुम्ही असं टक लावून त्या झाडाकडे काय पाहताय?"

एकजण म्हणाला, "अलीकडेच राईच्या मालकांनी त्या झाडाच्या फांद्या छाटल्या आहेत त्यामुळे रात्री लोकांना तिथं कोणीतरी माणूस उभा आहे असा भास होतो. या लवकर, या राईतून बाहेर पडा. तुम्ही खूप घाबरलेले दिसताय." आता मलाही दिसलं, की ते एक जंगली झाड होतं. त्या झाडाची छाटणीच अशी केली होती, की त्याचा शेंडा हा घोडदळातल्या सैनिकाच्या टोपीसारखा दिसत होता. बाप रे!

केवढा फसलो होतो मी त्या झाडाच्या आकारामुळे! आणि काल काकांना मारे 'तुमचा चष्मा बदला' म्हणून सांगत होतो! मला स्वत:चीच शरम वाटली. माझी स्वत:चीच जर बघण्यात एवढी गोड चूक होत असेल, तर बिचाऱ्या म्हाताऱ्या काकांना कशाला दोष द्यायचा?
ते गावकरी खूप चांगले होते. मला सोबत करीत ते स्टेशनपर्यंत आले.

दुसऱ्या दिवशी ते पदक सुधीरला परत केलं. सुधीर म्हणाला, “सर, माझ्या आजोबांनी तुम्हाला भेटायला बोलावलंय. आज संध्याकाळी माझ्याबरोबर तुम्ही माझ्या घरी याल का?”

संध्याकाळी सुधीरच्या आजोबांना भेटलो. ते म्हणाले, “मास्टरमोशाय, तुम्ही हे पदक सुधीरकडून घेतलं असं समजल्यावर मला धास्तीच वाटली. तुमचा गावाकडचा पत्ता काही ठाऊक नव्हता, नाहीतर मी तुम्हाला तारच करणार होतो. तुम्हाला ठाऊकच आहे, की ते पदक एका ब्रिटिश सोजिरानं माझ्या वडिलांकडे गहाण ठेवलं होतं. ही माझ्या जन्माच्याही खूप पूर्वीची गोष्ट. तो सोजीर पक्का दारुडा होता. ते पदक सोडवून घेण्यासाठी तो कधीच परत आला नाही. आमच्या कुटुंबातल्या माणसांशिवाय इतरांनी हे पदक जवळ ठेवणं फार धोक्याचं आहे. आमच्या इच्छेविरुद्ध माझ्या मेहुण्याने हे पदक आपल्या घरी नेलं होतं. त्याच दिवशी संध्याकाळी तो आपल्या घराच्या गच्चीवरून खाली पडला आणि मेला. हे पदक आम्हाला त्याच्या शर्टच्या खिशात सापडलं.”

यांत्रिकपणे माझ्या तोंडून शब्द बाहेर पडले, “गच्चीवरून खाली पडले? पदक त्यांच्या खिशात होतं?”

“हो, मास्टरमोशाय! ही सत्तावीस - अठ्ठावीस वर्षांपूर्वीची गोष्ट. आणि ज्यांनी ज्यांनी हे पदक आमच्याकडून नेलं होतं त्यांनी त्यांनी अगदी काही तासांतच ते परत आमच्याकडे आणून दिलं. त्यांना रात्री अचानक भीती वाटायची एक विचित्र अशी धास्ती वाटायची. कोणीतरी चोरून आपल्या पाठलाग करत आहे असं जाणवायचं. आमच्या कुटुंबाबाहेरील कुणीही व्यक्ती त्या पदकाला लागलेला शाप सहन करू शकली नाही. अगदी तुमच्या जिवालाही धोका होता म्हणूनच तुम्हाला तार करून सावध करावं असं वाटलं.”

शेवटी या गोष्टीला ताजा कलम जोडायला हवा. सुमारे महिनाभरानंतर पुन्हा माझ्या गावी गेलो, आणि बौरी बागानच्या आमराईत जिथे घाबरलो होतो ते ठिकाण पुन्हा एकदा नीट पाहण्यासाठी म्हणून गेलो. गंमत म्हणजे ज्या झाडामुळे मला भीती वाटली होती त्या झाडाची आता तिथं नावनिशाणीही नव्हती. ते झाड एका आंब्याच्या झाडाजवळ होतं. पण आता ते आंब्याचं झाडही तिथे नव्हतं. मी खूप बारकाईनं त्या जागेचा शोध घेतला. समजा ते झाड तोडून टाकलेलं असेल तर जमिनीवर त्याच्या खोडाचा काहीतरी भाग शिल्लक दिसला असता. पण तिथं तर आता स्वच्छ सपाट जमीन होती.

तोडलेल्या झाडाचं तिथं काहीही चिन्ह नव्हतं.

अनुवाद :विलास गिते

कचकड्याचं सफरचंद

एकदा अशीच खरेदी करून घरी आले. खरं तर माझ्या शॉपिंगमध्ये घरात कुणालाही काहीही इंटरेस्ट नसतो. मला काही मदत हवीय का पिशव्या आत आणायला, असं सुद्धा विचारत नाहीत. त्या दिवशी मात्र जरा वेगळंच घडलं. मी पिशव्या खाली ठेवल्या आणि माझ्या कन्येचं लक्ष एका पिशवीकडे गेलं. तरातरा पुढे होऊन तिने ती पिशवी उचलली.

“तू परत डॉलर स्टोअरमध्ये गेलीस, मॉम? किती वेळेला सांगितलं, नको आणू तिथून काही, पण तू म्हणजे!” तिने होपलेसली मान हलवली.

आता ऑनेस्टली - काही चांगल्या स्टोअर्सच्या पिशव्याही होत्या तिथे. मेसीजच्या होत्या, टार्गेटच्या होत्या, पण कन्येला मात्र अर्जुनाला फक्त पक्ष्याचा डोळा दिसावा, तसं फक्त डॉलर-स्टोअरची पिशवी दिसली होती. आता तिने गोष्टी बाहेर काढायला सुरुवात केली होती. दोन-चार क्लीनिंगचे स्पंज होते, ड्रॉवरसाठी दोन-चार ऑर्गनायझर्स होते. आणि मग तिने ‘ते’ कचकड्याचं सफरचंद पाहिलं. दोन अडीच इंच रुंद आणि दोन अडीच इंच उंच. सफरचंदाच्याच रंगाचं - लालसर नारिंगी. तिचं कुतूहल वाढलं. तिने ते उघडलं. आत कसलं तरी क्रीम होतं.

“मॉम, हे क्रीम वापरणार आहेस तू? मॉम, असली क्रीम्स नको वापरू. अगं, काय होईल त्या स्किनचं?”

“अगं, ते क्रीम....” मी बोलायचा प्रयत्न केला.

“शी इज अ केस बियाँड रिपेअर, फर्गेट इट” चिरंजीव मध्येच बोलले - अजिबात कारण नसताना!

“अरे, ते ...” मी पुन्हा बोलायचा प्रयत्न केला.

“याची क्वालिटी चांगली नसते, मॉम. नशिबाने तुझी स्किन चांगली आहे. मग का करतेस तू असं?” कन्या चालूच होती.

“अगं, ते ...” मी पुन्हा बोलायचा प्रयत्न केला.

“खरंच, नको अशा गोष्टी करू” आता पतीदेवही कळवळून बोलले.

“अरे, जरा ऐकाल का माझं? ते क्रीम मी लावण्यासाठी नाही आणलं.” मी जरा आवाज चढवला. नाहीतर त्यांचं चालूच राहिलं असतं.

“व्हॉट ?“ तिघांच्याही चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतं.

“ती लहानपणची आठवण आहे माझ्या! अगदी माझ्या दिल के करीब – close to my heart आठवण!“

बोलताना मी जरा भावुक झाले होते. ‘या असल्या फालतू क्रीमची कसली आठवण? आणि तीही इमोशनल करणारी?’ त्यांनाही आश्चर्य वाटत होतं.

“I know, I know. मी सांगते.” कन्येने तारे तोडले. “लहानपणी असल्या फालतू क्रीमची रिऍक्शन आली होती ना तुला? ते आठवतंय ना? बघ, सांगत होते तुला.”

“अगं, नाही! ऐक !” मग मीच सांगायला सुरुवात केली.
“मी असेन तीन-साडेतीन वर्षाची! माझा दादा माझ्यापेक्षा फक्त दीड वर्षांनी मोठा! त्यावेळी आम्ही मुंबईत राहत होतो. दोन-तीन आठवड्यातून एकदा आम्ही मार्केटमध्ये जात असू. त्या दिवशी खरेदी करायची, बाहेर काहीतरी खायचं, असा बेत असे. आम्ही दोघंही भावंडं या दिवसाची आतुरतेने वाट बघत असू. फक्त जरुरीच्याच नाहीत, तर आम्हांला कधी काही आवडलं असेल, तर त्या वस्तूही याच खरेदीत घेतल्या जायच्या. पण बाबांचा एक नियम होता - एखादी गोष्ट आम्हांला आवडली आणि आम्ही ती मागितली, तर ती आम्हांला लगेच मिळत नसे. ती पुढच्या वेळी मिळे.
‘अशी मुलांना मागायची आणि हट्ट करायची सवय लागली, की मुलं बिघडतात. पुढे आयुष्यात आपल्याला हवी असलेली प्रत्येक गोष्ट मिळतेच, असं नाही, मग ही ‘नाही’ ऐकायची सवय लहानपणीच असली, म्हणजे पुढे त्रास होत नाही.’ असं त्यांचं म्हणणं! आईनेही कधी हा नियम मोडला नाही.

तर काय झालं, असेच आम्ही एका दुकानात गेलो होतो. तिथे काचेच्या पलीकडे मला ते कचकड्याचं सफरचंद दिसलं - प्लास्टिकचं ऍपल. हे दिसतंय ना, तसंच! तुम्हाला गम्मत वाटेल, पण त्या काळात केळं, पेरू, चिक्कू वगैरे फळं आम्ही खायचो. पण सफरचंद जरा जास्त महाग आणि नेहमी न आणलं जाणारं फळ होतं. जरा श्रीमंतांचं फळ. म्हणून असेल कदाचित, पण मला ते खूप आवडलं. मी बाबांना विचारलं ते घेऊन द्याल का म्हणून! बाबाही ‘हो’ म्हणाले. पण तो नियम होताच. ‘आता मनात आलंय ना? मग आत्ता नाही! पुढच्या वेळी येऊ, तेव्हा!’ मी हिरमुसले थोडीशी, पण पुढे मिळणार आहे म्हणून खुशही झाले. तसा दोन-तीन आठवड्याचा स्पॅन नक्की केवढा असतो, एवढं कळण्याचं माझं वयही नव्हतं. ज्या गोष्टी आणायला आलो होतो त्या गोष्टी घेऊन आम्ही घरी आलो.”
“ओह, आणि मग परत तुम्ही तिथे गेलाच नाहीत. किंवा, गेलात, पण ते सफरचंद नव्हतं त्यांच्याकडे. All sold out! आणि मग ते तुझ्या नेहमी डोक्यात राहिलं, आणि आत्ता तुला मिळालं.” कन्येनं लॉजिक लढवलं.
“नाही गं, तसं काहीच झालं नाही. आम्ही गेलो परत. ते सफरचंद होतं त्यांच्याकडे आणि बाबांनी ते घेऊनही दिलं मला. त्याच्या झाकणात आरसा होता. आत एक पफ होता पावडर लावायचा. मी खूप खुश होते.”
मी सांगत होते. चिरंजीवांचा चेहरा अगदीच निर्विकार होता. त्यानं मध्येच मला interrupt केलं.
“झालं?? आम्हाला वाटलं, काहीतरी इंटरेस्टिंग असेल अजून. यात काय? अशा कितीतरी छोट्या वस्तू घेऊन दिल्या आहेस तू मला लहान असताना. माझ्या लक्षात पण नाहीत त्या. Not a big deal!”
उरलेल्या दोघांनीही 'काय पण स्टोरी' असा चेहरा केला.

“अरे, स्टोरी संपली नाही अजून. आत्ता सुरू होणारे! म्हणजे काय झालं, मला ते सफरचंद मिळालं, त्या दिवशीची गोष्ट. मी खूप खुश होते. पण तेव्हाच दादाला एक प्लास्टिकची छोटीशी रेक्टॅन्गुॅलर चपटी डबी दिसली -Transparent. त्याच्या आत एक रंगीत स्पंज होता. पूर्वी आम्ही शाळेत पाटी वापरायचो ना, तर ती पुसायला. त्याचीही नुकतीच शाळा सुरू झाली होती. त्याच्या एका मित्राकडे त्याने तशी डबी पाहिली होती, म्हणून त्यानेही बाबांकडे ती डबी मागितली. पण बाबांचा नियम आडवा आला. ‘मनात आलंय ना? मग आत्ता नाही. पुढच्या ट्रिपमध्ये देऊ’. तो खूपच हिरमुसला. आईच्या मागे लागला, म्हणजे फक्त आईचा पदर ओढत होता. जेव्हा तो तिच्या खूपच मागे लागला, तेव्हा आई ही म्हणाली, “अहो जाऊ दे ना, त्या डबीची किंमत ती काय आणि तुमची शिस्त काय!” पण बाबाही ऐकेनात.
“अगं, त्याला किंमत समजते का गोष्टींची? त्याला फक्त एवढंच समजतं, की मागितलं की मिळालंच पाहिजे. प्रश्न किमतीचा नाहीच आहे, शिस्तीचा आहे. वाईट सवयी लागण्याचा आहे. आणि पुढच्या वेळी देऊ ना त्याला घेऊन. नेहमीच करतो ना तसं?”
आईनेही मग खूप ताणलं नाही. दादाही रुसला आणि आईचा पदर सोडून दुकानाच्या बाहेर आला आणि पायरीवर उभा राहिला. माझं सफरचंद आणि आईला घ्यायच्या काही गोष्टी घेऊन आम्ही थोड्या वेळाने बाहेर आलो. दादा कुठेच दिसला नाही. आई-बाबा त्याला शोधायला लागले.
“मगाशी पायरीवर तर उभा होता”. आई म्हणाली.
‘गेला असेल आत परत’ म्हणून बाबा त्याला शोधायला आत गेले, पण दुकानातही तो नव्हता. अंधार पडत होता. दुकानात आणि बाहेरही गर्दी होती. बाबा त्याला इकडे तिकडे बघायला लागले. आसपासच्या दुकानांमध्येही पाहिलं. गेला कुठे हा मुलगा? काय करावं काहीच सुचत नव्हतं. रस्त्यावरच्या लोकांनाही आई-बाबा विचारायला लागले, की ‘असा कोणी छोटा मुलगा पाहिला का?’ पण अजून तरी हवं ते उत्तर मिळत नव्हतं. दादाचा पत्ता नव्हता. आई रडकुंडीला आली होती. बरोबर त्या दिवशी त्याला शाळेतून पिकअप करून आम्ही गेलो होतो, त्यामुळे तो अजूनही convent शाळेच्या युनिफॉर्म मध्येच होता.
दादाचं वर्णन करून आई-बाबा लोकांना विचारत होते, ‘कुणी पाहिलंय का अशा मुलाला’ म्हणून! ‘पाहिलं’, असं कुणीच अजून म्हणालं नव्हतं, पण आमच्या आसपास लोक जमा झाले. आता लोक सुध्दा एकापेक्षा एक असतात. शंभर प्रश्न विचारायला लागले.
“नक्की कुठे हरवला मुलगा? कधी? कसा हरवला?”
एक गृहस्थ म्हणाले, "अहो, एक प्लास्टिकची डबी ती काय पाच पैशांची आणि त्यासाठी तुम्ही तुमचा मुलगा गमावलात? ही कसली शिस्त?"
दुसरे गृहस्थ म्हणाले, "अहो, ही मुंबई आहे, इथे मुलं पळवणाऱ्या टोळ्या असतात, मुलाचा हात सोडला कसा तुम्ही असा? त्याला रडत दुकानाबाहेर कसं उभं राहू दिलं?"
एकाने एक असाच मुलगा कसा हरवला, तो आत्तापर्यंत मिळालाच नाही, ही गोष्ट रंगवून सांगायला सुरुवात केली. सुदैवाने त्याच्या बायकोने त्याला गप्प केलं.
"अहो, ही वेळ आहे का हे बोलायची? कमालच करता." तिने झापलं.

एकजण मनापासून समजूत काढत म्हणाले, "पहिलं पोलिसात रिपोर्ट करा. सापडेल अहो तुमचा मुलगा. काळजी करू नका."
एकजण म्हणाले, "प्रथम घरी जाऊन बघा, एखाद्या वेळेस घरी गेला असेल ऑलरेडी!" घर दूर होतं. ती शक्यता नव्हती वाटत. आतापर्यंत आई-बाबांच्या तोंडचं पाणी पळालं होतं. आपल्याकडून फार मोठठी चूक झालीय, याचा पश्चाताप होत होता.
मुलांना नीट प्रसंगाची कल्पना यावी, म्हणून मी जरा माझे टू सेंट्स ऍड केले.

"एक लक्षात घ्या, हा काळ जवळजवळ साठ वर्षांपूर्वीचा आहे. त्याकाळी लग्नंही लवकर होत आणि मुलंही. आत्तासारखं नाही. आता तिशीत आलं, तरी लग्नाबद्दल तुम्ही शुअर नसता. चाळीशी आली, की मुलांचा विचार. माझी आई पंचविशीची असेल तेव्हा आणि बाबा फार तर तिशीचे. आणि हा असा प्रसंग!"
"Must be very hard". कन्येनं कधी नव्हे तो माझ्या म्हणण्याला दुजोरा दिला.
"मग पुढे काय झालं?"
असाच थोडा वेळ गेला. खूप लोकांना विचारून झालं. आता पोलीस चौकीकडे जायचं ठरलं.
तेवढ्यात एकजण म्हणाला,
"तुम्ही म्हणता, तसा एक मुलगा मी पाहिला. बोराच्या गाडीवर चालला होता. पण त्या बोरवाल्याचा मुलगा नव्हता वाटत तो. रडत वगैरे नव्हता. आरामात बोरं खात होता.“
चुकलेल्या जहाजावरील प्रवाशांना लांबवर दुर्बिणीतून का होईना, पक्षी दिसला, की आशेचा किरण दिसतो आणि स्फूर्ती येते, तसंच आई-बाबांना झालं.
"तो बोरवाला नेहमीच त्या चौकात असतो. तो तुमचा मुलगा असेल, तर नक्कीच मिळणार. त्या चौकात खूप माणसं सापडतील त्याला ओळखणारी!" अजून कुणीतरी म्हणालं.
"आता पहिले पोलीस चौकीत जा, चौकात नको. काय ते पोलिसांना करू दे" अजून कुणीतरी सल्ला दिला.
मग आमचा मोर्चा जवळच्या पोलीस चौकीकडे वळला. तिथे रिपोर्ट केला.
पोलीस इन्स्पेक्टर चांगले होते. आईला म्हणाले, "वहिनी, तुमचा मुलगा नक्की सापडणार. तुम्ही मुलीला घेऊन घरी जा."
ते बाबांना म्हणाले, "तुम्ही या त्यांना घरी सोडून. तोपर्यंत आम्ही काय ती ऍक्शन घेतो. अशा परिस्थितीत त्या एकट्या नको जायला घरी".
मग टांगा करून आम्ही घरी आलो. मी दमले असेन, भूक लागली असेल, म्हणून मला शेजाऱ्यांकडे सोडून आई-बाबांनी परत जायचं ठरवलं. पाच मिनिटात बिल्डिंगमधली माणसं गोळा झाली. पुन्हा सर्व गोष्टींची उजळणी झाली. विविध प्रश्न, उपदेश, टीका सर्व झालं. मला तिथेच सोडून आई-बाबा निघाले. शेजारी राहणारे एक गृहस्थसुध्दा बरोबर निघाले.

जेव्हा बाबा पोलिसचौकीत पुन्हा पोचले, तेव्हा दुसऱ्या एका पोलिसचौकीत त्यांना पाठवण्यात आलं. तिथे गेले, तेव्हा दादा तिथे समोरच एका इन्स्पेक्टरच्या टेबलवर बिस्कीट खात बसला होता. बिस्किटं, चॉकलेट्स, आणि बोरं समोरच होती. आपण हरवलोय, आपल्याला कुणी शोधत असेल, याचा गंधही त्याच्या चेहऱ्यावर नव्हता. मग स्टोरी कळली, ती अशी. तो बाहेर पायरीवर रडत होता. त्या बोरवाल्याने त्याला प्रश्न विचारले. पण रागावला असल्याने आपले आईवडील दुकानात आहेत, हे त्याने सांगितलेच नाही. म्हणजे काहीच बोलला नाही. तो रडतच होता. शेवट मुलगा हरवलेला आहे असं समजून बोरवाल्याने त्याला बोराच्या गाडीवर बसवला. बोरं खायला दिली. बोरं मिळाल्यावर दादा खुश झाला. त्याचं रडणं थांबलं. गाडीची ride तो enjoy करू लागला. बोरंवाल्याने त्याला पोलीस चौकीत नेऊन सोडला. फक्त चूक एकच केली, की जवळच्या पोलीस चौकीत जाण्याऐवजी त्याच्या घराच्या वाटेवरच्या पोलीस चौकीत तो गेला. त्यामुळे तो लगेच सापडला नाही. त्या पोलिसचौकीतही पोलिसांनी त्याला प्रश्न विचारले. पण त्याचा कॉन्व्हेंटचा युनिफॉर्म, गोरा रंग, भुरे केस, आणि निळसर डोळे याकडे बघून त्याला मराठी सोडून सर्व भाषेत प्रश्न विचारण्यात आले. बोरंवाल्यानेही बहुतेक पोलिसांना सांगितलं असावं, त्याला मराठी कळत नाही, म्हणून. दादाला तर मराठीशिवाय कुठलीच भाषा कळत नव्हती. आणि आपण चुकलोय वगैरे असं त्याला वाटलंच नव्हतं. बोरं, बिस्किटं, चॉकोलेट.. तो तर आपल्याच विश्वात खूष होता. आपणहून काहीच बोलला नव्हता.
शेवटी त्याला घेऊन आई-बाबा घरी आले. खरं तर सर्वच गोष्टी मला नीट आठवत नाहीत, ह्या मी नंतर ऐकलेल्या गोष्टी आहेत, पण त्या दिवशी शेजाऱ्या-पाजाऱ्यांबरोबर मी बाहेर वाट पाहत असलेली मला आठवतं. टांग्यातून तो उतरलेलाही आठवतो. आई-बाबांचे आणि इव्हन वाट बघणाऱ्या शेजाऱ्यांचे उजळलेले चेहरे मला आठवतात.

“मग तुझ्या बाबांनी त्यांचा नियम तेव्हापासून बंद केला?” चिरंजीवांनी विचारलं. त्यालाही गोष्टीत इंटरेस्ट आला होता.
"अजिबात नाही. तसं काहीही घडलं नाही. फक्त 'नाही' म्हणाल्यावर बहुतेक हात घट्ट पकडून ठेवत असतील."
मुलांना गोष्ट आवडलेली, पटलेली दिसली. पण सरळ सरळ बोलली, तर ती माझी कन्या कुठली?

“मॉम, ही स्टोरी तुझी आणि या प्लास्टिक ऍपलची नाहीच. ही आहे दादा-मामा आणि प्लास्टिक डबीची. मग ती स्पंजवाली प्लास्टिक डबी कुठेय? ती ठेवायला हवी ना या ऍपल बरोबर?” लॉयर कन्येने पॉईंट काढला.
“अगं हो, पण आज हे सफरचंद अचानक दिसलं. साऱ्या आठवणी उफाळून आल्या त्या दिवसाच्या. आता मुद्दाम शोधेन ती प्लास्टिकची डबी. पण त्यासाठी ती मिळेपर्यंत मला डॉलर स्टोअरमध्ये जात रहावं लागणार!” मीही डॉलर-स्टोअरमध्ये पुन्हा-पुन्हा जाण्याचा लायसन्स घेतला.





मंजिरी बर्वे

THE CREEPY ROBOT

One sunny day, Jasper Rabbit went to the creepy store. Jasper asked, “Mom, can I have a toy?” Jasper pleaded. His mom said yes. When they went to get the toy, there was a robot just for him. “Mom, mom, can I get this robot? It’s just for me, plus it also has big fluffy ears and a green t-shirt. It looks just like me.” “But it looks like on the back you have to take care of it. Are you sure you can take care of it?” Mom asked. “Of course, I can; I am a big boy!”

The next day, “yawn,” Jasper woke up. When he was getting ready for school… “AHHHHH!” The robot was doing everything Jasper was doing. Jasper was waving his arms, and so was the robot. He hid the robot in his closet. “Now you stay in here, all right?” He went downstairs to eat breakfast. “Umm, hey Jasper, why is the robot following you?” asked Mom. “Umm, what do you mean… AHHHHHHH! Why is it following me?” The robot was right behind Jasper. “Huh, why are you behind me? I thought you were in the closet. Fine, I will take you to school, BUT NO GETTING OUT!”

When Jasper went to school, he was very late. When the teacher was checking if everyone was here, she said, “Jasper… Jasper?” “Yes?” said the ROBOT in a little voice. “Jasper, is that you?” said the teacher. Before the robot said anything, Jasper rushed in. “Jasper? I thought you were in your seat,” said the teacher. “What are you talking about?” When Jasper looked at his seat, the robot was sitting there. “Oh, you little mean robot!” “JASPER ROGER RABBIT, NO TOYS IN SCHOOL!” said the teacher. “But… but… but…” Jasper said timidly. “No buts, no cuts, no coconuts! Now sit in the time-out corner and put that toy in your backpack!” the teacher shouted on the top of her lungs.

When Jasper came home, he dumped everything from his backpack, grabbed the robot, and said, “Hey, I told you to STAY in my backpack, not stay out of my backpack!” “I am sorry, I just got out of control,” said the robot.

After the fight, Jasper tried to do everything to get rid of it. He put a bunch of water on the robot, but then he came back. He dug and dug to the bottom of the dirt and buried the robot. And he dug and dug all over again.
When he went to sleep with a toy, but when he woke up, THE ROBOT WAS IN HIS ARMS! Jasper rushed out of bed and said, “AHHHHH! Why are you here? I buried you! You’re like, like magic!” Jasper was saying in his mind, “Since he’s a robot, I can pour a bunch of water on him, hehehaha!” He took him to the bathroom, but the robot said, “What are you doing?” “What am I going to do? Well, since you are being soooo annoying, I am going to put a bunch of water on you, and your thingamajig will die, and you will never work!” The robot's "thing" is pounding. Jasper carefully put him in the tub, but first, the robot dodged his head! The robot quickly escaped and said, “Run and run as fast as you can, you can’t catch me, I am the robot man!” The robot tried to run but it just ran like a robot: “Beep boop.” “Hey, robot, I won’t make you wet. Let’s just try to be friends.” “OK,” said the robot.
Day after day, they were getting along, and then they became best friends.
The End



Mahika Deshpande

कलादिग्दर्शक श्री. नितीन देसाई - एक आधुनिक इकारस?

जवळजवळ दोन वर्षांपूर्वी बॉलीवूडचे मशहूर कलादिग्दर्शक नितीन चंद्रकांत देसाई यांच्या आत्महत्येची बातमी समजली आणि मनामध्ये फारच खळबळ उडाली. नितीन देसाई यांनी भारतीय सिनेमात 'कलादिग्दर्शन' या क्षेत्राला एक वेगळीच खुबी आणली. '1942: ए लव्ह स्टोरी' (1994) या चित्रपटामुळे त्यांना फार प्रसिद्धी मिळाली. त्या चित्रपटात, काळानुसार वस्तूंची निवड आणि रंगछटा इतक्या सूक्ष्म पद्धतीने केली, की त्यांनी अगदी ऐतिहासिक वास्तवतेला स्पर्श केला. त्यानंतर 'हम दिल दे चुके सनम' (1999) मधल्या राजस्थानी हवेल्या, भव्य अंगण, रंगीबेरंगी भित्तीचित्रे, आणि पारंपरिक हस्तकला सर्वांना फारच IMPRESS करून गेल्या. त्यांच्या 'लगान' (2001), 'देवदास' (2002), 'जोधा अकबर' (2008) आणि 'अजिंठा' (2012) या चित्रपटावरून समजून आले, की नितीन देसाई फक्त सेट्सच बनवत नव्हते, ते त्या सेट्सना 'जिवंत' करत होते. खरं तर, नितीन देसाई यांनी भारतीय चित्रपटसृष्टीतील 'कलादिग्दर्शन' या क्षेत्राची व्याख्याच बदलून टाकली. त्यांनी हे दाखवून दिले, की दृश्यसंपन्नता आणि ऐतिहासिक तपशीलांची अचूकता या दोन्ही गोष्टी एकत्र नांदू शकतात. नितीन देसाईंना भारतीय चित्रसृष्टीतच नाही तर आंतरराष्ट्रीय चित्रसृष्टीतही एक मानाचं स्थान आहे.

त्यांच्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पांमध्ये 'सलाम बॉम्बे!', 'अमोक' (फ्रेंच चित्रपट, त्यासाठी देसाईना प्रीजिनी नामांकन मिळाले), 'जंगल बुक' 'कामसूत्र' कॅनडियन चित्रपट 'सच अ लाँग जर्नी' आणि 'होली स्मोक' यांचा समावेश आहे. त्यांनी 'स्लमडॉग मिलियनेयर' (2008) चित्रपटासाठी दोन सेट्सही तयार केले होते. त्यांच्या कर्तृत्वाची नोंद म्हणून २०२४ च्या अकॅडमी अवॉर्ड्समध्ये (ऑस्कर) 'IN MEMORIAM' विभागात त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

असं म्हणतात, की नितीन देसाई यांच्या निधनाचे प्रमुख कारण त्यांच्या ND Studios च्या आर्थिक अडचणी. त्यांच्या कंपनीने १८५ कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते, त्याची परतफेड २०२० पासून सुरू झाली होती. या कर्जामुळे कंपनी २५२ कोटींच्या कर्जबाजारीपणात अडकली होती. या परिस्थितीमुळे त्यांना मानसिक तणावाचा सामना करावा लागला, आणि त्यामुळेच त्यांनी आत्महत्येचा निर्णय घेतला. ही बातमी जेव्हा पहिल्यांदा समजली तेव्हा मला पहिली आठवण झाली ती एका ग्रीक पौराणिक कथेची.

इकारसची कथा ही एक प्रसिद्ध ग्रीक पौराणिक कथा आहे. इकारस हा डेडालसचा मुलगा. डेडालस हा एक अप्रतिम कारागीर आणि शोधकर्ता होता. क्रेटच्या राजा मिनोसने त्याला 'लॅबिरींथ' नावाचा एक विशाल आणि गुंतागुंतीचा भूलभुलैया बांधण्याचे काम दिले होते — तो मिनोसने अर्धमानव-अर्धबैल असलेल्या मिनोटॉरला कैद करण्यासाठी तयार केला होता.

असं म्हणतात, की डेडालसने अथेन्सचा नायक थेसियसला लॅबिरींथमधून मार्ग दाखवला आणि मिनोटॉरचा वध करण्यात मदत केली होती. त्यामुळे डेडालस कितीही बुद्धिमान असला तरी तो शेवटी राजा मिनोसच्या अप्रसन्नतेस पात्र ठरला. त्यामुळे रागावलेल्या मिनोसने डेडालस आणि त्याचा मुलगा इकारस यांना एका उंच मनोऱ्यात कैद करून ठेवले. कारण, मिनोसला काळजी होती, की डेडालस लॅबिरींथचे रहस्य आणखी कोणाला तरी सांगेल.
कैदेतून सुटण्यासाठी डेडालसने एक धाडसी योजना आखली. पक्ष्यांच्या पंखांचा संग्रह करून आणि ते मेणाने जोडून त्याने स्वतःसाठी आणि इकारससाठी दोन जोड पंख तयार केले. या पंखांच्या मदतीने ते उडून क्रेटमधून पळून जाणार होते.उडण्यापूर्वी डेडालसने मुलाला स्पष्ट सूचना दिल्या होत्या :

“सूर्याजवळ फार जाऊ नकोस, नाहीतर त्याच्या उष्णतेने मेण वितळेल. समुद्राजवळही फार खाली उडू नकोस, नाहीतर पाण्याच्या ओलसरपणामुळे पंख जड होतील.”

वडील आणि मुलगा दोघेही आकाशात झेपावले. सुरुवातीला इकारसने वडिलांचे म्हणणे ऐकले आणि उडण्याचा आनंद घेतला. जमिनीवरील लोक त्यांच्याकडे विस्मयाने पाहत होते. जणू देव आकाशात उडत आहेत असे वाटत होते त्यांना.

थोड्याच वेळात इकारस उत्साह आणि आत्मविश्वासाने भारावून गेला. उडण्याचा आनंद आणि स्वातंत्र्याच्या मोहाने तो वडिलांनी दिलेली चेतावणी विसरला. तो अधिकाधिक उंच जाऊ लागला — सूर्याच्या तेजाकडे आकर्षित होऊन.
पण जसजसा तो सूर्याजवळ पोहोचला, तसतसे त्याच्या पंखांतील मेण वितळू लागले. एकेक पिसं सुटू लागली, आणि शेवटी त्याचे पंख पूर्णपणे तुटले. संतुलन गमावून तो खाली समुद्रात कोसळला.
खरं म्हणजे, क्रिएटिव्ह आणि धाडशी लोकांना हा एक शापच असतो. स्वतःच्या जीवाची चिंता न करता ते नेहमीच सूर्याकडे झेप घेत असतात. आपण पृथ्वीवर बसून त्यांच्या धैर्याचं आणि कल्पकतेचं कौतुक करतो. प्रत्येक झेप पूर्वीच्या झेपेपेक्षा आणखी जास्तच उंच असते.

आपण म्हणतो, "That is crazy"
आपल्या कल्पकतेला पूर्ण न्याय देण्यासाठी नितीन देसाईंनी एक उंच, आर्थिक झेप घेतली.
आणि आपण म्हणालो "That is so outlandish, so irresponsible!"
पण सत्य हेच आहे, की या जगाच्या उन्नतीचे कारण आपल्यासारखी साधारण माणसं नाही, तर नितीन देसाईंसारखी एक असाधारण माणसं असतात..

One who can think outside the box.

मग ते कलादिग्दर्शक नितीन देसाई असोत, की विमानचालन क्षेत्रातील साम्राज्यवादी आणि हेल्स अँजेल्स सारख्या मोठ्या बजेटच्या हॉलीवूड चित्रपटांचे दिग्दर्शक हावर्ड ह्यूजेस असोत.
त्यांच्यासारख्या शेकडो असाधारण माणसांनी स्वतःची चिंता न करता सूर्याकडे झेप घेतली
म्हणूनच मनुष्य प्राणी अश्मयुगापासून आधुनिक युगापर्यंत वाटचाल करू शकला.
तुम्हाला काय वाटतं?



डॉ. चंद्रगुप्त वेदक

मानसविचारतज्ज्ञ, शिकागो

एकतरी ओवी अनुभवावी

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानेश्वरी । एकतरी ओवी अनुभवावी

श्रीमद्भगवद्गीता हा ग्रंथ हिंदू धर्मातील सर्वात महत्वाच्या पवित्र ग्रंथांपैकी एक मानला जातो. हा ग्रंथ व्यक्तीला कर्तव्य पालनासाठी आणि जीवनाच्या अंतिम वास्तवासाठी एक मार्गदर्शक स्तंभ आहे. भारतीय जनमानसात हजारो वर्षे श्री भगवद्गीतेचे अनन्यसाधारण महत्व मानले गेले आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी भागवतधर्माचा पाया रचताना, भगवद्गीतेवरील त्यांचं भाष्य 'ज्ञानेश्वरी' किंवा 'भावार्थदीपिका' या नावाने जगभर पोहोचवलं. ही मराठी भाषेतून वाहणारी एक अद्भुत ज्ञानाची गंगा आहे, ज्यामुळे सामान्य लोकांनाही परमार्थाचा सोपा मार्ग मिळाला. ज्ञानेश्वरीतील प्रत्येक ओवी म्हणजे अमृताचा एक थेंबच आहे, जो आत्मज्ञानाच्या वाटेवर प्रकाश टाकतो. इतकेच नव्हे, आजच्या धकाधकीच्या जीवनात अनेकांना मानसिक शांती देतो.

ज्ञानेश्वरीमधील सर्व ओव्या सर्वांनी वाचाव्या. पण 'एक तरी ओवी अनुभवावी' ह्या शीर्षकाला अनुसरून मी एक ओवी निवडली आहे. आज मी ज्ञानेश्वरीच्या नवव्या अध्यायातील २८५ व्या ओवी विवेचनासाठी घेतली आहे. संदर्भ ग्रंथांची सूची देत नाही, पण त्यांचे मनापासून आभार मानतो.

गीतेतील नववा अध्याय, ज्याला 'राजविद्याराजगुह्ययोग' असं म्हणतात, तो गीतेतील महत्त्वाच्या अध्यायांपैकी एक आहे. यात भगवान श्रीकृष्ण अर्जुनाला स्वतःच्या खऱ्या स्वरूपाबद्दल, भक्तीबद्दल आणि ज्ञानाबद्दलचे गुपित सांगतात. इथे भगवान स्वतःला जगाचा आधार, कर्ता आणि साक्षीदार म्हणून दाखवतात. याच संदर्भात, २८५ वी ओवी भगवंताचं हे सर्वव्यापी आणि सर्वसमर्थ स्वरूप अगदी स्पष्टपणे अधोरेखित करते. ओवी भगवंताच्या सर्वव्यापी असण्याबद्दल आणि त्यांच्या अफाट शक्तीबद्दल त्यांच्याच तोंडून सांगते.

ओवीचं मूळ स्वरूप आणि सोपा अर्थ:
“जो ऐसा समर्थु । तो मी जगाचा नाथु ।
आणि गगनाऐसा साक्षिभूतु । तोही मीचि॥” ज्ञानेश्वरी अध्याय ९, ओवी २८५
या ओवीचा सरळ अर्थ असा:

जो ऐसा समर्थु: जो इतका (खूपच) सामर्थ्यवान आहे.

तो मी जगाचा नाथु: तो मीच या सगळ्या जगाचा स्वामी (मालक) आहे.

आणि गगनाऐसा साक्षिभूतु: आणि आकाशासारखा (सगळीकडे पसरलेला) साक्षीदार (पाहणारा) आहे.

तोही मीचि: तोही मीच आहे.

या ओवीमध्ये भगवान स्वतःच्या दोन मुख्य गुणांबद्दल सांगतात: एक म्हणजे त्यांची प्रचंड शक्ती आणि दुसरं म्हणजे त्यांचं सगळीकडे साक्षी म्हणून असणं. हे दोन्ही गुण भगवंताच्या परब्रह्म स्वरूपाचा अविभाज्य भाग आहेत.
श्रीमद्भगवद्गीतेतील मूळ श्लोक असा आहे,

“ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजन्तो मामुपासते।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुदा विश्वतोमुखम्॥” ९-१५

याचा शब्दार्थ असा: दुसरे काही ज्ञानयोगी मज निर्गुण-निराकार ब्रह्माची ज्ञानयज्ञाने अभेदभावाने पूजा करीत माझी उपासना करतात आणि दुसरे काही अनेक रूपांनी असलेल्या मज विराट-स्वरूप परमेश्वराची नाना प्रकारांनी उपासना करतात.
या अध्यायात, भगवान श्रीकृष्ण त्यांचा सर्वोच्च महिमा प्रकट करतात, अर्जुनासमोर श्रद्धा, भक्ती आणि विस्मय निर्माण करतात. जरी श्रीकृष्ण अर्जुनासमोर त्याच्या वैयक्तिक स्वरूपात उभे असले, तरी, ते त्यांचे मूळ स्वस्वरूप अधोरेखित करत आहेत
ओवीचं विश्लेषण
१. 'जो ऐसा समर्थु । तो मी जगाचा नाथु ॥'
या पहिल्या ओळीत भगवान स्वतःची अफाट शक्ती आणि जगावर आपलं स्वामित्व जाहीर करतात. 'ऐसा समर्थु' या शब्दांतून भगवंताच्या सामर्थ्याची कल्पना येते. ही शक्ती फक्त भौतिक किंवा जगापुरती मर्यादित नाही, तर ती निर्मिती, स्थिती आणि विनाश या तिन्ही अवस्थांना व्यापून आहे. भगवान फक्त जगाचे निर्माते नाहीत, तर ते त्याचे पालनकर्ते आणि शेवटी संहारकही आहेत.

सृष्टीचा कर्ता: भगवान हेच या सगळ्या ब्रह्मांडाचे मूळ कारण आहेत. त्यांच्या इच्छेशिवाय एकही कण तयार होऊ शकत नाही. सगळं चराचर जग त्यांच्याच इच्छेतून, त्यांच्याच संकल्पशक्तीतून तयार झालं आहे.

स्थितीचा आधार: फक्त निर्मिती करून ते थांबत नाहीत, तर ते या सृष्टीचं पालनपोषणही करतात. प्रत्येक जीवाचं भरणपोषण, नियमन आणि संतुलन त्यांच्याच नियंत्रणाखाली चालतं. सूर्य, चंद्र, तारे, ऋतूचक्र, जीवनचक्र हे सगळं त्यांच्याच नियमांनुसार अव्याहतपणे सुरू राहतं.

लयाचा स्वामी: जेव्हा योग्य वेळ येते, तेव्हा तेच या सृष्टीचा विनाश करून तिला पुन्हा आपल्या मूळ स्वरूपात विलीन करतात. प्रलयकाळात सगळं काही त्यांच्यातच सामावून जातं.
भगवंताच्या इच्छेने सर्व काही चालते. संत तुकाराम महाराजांच्या भाषेत सांगायचे तर, "चाले हे शरीर कोणाचिया सत्ते। कोण बोलविता हरिविण॥"
भगवंत कोणत्याही कर्माने बांधले जात नाहीत, तरीही सगळी कर्मे त्यांच्याच प्रेरणेने घडतात. ते 'अकर्ता' असूनही सर्व 'कर्ता' आहेत, हेच त्यांचं परम सामर्थ्य आहे. तेच अंतिम आधार आणि सगळ्या चांगल्या गोष्टींचं मूळ आहेत.

२. 'आणि गगनाऐसा साक्षिभूतु । तोही मीचि ॥'
ओवीचा दुसरा भाग भगवंताच्या 'साक्षी' स्वरूपावर प्रकाश टाकतो. 'गगनाऐसा साक्षिभूतु' ही उपमा खूपच योग्य आहे. आकाश सगळीकडे आहे. ते कोणत्याही वस्तूने, घटनेने किंवा क्रियेने लिप्त होत नाही, तरीही ते सगळं काही आपल्यात सामावून घेतं. आकाशात ढग येतात, पाऊस पडतो, वादळे होतात, पण आकाश मात्र निर्विकार आणि अलिप्त राहतं. त्याचप्रमाणे, भगवान या विश्वातील प्रत्येक घटनेचे, प्रत्येक कर्माचे, प्रत्येक विचाराचे साक्षीदार आहेत.

अलिप्त साक्षी: भगवान विश्वातील प्रत्येक क्रियेचे साक्षी आहेत, परंतु ते त्या क्रियांमध्ये गुंतत नाहीत. ते कोणत्याही कर्माचे फळ भोगत नाहीत किंवा त्या कर्माने प्रभावित होत नाहीत. ते तटस्थपणे सगळं काही पाहतात. जसे सूर्य जगाला प्रकाश देतो, पण जगातील चांगल्या-वाईट गोष्टींशी त्याचा संबंध नसतो, त्याचप्रमाणे भगवान साक्षीभूत आहेत. "मी जगाचा नाथ" – हे वाक्य अहंकाराचे नाही, तर आत्मज्ञानाचे आहे. परमात्मा सर्व गोष्टींचा अधिपती आहे, पण तो कुणावर अधिपत्य गाजवत नाही. त्याचे अधिपत्य हे प्रेम, करुणा आणि साक्षीभावातून आहे.

सर्वव्यापी अस्तित्व: आकाशाप्रमाणेच भगवान सगळीकडे व्यापलेले आहेत. ते प्रत्येक जीवाच्या हृदयात, प्रत्येक कणात, प्रत्येक दिशेत आणि प्रत्येक काळात उपस्थित आहेत. त्यांच्या अस्तित्वाशिवाय काहीही नाही. ते अनादी, अनंत आणि अविनाशी आहेत.

कर्मफलस्य द्रष्टा: मनुष्य जे काही कर्म करतो, ते चांगलं असो वा वाईट, भगवान त्याचे साक्षी असतात. ते प्रत्येक कर्माची नोंद ठेवतात आणि त्यानुसार फळ देतात. त्यांच्यापासून काहीही लपलेलं नाही.

आपल्या प्रत्येक विचाराचे, शब्दाचे आणि कृतीचे ते साक्षी आहेत. यामुळेच माणसाला आपल्या कर्मांबद्दल जबाबदार राहावं लागतं.

साक्षी असणं म्हणजे फक्त पाहणं नाही, तर ते ज्ञान आणि प्रकाशाचं प्रतीकही आहे. त्यांच्या नुसत्या अस्तित्वाने सगळं ज्ञान प्रकट होतं. तेच सगळ्या ज्ञानाचं मूळ आणि अंतिम ठिकाण आहेत. ते सगुण रूपात जगाचे नाथ असले तरी, निर्गुण, निराकार रूपात ते साक्षीभूत आहेत. ही दोन्ही रूपं एकाच परब्रह्माची दोन वेगवेगळी बाजू आहेत. 'तुज सगुण म्हणों की निर्गुण रे| सगुण निर्गुण एकु गोविंदु रे' हा प्रसिद्ध अभंग श्री सुधीर फडके यांच्या रसाळ वाणीत तुम्ही ऐकला असेलच!

ओवीचं तात्त्विक आणि आध्यात्मिक महत्त्व

ही ओवी फक्त भगवंताच्या सामर्थ्याचं आणि साक्षीत्वाचं वर्णन करत नाही, तर ती अनेक खोल आध्यात्मिक तत्त्वं उलगडते:

१. अद्वैतसिद्धान्त: ही ओवी अद्वैत सिद्धांताला बळकटी देते. भगवानच जगाचा नाथ आहेत आणि तेच साक्षी आहेत, याचा अर्थ सगळं काही भगवंतामध्येच आहे. द्वैत नाही, फक्त एकच सत्य आहे. जीवात्मा आणि परमात्मा यांच्यातील एकरूपता यातून दिसते. परमेश्वर समर्थ आहे म्हणजे तो सृष्टी निर्माण करणारा आहे. ही समर्थता केवळ बाह्य जगात नाही, तर सर्वांच्या अंत:करणातही आहे. प्रत्येक जीवात परमेश्वराची समर्थता आहे.. "तोही मीचि" – हे वाक्य अद्वैत वेदांताचं सार आहे. परमात्मा आणि जीवात्म्याचे उपाधीविरहित मूळ स्वरूप यांच्यात भेद नाही. हे आत्मज्ञान म्हणजेच मोक्ष.

२. भक्ती, शरणागती: जेव्हा आपल्याला हे ज्ञान होतं, की भगवानच सर्वसमर्थ आहेत आणि तेच आपले अंतिम नाथ आहेत, तेव्हा आपोआप त्यांच्या चरणी शरण जावं वाटतं. त्यांच्यावर पूर्ण विश्वास ठेवून जीवन जगणं हीच भक्ती आहे.

३. कर्मयोग, नैतिक आचरण: भगवंताच्या साक्षित्वाची ही जाणीव आपल्या प्रत्येक कर्मावर आणि विचारांवर एक नैतिक बंधन आणते. आपण जे काही करतो, ते भगवान पाहत आहेत, या विचाराने माणूस वाईट कामांपासून दूर राहतो आणि चांगली कामं करण्यास प्रवृत्त होतो. जसे रस्त्यावर वेगमर्यादा ना पाळणारी गाडी पुढे पोलिसमामाची गाडी आहे हे नुसते कळले तरी आपोआप हळू होते ना? नैतिक आचरण हे कर्मयोगाचं एक महत्त्वाचं अंग आहे.

४. निर्भयता, शान्ती: ज्याला हे ज्ञान होतं, की सर्वसमर्थ भगवानच त्याचा नाथ आहे आणि तोच त्याचा साक्षी आहे, त्याला कोणत्याही गोष्टीची भीती वाटत नाही. तो निर्भयपणे जीवन जगतो, कारण त्याला माहीत असतं की भगवान नेहमीच त्याच्यासोबत आहेत. ही जाणीव त्याला मनाची शांती आणि समाधान देते.
जेथे जातो तेथे तू माझा सांगाती। चालविसी हाती धरोनिया।
चालो वाटे आम्हा तुझासी आधार। चालविसी भार सवे माझा।।

५. आत्मज्ञान: या ओवीचा अंतिम उद्देश आत्मज्ञानाकडे घेऊन जाणं आहे. 'तोही मीचि' या शब्दांतून भगवान स्वतःलाच साक्षी म्हणून प्रकट करतात. याचा अर्थ असा की, आपल्या आत असलेला आत्माच तो परम साक्षी आहे. साधनेद्वारे जेव्हा जीवात्म्याला परब्रह्माशी एकरूपतेची अनुभूती मिळते, तेव्हा त्याला आत्मज्ञान मिळते.

ज्ञानेश्वर माऊलींनी या ओवीच्या माध्यमातून भगवंताच्या परमपदाचं खूप सोप्या आणि रसाळ भाषेत वर्णन केलं आहे. त्यांनी गीतेतील खोल तत्त्वज्ञान सामान्य लोकांसाठी सोपं केलं. माउलींच्या लेखनात भक्ती आणि ज्ञान यांचा सुंदर संगम आहे. ही ओवी केवळ तात्त्विक विचार मांडत नाही, तर भक्ताच्या अंतःकरणात परमेश्वराची अनुभूती जागवते. माऊलींचा भर भक्तिमार्गावर आहे, पण ज्ञान आणि वैराग्याशिवाय भक्ती पूर्ण होत नाही, हेही त्यांनी स्पष्ट केलं. या ओवीच्या माध्यमातून भक्त भगवंताच्या सर्वव्यापी अस्तित्वाची आणि सामर्थ्याची जाणीव करून घेतो, ज्यामुळे त्याची श्रद्धा, भक्ती अधिक मजबूत होते. ज्यामुळे तो आत्मज्ञानाच्या मार्गावर पुढे जातो.
ज्ञानेश्वरीतील हा अध्याय आणि विशेषतः ही ओवी, भगवंताच्या 'अचिन्त्य' स्वरूपाचं दर्शन घडवते. ते जवळ असूनही दूर आहेत, आणि दूर असूनही जवळ आहेत. ते सगळीकडे असूनही कोणत्याही विशिष्ट ठिकाणी नाहीत. हेच त्यांचं मायातीत आणि गुणातीत स्वरूप आहे.
आजच्या काळातही ही ओवी अत्यंत सुसंगत आहे. कशी?

· **आंतरिक शक्ती वाढवणे**: जेव्हा आपल्याला वाटते, की काहीच आपल्या हातात नाही, तेव्हा या परमशक्तीवर विश्वास ठेवल्याने मन शांत होते. 'मी एकटा नाही, कोणीतरी आहे जे सगळं सांभाळत आहे' ही भावना खूप दिलासादायक असते. यामुळे चिंता कमी होते आणि आपण अधिक धैर्याने संकटांना सामोरे जाऊ शकतो.

·

नैतिक जीवन जगणे: आपल्या प्रत्येक कृतीचा, प्रत्येक विचाराचा साक्षीदार कोणीतरी आहे (तो ईश्वर असो वा आपले स्वतःचे अंतर्मन). आजच्या जगात जिथे अनेकदा नैतिक मूल्यांची घसरण होताना दिसते, तिथे ही ओवी आपल्याला आपल्या प्रत्येक कृतीबद्दल अधिक जागरूक आणि जबाबदार बनवते. 'मी जे काही करतोय ते कोणीतरी पाहतंय' किंवा 'माझ्या अंतर्मनाला ते माहीत आहे' या जाणिवेने आपण वाईट गोष्टींपासून दूर राहतो आणि चांगले कर्म करण्यास प्रवृत्त होतो. यामुळे समाजात प्रामाणिकपणा आणि नैतिकता वाढण्यास मदत होते. तसेच, ही जाणीव आपल्याला स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास आणि आत्मसुधारणेसाठी प्रेरित करते.

मानसिक आरोग्य सुधारणे: परमशक्तीवर विश्वास ठेवल्याने आणि आपल्या कर्मांबद्दल जागरूक राहिल्याने मनातील भीती आणि चिंता कमी होते.

· **जीवनाला अर्थ प्राप्त होणे**: केवळ भौतिक सुखांच्या मागे न धावता, जीवनाचा खरा अर्थ आणि उद्देश शोधण्यास ज्ञानेश्वरी मदत करते. अनेकांना ह्या शोधात शांती मिळते.

· **एकता आणि सलोखा**: 'एकच परमेश्वर जगाचा नाथ आहे' या विचाराने सर्व मानव समान आहेत, ही भावना वाढते. यामुळे समाजात प्रेम, सहकार्य आणि सलोखा वाढतो.
आधुनिक मानसशास्त्रात ‘स्व-चेतना’ आणि ‘स्व-नियंत्रण’ यांचा विचार केला जातो. ज्ञानेश्वर माऊलीं म्हणतात की आत्मा म्हणजेच परमात्मा – म्हणजेच प्रत्येक व्यक्तीमध्ये दिव्यता आहे. ही ओवी आत्मविश्वास, आत्मनियंत्रण आणि आत्मसाक्षात्कार यासाठी प्रेरणा देते. अर्थातच ओवीला अनुसरून काही दैनंदिन साधना करणे अभिप्रेत आहे

ज्ञानेश्वर माऊलींनी या ओवीच्या माध्यमातून भगवंताच्या अनंत स्वरूपाची एक झलक दाखवली आहे, जी आजही कोट्यवधी भक्तांना आणि जिज्ञासूंना प्रेरणा देत आहे. संत ज्ञानेश्वरांनी रचलेली ज्ञानेश्वरी ही केवळ गीतेची टीका नाही, तर ती एक जीवनदृष्टी आहे.



श्रीदत्त राऊत, शिकागो

श्री भृशुंड गणेश

तू मयुरेश्वर विघ्नेश्वर तू |
तू निज भक्तांचा दाता |
भवभय चिंता हरूनी देता |
सुखद अनुभव शुभ वार्ता |
एकदंत अन् शब्दब्रह्म तुम्ही |
गजानना हो गणराया |



अष्टविनायकांपैकी विदर्भातील एक गणपती श्री भृशुंड गणेश.

श्री भृशुंड गणपती हे देवस्थान नागपूरहून ६२ किमी. अंतरावर भंडारा जिल्ह्यात मेंढा ह्या ठिकाणी आहे. श्री भृशुंड गणेश, मेंढा किंवा श्री क्षेत्र भंडारा असे देखील म्हणतात.

७०० वर्षांपूर्वीचे हे हेमाडपंथी मंदिर आहे. मुद्गल पुराणात ह्याचा उल्लेख आहे. त्या वर्णनाप्रमाणे त्याचे नाव भृशुंड गणेश असे पडले.

आठ फूट उंच, चार फूट रुंद अशी ही मूर्ती आहे. अखंड रक्ताश्म शिळेवर कोरलेली ही मूर्ती सिंदूरचर्चित, चतुर्भुज आणि मूषकारुढ आहे. उजवा पाय खाली सोडलेला व डाव्या पायाची मांडी, हातात पाश, अंकुश अशी आयुधं, आणि मोदक. उजवा वरद हस्त आहे.

शिरोभागी पंचमुखी शेषफणा, मुखमंडळाचे जागी नाकपुड्या, डोळे, मिशा आहेत. असे त्या मूर्तीचे विलोभनीय आणि आकर्षक, मोहक रूप आहे.

मंदिरात प्रवेश करताच मन प्रसन्न होते. मंदिराच्या प्रवेशद्वाराच्या उजव्या बाजूला हनुमानाची एक भव्य मूर्ती आहे. डाव्या बाजूला सुंदर शिवलिंग आहे. नंदीची प्रतिमा आहे. सभामंडपाच्या बाजूला एक छोटासा विश्राम कक्ष आहे.

बाजूला संस्थेचे ऑफिस आहे. ह्या मंदिराची स्थापना ११३० ते ११५० च्या काळात झाली आहे. चक्रधर स्वामी ह्या ठिकाणी आले होते. हाच तो काळ.

ह्या मंदिराविषयीची आख्यायिका अशी आहे, की पूर्वी या ठिकाणी जंगल होते. तिथे एक कोळी राहत होता. तो जंगलामध्ये लुटमार, वाटमारी करून आपला उदरनिर्वाह करीत असे. त्यावेळी मुद्गल ऋषी त्याला भेटले. मुद्गल ऋषींच्या म्हणण्यानुसार त्याने आपले आचरण केले. त्यामुळे त्या कोळ्याच्या जीवनात परिवर्तन झाले. मुद्गल ऋषींनी त्याला गणेश मंत्र दिला आणि गणेशाची उपासना करण्यास सांगितले. त्या कोळ्याने गणपतीची भक्ती आणि उपासना केली. खूप तपस्या केली. तपस्येनंतर त्या ठिकाणी वारूळ तयार झाले.

पुन्हा जेव्हा मुद्गल ऋषी त्या ठिकाणी आले, तेव्हा त्यांना त्या मंत्राचा आवाज ऐकू आला, जो गणेश मंत्र त्यांनी त्या कोळ्याला दिलेला होता. मुद्गल ऋषींनी ते वारूळ बाजूला करताच त्या ठिकाणी त्यांना गणेश रूप दिसले. त्या वारुळाचे गणेशात रूपांतर झाले होते आणि म्हणून तेव्हापासून त्याचे नाव भृशुंड असे पडले.

भ्रूमध्ये शुंड असा भृशुंड गणेश.
इथे लिहिताना मला खूप आनंद होतो आहे, की हे देवस्थान बघण्याचे भाग्य किंवा योग म्हणा मला लाभले आहे. अत्यंत आकर्षक, मोहक असे हे गणेशाचे रूप मी अगदी जवळून बघितले आणि डोळ्यात साठवून ठेवले आहे.
सगळ्या गणेश भक्तांनी जरूर एकदा ह्या देवस्थानाला भेट द्यावी. जरा वेगळे आणि आश्चर्यकारक असे हे गणेशाचे रूप मला भावले. शेवटी श्री गणेशाच्या चरणी लीन होऊन मी म्हणेन.

श्री अनंतकोटी ब्रह्मांडनायक
श्री महायोगी राजराजेश्वर
श्री मुद्गल महर्षी कृपांकित, स्वस्वरूप समाधिस्थ
श्री चैतन्य मूर्ती, महातपस्वी, भंडारा क्षेत्राधीश
श्री भृशुंड गणेश महाराज की जय.



धन्यवाद !!!

मीनाक्षी प्र. हेडाऊ

लहानपण दे गा देवा

स्थळ: माझं घर
मी जरा भाजी निवडत बसले होते (कशासाठी? कोणासाठी? सारे काही पोटासाठी). घरात एकदम शांतता, भीषण वगैरे नाही पण माझे विचार मलाच ऐकू येतील एव्हढी शांतता. माझ्या मनांत विचारांचा कल्लोळ. आईबाबांच्या आठवणींनी मन जरा चलबिचल झालं होतं पण त्याच आठवणी मला माझ्या लहानपणात घेऊन गेल्या.
माझं लहानपण (४०-४५ वर्षांपूर्वीच्या)एका मध्यमवर्गीय कुटुंबात गेलं. लगेच माझ्या वयाचा अंदाज करायची काही गरज नाही हं!
त्या वेळचा मध्यमवर्ग आजच्यापेक्षा बराच वेगळा होता. माझं, मला आठवणारं बालपण एकदम छान होतं. आयुष्याची पहिली काही वर्षं मला तरी आठवत नाहीत, अहो खूप लहान होते ना! म्हणजे, मी वयाच्या दुसऱ्या तिसऱ्या वर्षापासून गाणं, नाच शिकायला लागले, लहानपणापासूनच मला चित्र काढायची, काहीतरी लिहायची आवड होती असलं काहीही मी तुम्हाला सांगू शकत नाही कारण मला काही आठवत नाही आणि खरं सांगू का, तसं काही नव्हतंच!!! मला आठवणारं बालपण हे साधारण पहिली दुसरीपासूनचं आहे.
पहिली ते दहावी शाळा एकच. एकदम शुद्ध मराठी मीडियम! इंग्लिश सोडून सर्व विषय मराठीत!!! शाळेची त्या काळची इमारत अजूनही डोळ्यासमोर आहे. छान होतं ते जग!

आमच्या घराचे, इतर घरांसारखेच,काही नियम होते आणि ते नियम आम्हाला पाळावे लागत होते. आईबाबांचा शब्द हा शेवटचा आणि त्याच्यात कधीच काही वावगं वाटलं नाही, कारण दुसरं काहीच माहीत नव्हतं!!! घरातल्या नियमांमधला महत्वाचा नियम म्हणजे कुठल्याही गोष्टीचा हट्ट करायचा नाही. हट्ट केला तर ती गोष्ट मिळण्याची शक्यता फारच कमी असायची. संध्याकाळी लवकर घरी यायचं हा नियम तर खूप वर्षं होता. बाबांशी वाद घालण्याची हिंमतच नव्हती, पण आईशी वाद घालण्याचाही सवाल पैदा होत नव्हता कारण तसं केलं तर बाबांची बोलणी खायला लागायची.

लहानपण म्हटलं, की आठवतात लहानपणचे खेळ! स्वस्त आणि मस्त!!! सागरगोटे, गोट्या, पत्ते, लपंडाव, लगोरी,विटीदांडू, अप्पारप्पी! आणि अफाट कल्पनाशक्ती!!! वाडा संस्कृतीमध्ये वाढल्यामुळे हे सगळे खेळ आम्ही खेळायचो. वेळ मिळाला, की खेळ! आईवडिलांवर प्ले डेट वगैरे ठरवायची कधी वेळच आली नाही. एक गंमत सांगते, आमचे बाबा आम्हाला बोलवण्यासाठी एका विशिष्ट प्रकारची शिट्टी वाजवायचे.

बाबांची शिट्टी वाजली, की मग काहीही कारण न देता, (म्हणजे अजून पाच मिनिटं, डाव पूर्ण झाला की वगैरे,) घरात परत जायचं. पण शिट्टी वाजवून किती लवकर बोलावलं, खेळायला मिळालंच नाही वगैरे काहीही तक्रारी नसायच्या. अशा ह्या मित्रमैत्रिणींबरोबरचं लहानपण! खूप नातेवाईकांच्या , भावाबहिणींच्या (हो, आम्ही ते कझीन वगैरे काही म्हणत नाही हं, ती सगळी आमची भावंडंच!) बरोबर घालवलेले क्षण, ह्याची सगळी मजा तर काही औरच होती.

पण कधी आम्ही सगळे मोठे झालो हे कळलंच नाही. लहान असताना मोठं व्हायची घाई होती का नाही ते आठवत नाही पण आता मागे वळून बघताना पुन्हा बालपण येणार नाही हे जाणवतं. पण त्याची खंत न बाळगता त्या दिवसांच्या आठवणी काढून त्यात रममाण व्हायचं, ह्यात पण एक गंमत असते नाही का??

तुमच्या लहानपणच्या काय काय गंमती जमती होत्या? तुम्ही कुठले खेळ खेळलात जे तुमच्या कायम आठवणीत राहिले? तुमच्या घरचे काय काय नियम होते? तुम्ही तुमच्या मुलांसाठी काय नियम घालून दिले होते? मला जरूर कळवा.



रश्मी चापेकर

लोणावळ्याची चिक्की

मोठमोठ्या रस्त्यावरील अनेक गावे काही ना काही खाद्यपदार्थासाठी अतिशय प्रसिद्ध आहेत. दूरदूरच्या गावावरून येणारे बहुतेक प्रवासी ते खाद्यपदार्थ खाण्यासाठी आतुरतेने वाट पाहत असतात. मग ती भेळ असो, की बटाटेवडे असो, की चणे असो किंवा आग्र्याचे पेठे असोत. तेही विशिष्ट फेरीवाल्याकडून किंवा एसटी स्टँड अगर रेल्वे स्टेशनवरील विशिष्ट दुकानात हमखास मिळणारे पदार्थ.
लहानपणापासून अनेक वेळा पुणे मुंबई हा प्रवास झालेला आहे. ठाणे व मुंबईत अनेक नातेवाईक आहेत. म्हणजे बरेच नातेवाईक पुणे आणि मुंबई या दोन ठिकाणी एकवटलेले. मग काय, या निमित्ताने अगदी वर्षभरात अनेक वेळा कोणाचा तरी प्रवास लोणावळ्यावरून व्हायचाच.
आम्ही मुलं फार आतुरतेनं वाट बघायचो अशा मुंबईकडून येणाऱ्यांची ....मुलंच काय पण मोठी माणसंही वाटेकडे डोळे लावून असायची....

अहो, कशाची म्हणून काय विचारता, रस्त्यात लागणाऱ्या 'लोणावळा' गावच्या रेल्वेस्टेशन आणि एसटी स्टँडवर वर मिळणाऱ्या मगनलाल चिक्कीची! बहुतेक नातेवाईक लोणावळ्याची चिक्की मुलांसाठी आणायचे..... मगनलाल चिक्की म्हटली, की सर्व मुलं अगदी आनंदून जायची. चिक्कीतील गुळाची गोडी आणि मस्त भाजलेल्या दाण्याची चव वेगळीच असते. गोड आणि कुरुम कुरुम पदार्थ कोणत्या मुलांना आवडणार नाहीत?

प्रत्येक वेळी लोणावळ्याला थांबले, की चिक्कीच्या एका ठरावीक दुकानात कधी एकदा जातोय असे वाटायचे. बरेच वेळा प्रवासीही ड्रायव्हरला हमखास सांगतात, की बाबा रे, लोणावळ्याच्या एखाद्या चिक्कीच्या दुकानाजवळ गाडी थांबवशील का?

लोणावळ्यात अनेक प्रकारची चिक्की मिळते, पण मगननालच्या चिक्कीसारखी चव इतर चिक्कींची मला तरी चाखायला मिळाली नाही. मगनलाल चिक्कीच्या चवीला मला तरी वाटते अजून अजिबात तसा पर्याय नाही.
मगनलाल चिक्कीचे पाकीट पाहिले, की सर्व मुलं अगदी पाघळून जायची. पदार्थ एकच पण ठरावीक लोकांनी केलेल्या त्या पदार्थाची चव वेगळीच असते. जशी पुण्यातील चितळे बंधूंची मिठाई आणि बाकरवाडीची चव तुम्हाला दुसऱ्या दुकानदाराने केलेल्या बाकरवडीत मिळत नाही.
त्यातही एसटी स्टँडजवळ खालच्या बाजूला एक फक्त खास मगनलाल चिक्कीचे दुकान आहे. त्या ठिकाणी बनावटी माल मिळत नाही. भले ती थोडीशी महाग असते पण मगनलाल यांच्या अधिकृत कारखान्यातच केलेली व चविष्ट अशी चिक्की त्या ठिकाणी मिळते.

अहो, एकदा का तुम्ही त्या दुकानात गेलात, की तुम्हाला फक्त मगनलाल चिक्कीचेच व इतर मिठाईचे पदार्थ मिळतात. आणि चिक्कीचेही किती किती प्रकार. काजू चिक्की, बदाम चिक्की, अंजीर चिक्की, पिस्ता चिक्की, तीळ चिक्की, चना चिक्की, खोबरे चिक्की. नुसती नावे ऐकूनच तुमच्या तोंडाला पाणी नक्कीच सुटले असेल, आणि विशेषतः ज्याला गोड खाण्याची सवय आहे किंवा आवडते त्यांना नक्कीच चिक्की आवडत असेल. आणि हो, जरी चिक्कीमध्ये कॅलरीज जास्त असल्या तरी विशेषतः हिवाळ्यात त्यात असणाऱ्या स्निग्धमय दाण्यांनी व गुळाने तुमच्या शरीराला लागणारी ऊर्जा नक्कीच मिळते. जिभेचे चोचले तर वर्षभर चिक्कीने कधीही पुरवले जातात. एकदा चिक्की खाल्ली, की बराच वेळ भूक पण लागत नसे त्यामुळे घरी कधी पोहोचू याची आम्हाला काळजी वाटत नसे.

रेल्वेने प्रवास करत असू, तर लोणावळा स्टेशन आता येणार आहे म्हटलं, की अगोदरच लवकर उतरण्यासाठी प्रवासी गाडीच्या दरवाजाजवळ येऊन थांबायचे.... लोणावळा आगिनगाडी स्थानकात गाडी थांबली, की लोक भरभरा खाली उतरत मगनलाल चिक्कीच्या दुकानाच्या दिशेनं पळायचे... विशेषतः एका दुकानाभोवती अश्शी गर्दी जमायची ना! त्या दुकानात काम करणारे अनेक मजूर, गाडी आली की तयारच असायचे. एकामागे एक भराभर चिक्कीची पाकिटे प्रवाशांना देऊन व पटकन पैसे घेऊन गाडी सुटायच्या आत लोक परत यायचे. एखाद्याकडे सुट्टे पैसे नसतील तर मग मात्र इतर प्रवासी वैतागायचे आणि त्याला दुसऱ्या बाजूला जायला सांगायचे. काही मित्र अगर नातेवाईक बरोबर प्रवास करत असतील तर प्रत्येक जण वेगवेगळ्या प्रकारची चिक्की घेत असत. इकडे गाडीत बसलेली मंडळी आपलं माणूस चिक्की घेऊन कधी येतंय, हे खिडकीतून सारखं डोकावत बघत बसायचे....
पण खरंच, या मगनलाल चिक्कीच्या चवीला अख्ख्या महाराष्ट्रभर तोडच नव्हती....त्याची चव, त्याची गुणवत्ता जी होती ती सुरुवातीपासून ते शेवटपर्यंत अगदी एकच.... म्हणूनच हवीहवीशी! एरवी रेल्वेस्टेशन, बसस्टँडवरचं काहीही खाण्यास मज्जाव करणारी आमच्या घरातील सर्वच मंडळी, याला मात्र अपवाद ठरायची....माझंच मला आश्चर्य वाटतं कधीकधी...असो...
सुमारे चाळीस वर्षे भारतातील रेल्वेमधून प्रवास केला नव्हता. १९८५ या वर्षी पुणे ते दिल्ली रेल्वे प्रवास झाला होता. भारतात अनेक नवीन नवीन तंत्रज्ञान वाढत आहे. रेल्वे प्रवासातही कितीतरी

बदल झाल्याचे वाचले आहे. ह्यावेळी सध्या रेल्वेमध्ये कसा प्रवास असतो हे अनुभवण्यासाठी ठाणे ते पुणे असा प्रवास करण्याची संधी मिळाली. अहो, संधी मिळाली म्हणण्यापेक्षा मुद्दामच हा प्रवास ठरवला होता.

लोणावळा रेल्वे स्टेशनवर आम्ही प्रवास करत असलेली रेल्वे नेहमीप्रमाणे थांबली व अनेक लोकांनी मगनलालच्या वेगवेगळ्या चिक्क्या विकत आणल्या. रेल्वे गाडी लोणावळ्यातून पुण्याकडे जाण्यासाठी सुटली. मग गाडीमध्ये मित्रमंडळी अगर नातेवाईक एकमेकांना त्यातील त्यांनी खरेदी केलेल्या वेगवेगळ्या प्रकारच्या चिक्कीचे काही तुकडे देऊन सगळ्या प्रकारच्या चिक्क्या खाण्याची मजा लुटू लागले. आणि हो, त्यातील शेजारी बसलेले काही प्रवासी एकमेकांना माहिती नसताना किंवा ओळख नसतानाही त्यांनाही चिक्की देत होते. भारतात आता लोकांकडे बरेच पैसे झाले आहेत. समृद्धता दिवसेंदिवस वाढत आहे त्यामुळे मला वाटले आता एकमेकांना आपल्या पाकिटातील चिक्कीचे तुकडे देणे बंद झाले असेल, पण गेल्या वर्षी ज्यावेळी मी भारताला गेलो त्यावेळी परत ते अनुभवले.

आपला आनंद आपल्याभोवती असणाऱ्या लोकांना वाटणे, हा आपल्या संस्कृतीचा एक भागच आहे. आणि तो आनंद वाटायला आणि लुटायला अजूनही बरेच जण स्वखुशीने तयार असतात ह्याची पुन्हा एकदा आलेल्या अनुभूतीने आपल्या संस्कृतीच्या महानतेतील विचारात गुंग झालो आणि कधी पुणे स्टेशन आले हे समजलेही नाही.
(खास टीप: माझ्या ओळखीचे मगनलाल चिक्की अगर चितळे बंधू यांचे पदार्थ करणारे अगर विक्री करणारे कोणीही नाहीत व मला त्यांनी काही दिलेले नाही. बस मला त्यांचे पदार्थ आवडतात म्हणून त्यांचा येथे उल्लेख केला आहे.)



माधव गोगावले

झाडावरची नाठाळ फुलं

सकाळ कोणत्याही ऋतूतली असो, आबासाहेब सकाळी उठून कॉलनीत फेरफटका मारून देवपूजेसाठी फुलं आणत असत. भरगच्च फुलांशिवाय देवपूजा करणे त्यांना कधीच प्रशस्त वाटत नसे. अर्थात फुलं मिळाली नाहीत म्हणून देवपूजेत खंड पडला, असेही कधी होत नसे. सकाळी भल्या पहाटे कुठे बाहेरगावी जायचे असेल, तर आदल्या दिवशीच जास्तीची फुलं आणून ठेवत असत. देवपूजा झाल्याशिवाय ते घराबाहेर पडतही नसत. असा त्यांचा दिनक्रम वर्षानुवर्ष सुरू असायचा.

सकाळी फुलं आणण्याच्या निमित्ताने का होईना, तेव्हढाच त्यांचा मॉर्निंग वॉक नियमित होत असे. झाडावरच्या फुलांशी मनसोक्त गप्पा मारणे त्यांना आनंद देणारे होते. झाडावरच्या फुलांशी त्यांची मैत्री अशीच घट्ट होत होती. हळूहळू फुलंसुध्दा त्यांच्याशी गप्पा मारू लागली. हा संवाद कधी सुख-दु:खाचा असे, कधी हसरा असे, सकाळच्या वेळीच ही गप्पांची मैफल दोघात रंगत असे. फुलांजवळ भरून आलेलं मन मोकळं केलं, की आबासाहेबांना अगदी मन हलके झाल्यासारखे वाटायचे. माणसांजवळ मनातले बोलण्याची काही सोय नव्हती. आणि फुलं बिचारी मुकीच असतात.

ती आपणहून कधी कुणाशी बोलत नसत; माणसांशी तर नाहीच नाही. माणसं आपल्याला मनासारखे फुलू देत नाहीत. सारखे ओरबडत असतात नाही तर तोडत असतात. चुरगाळून टाकत असतात, म्हणून त्यांचा माणसांवर जास्त राग होता. आबासाहेब त्यातले नाहीत, हे आपल्याशी संवाद साधतात, मनातले बोलतात असे त्यांच्या लक्षात आले. म्हणूनच झाडावरची फुलं त्यांच्या देवघरात जाण्यास उत्सुक असत. आपल्याला घेताना त्यांना त्रास होऊ नये म्हणून फुलंही काळजी घेत असत.

प्राजक्त, स्वस्तिक मोगरा, गुलाब, गोकर्ण, अबोली, पांढरी-पिवळी कोरांटी, पांढरी-गुलाबी कन्हेरी, लाल जास्वंद, अशा किती तरी फुलांनी आबासाहेबांशी मैत्री केली होती, त्यांच्या घरातल्या परसात ही सर्व फुलं होती. आबा त्यांचे सतत पालनपोषण करायचे. खतपाणी घालायचे. प्रत्येक फुलांचा वेगळा मोसम असायचा. त्या-त्या मोसमात फुलांचे बहरणे खरोखरच मनाला आनंद देणारे असायचे. प्रत्येकाचा सुगंध वेगळा, बहर वेगळा असायचा...

हिवाळा असो की पावसाळा नाही तर उन्हाळा. आबासाहेबांची सकाळची फूलफेरी ही ठरलेली असे. घरातून निघायला उशीर झाला, की दुसरे लोक फुलं पळवत असत. आबासाहेबांची ही फूलफेरी होती, ते इतरांसारखी फुलं तोडून आपल्या देवघरांसाठी आणत नसत, कारण त्यांचीच परसबाग भरगच्च फुलांनी बहरलेली असायची. आबांचे निमित्त फक्त मॉर्निंग वॉकचे, एवढेच.

आबा मॉर्निंग वॉक करताना बघायचे- काही लोक सकाळी सकाळी दुस-याच्या घरची फुलं चोरत असत, मालक एक दोनदा बघत असे, कधी फुलं नेणा-यांचा पाठलाग करीत असे. त्यावरून दोघांत कधी कधी भांडणही होत असे. भांडण इतके टोकाला जाई, की हातातली कोवळी ताजी ताजी फुलं कुस्करून,कोमेजून जात असत. तुलाही नको अन् मलाही नको, या प्रकाराने आबासाहेब व्यथित होत असत. आबांच्या कॉलनीत बरीच फुलझाडं होती.

परसबागेत आबासाहेब सकाळी जात, तेव्हा काही नाठाळ फुलंही त्यांची थोडी गंम्मत करायची. ते जेव्हा स्वस्तिकाची पांढरी फुलं घेत तेव्हा ती थोडी उंचावर असत, ती हातात येण्याच्या आधीच कुठे तरी पडून जात, तर कधी कधी समोर आलेले फूल हुलकावणी देत असे. लालचुटूक जास्वंदी तर असा खट्याळपणा हमखास करायची. फूल हाताला यायच्या ऐवजी हातात फक्त फांदीच यायची. जास्वंदी दुसरीकडेच कुठे तरी दडून बसलेली असायची. फांदीत रुसून बसायाची. मग आबासाहेब तिचा नाद सोडून द्यायचे. मग दुसरीकडे कुठे तरी मिळून जायची. कधी कधी त्यांच्यासाठीच राखून ठेवली की काय असेही वाटून जायचे. कधी कधी परसातलीच जास्वंदी अगदी सहज हाताला लागायची. कधी बरेच प्रयत्न करून न मिळणारी जास्वंदी एखादे दिवशी पटकन मिळून जायची. प्राजक्ताचे नुसते झाड हलवले, तरी डोक्यावर प्राजक्ताच्या फुलांचा नुसता सडा पडत असे. परसभर प्राजक्ताच्या फुलांचा सडा पडून वेगळाच सुगंध घमघमत असे. पिवळी धम्मक कोराटीही अशीच धम्माल करायची. कोरांटी तर कधी हाताला सहज मिळायचीच नाही. तिचे काटे बोचल्याशिवाय ती मिळतच नसे. गुलाबाच्या फुलाचा यापेक्षा वेगळा स्वभाव नव्हताच. दोघांचा काटेरीपणा हा समान धागा होता. ते आपल्या स्वभावास जागत असत. निळा-पांढरा गोकर्ण आणि मोगरा तसे सज्जन स्वभावाचे. तोडताना सहज तोडू देत असत. पांढरी, गुलाबी कन्हेरी मात्र भलतीच हेकट स्वभावाची. उंच फांदीवर रुसून बसलेली असायची. फुलांचा अवघा गुच्छच तो; मात्र उंच फांदीवर असायचा. कुणालाच तोडता न आल्याने दुसरे दिवशी जागच्या जागी सुकून जायचा.

पावसाळी दिवसात कॉलनीतल्या रस्तावर प्राजक्ताचा नुसता सडा पडायचा. गुलमोहराची तांबडी फुलं हिरव्या पानासह रस्ता भरून टाकायची. शेवटी त्यांची रवानगी कचरा म्हणून रस्त्याच्या कडेला होत असे. आबा परसबागेत झाडांच्या फांदीवर रुसून बसलेली फुलं अलगद हाती घेत. दोन-चार फुलं एकदम हाती यायची; पण शेजारचा प्राजक्त डोक्यावर भरभरून पाऊस पाडायचा. ओलसर फांदीवरील फुलं तर पावसाच्या थेंबासकट अंगावर पडायची. एखादी फांदी सपकन अंगावर यायची कधी हितगुजही करायची. आपल्याला चोरून नेणा-यांच्या कथा फुलं ऐकवत असत. चोरी करायला येणारे कसे भांडत बसले, ते सांगायची. ओरबाडणे आणि कुस्करून टाकणे यामुळे झालेल्या वेदनाही ती सांगायची. मग आबासाहेब आपले उदास झालेले मन मोकळे करायचे.

मनातले सांगून झाले, की मन हलके होत असे. आबा लोकांच्या स्वभावाच्या गंमती-जंमतीही फुलांना सांगायचे, सांगताना भान हरपून फुलांच्या विश्वात रमायचे तेव्हा फुलं आनंदाने डोलत असत. माणसं रोज आपण काय केलं ते इतरांना जसे सांगत तसे फुलांचे नव्हते. रोजच नवनवीन फुलं उमलतात, आपल्याला भरभरून आनंद देतात आणि कोमेजून जातात.

झाडांवर उमलणारी फुलं कधी कुस्करून तर कधी कुणी पायाखाली तुडवली जातात, किंवा पायाखाली आलेली असतात; ती तशीच देवघरात येतात. काही जागेवरच देवाघरी जातात तर काही देवपूजेत जातात. काहींना देवपूजेचा मान मिळतो तर काहींच्या नशिबी निर्माल्य होऊन कुजून जाणे येते. रोज किती तरी फुलं उमलतात आणि सुकून जातात, या विषयी ती कधी कुणाला सांगतात का? आपली स्तुती आपण करण्याचा त्यांचा स्वभाव नव्हता, कारण ते सुगंध पसरवून माणसांना आनंदी ठेवत असत. उमलणे आणि कोमेजणे हा त्यांचा दिनक्रम होता. फुलांना स्वत:ची स्तुती करण्याची गरज नसते, कारण त्यांच्या वतीने त्यांचा गंधच बोलत असतो. तक्रार न करता फुलांचे हे फुलून जाणे हे आबासाहेबांना सहज विचार करायला भाग पाडायचे...तेवढ्यात त्यांना आवाज ऐकू आला. शेजारच्या रस्त्यावर एक मालक एका आजीबाईंशी भांडत होता. आजीबाई देवपूजेसाठी फुलं तोडत होती. मालक आला व म्हणाला, “अहो आजीबाई, थोडी फुलं आम्हालाही ठेवा की.” आजीबाईंनी नकार देताच मालकाने तिच्या हातातली सर्व फुलं हिसकावून घेतली.
आजी म्हणाली, “देवपूजेस तर घेत होते,फुलं काही खाणार नव्हते, चार फुलं दिली असतीस तर तुला पुण्यच लागले असते.” मालक काही ऐकण्याच्या मन:स्थितीत नव्हता. शेवटी आजीबाई फुलं न घेताच निघाल्या; मात्र आबासाहेबांनी त्यांना थांबवले, आणि परसातील खूप फुलं त्यांना दिली. यामुळे आजीबाईंचं मन भरून पावलं.. फुलं म्हणायची, माणसं कशामुळे भांडतील याचा नेम नसतो. ते आम्हाला तोडतात, कुस्करतात, आमच्या माना मुरगळतात, पायाखाली तुडवतात. आमच्याशी त्यांनी नीट वागले तर बिघडते कुठे? त्यांनी आम्हाला आमच्या मनासारखं फुलू दिलं पाहिजे, बागडू दिले पाहिजे, जगू दिले पाहिजे.

दोन -चार दिवसानंतर आबासाहेब सकाळी फुलफेरीस निघाले, कॉलनीत बांधकाम सुरू होते. तेव्हा घरासमोर छान फुल झाडं होती. संध्याकाळी त्याच रस्ताने आबासाहेब पुन्हा गेले, तर घरमालकाने त्याच्या दृष्टीने अनावश्यक असलेली सर्व फुलझाडं तोडून टाकली. सकाळी ज्यांनी फुले तोडली ती सर्व झाडे रस्त्याच्या कडेला तोडून फेकून दिली होती. तोडलेल्या झाडांचीही फुलं सायंकाळी ताजी टवटवीत होती. काही फुले ताजी वाटायची, पण ती लगेच सुकून जात होती. आबा पाहतात तो काय !गुलाबी-पांढरी कन्हेरी, मोगरा, जास्वंद, गोकर्ण, पांढरी-पिवळी कोरांटी निर्दयपणे उपटून फेकली होती. कधी घरामागील परसातही फुलं न मिळाल्याने आबासाहेब या झाडाची फुलंही घरी देवपूजेसाठी नेत असत. त्याच या फुलझाडांशीही आबांची छान मैत्री झाली होती. दोन दिवसापूर्वीच ही फुले आबासाहेबांना म्हणाली होती-माणसं कशी वागतात, कशी भांडतात, तीच फुले आज तोडून फेकून दिल्याने जागेवरच मेली होती. या फुलांनी आबांशी छान छान गप्पा मारल्या होत्या.

जमीनदोस्त झालेली फुलझाडं पाहून आबांना गलबलून आले, ती सायंकाळ त्यांना एकदम उदास वाटू लागली. रात्री त्यांना झोपही लागली नाही. सकाळी परसबागेतील ताज्या टवटवीत फुलांना त्यांनी हातही लावला नाही. सकाळी नेहमीप्रमाणे मॉर्निंग वॉक केला,पण कॉलनीत नुसतीच भटकंती केली. देवपूजेसाठी त्यांनी झाडावरची फुलं तोडली नाही, त्या दिवशी त्यांनी बिनफुलांचीच पूजा केली.

चार -पाच दिवसांनी आणखी एका घर मालकाने भरलेल्या फुलांचे प्राजक्ताचे झाड काढून रस्तावर फेकले, ते बघून आबांना मनस्वी वाईट वाटले. याच प्राजक्ताने किती तरी वेळा आबांना मोहित केले होते. किती तरी वेळा त्यांच्या डोक्यावरच फुलांचा सडा टाकला होता. या फुलांनी किती तरी वेळा आबांशी नाठाळपणा केला होता. त्या आठवणीने त्यांचे मन अगदी भरून आले. ज्या दिवशी देवपूजेला भरगच्च फुलं मिळत त्या दिवशी ते खूश असत,ज्या दिवशी एकही फूल मिळाले नाही, त्या दिवशीही त्यांचे काही बिघडत नसे.

मात्र सकाळचा मॉर्निंग वॉक आणि देवपूजा कधी चुकत नसे. गावी असाताना त्यांचे सगळे बालपण परसातील फुलझाडांसोबत गेले, आज गावात ते घर आहे आणि तो परसही आहे. पण फार फुलझाडं नाहीत. जुन्या झाडातील चाफ्याचे झाड पावसात कोसळून पडले. हाच चाफा आबांना पुन्हा शहरातही भेटला. त्याच्याशी मैत्री कायम राहिली. घरामागच्या व कॉलनीतल्या अनेक फुलझाडांवर त्यांनी जीव लावला. का कुणास ठाऊक पण त्यांचे फुलाशी नाते फार झटकन जमत असे. फुलांचे उमलणे, फुलणे, कोमेजणे, आणि मावळणे हे आबासाहेबांना नेहमीच आल्हाददायक वाटायचे.

ते मन प्रसन्न करणारे असायचे. रोज किती तरी फुलं या जगात येतात, आपल्या अस्तित्वाने मन ताजे टवटवीत करतात, फुलांना स्वतःची स्तुती करण्याची गरज नसते. कारण त्यांचे अस्तित्व, त्यांचा सुगंधच त्यांच्या वतीने बोलत असतो. फुलांना त्यांच्या मनाप्रमाणे फुलू द्यावे बागडू द्यावे; पण त्या साठी माणसांच्या मनात ही फुलं आधी बहरून गेली पाहिजेत. त्यांची मनं फुलासारखी झाली तर किती बहार येईल .कधी कधी असे वाटते मुलं आणि फुलं दोघेही निर्मळ असतात, गोदेच्या निर्मळ पाण्यासारखी...



प्रशांत गौतम

हवाईयन तडका: आनंद, वादळ आणि आत्मशोधाची कहाणी

“जीवन म्हणजे केवळ श्वास घेणं नाही, तर ज्या क्षणांनी श्वास रोखला जातो, ती खरी मोजणी असते.”
– माया एंजेलू

हवाईतील KAUI (काउई बेट), जुने, दाट हिरवे, आणि पाच कोटी वर्षांचा इतिहास सांगणारे, “गार्डन आयल” म्हणून ओळखले जाते. एकेकाळी पॉलिनेशियन भटक्यांचं घर, नंतर साखर कारखान्यांचं केंद्र, आणि आता? हुला नृत्य, मेनिहुने पौराणिक कथा, आणि ज्यूससारखा आंबटगोड आंबे-पपई-लिची यांचा झणझणीत फूड ट्रक स्वर्ग!

शिकागोहून निघालो, पण हा केवळ विमानप्रवास नव्हता—हा एक महाकाय ब्रीदिंग-ह्यूमिड-टाईम-ट्रॅव्हल अनुभव होता. बारा तास हवेत, पाच तास घड्याळ मागे, आणि मध्यरात्री वाट पाहणारी टॅक्सी. पण नियतीने आम्हाला दिलं Mustang Convertible. केस हवेत उडवत, वाऱ्याच्या झुळुकीत मनसोक्त हसत, आम्ही बेटात एकरूप झालो.



सुनंदा, आमच्या प्रवास व्यवस्थापन मंत्रालयाची मुख्यमंत्री, हिने निवडलेला कॉन्डो समुद्रकिनाऱ्याचा नसला तरी गॅलरीतून दिसणाऱ्या हिरव्या डोंगररांगा, पांढरे ढग, आणि सोबतीला तिचा नाश्त्याचा सहवास—हा आमचा छोटा स्वर्ग होता.
प्रवासाचं निमित्त? आमच्या जिवलग मित्राच्या मुलीचं हवाईमधील स्वप्नवत डेस्टिनेशन वेडिंग!
हळदीचा कार्यक्रम म्हणजे हळदीपेक्षा हसण्याचा स्फोट. वर साहेब नावेवरून “धमाकेदार एन्ट्री” घेत पोचले, आणि समुद्रकिनाऱ्यावर झालेला विवाहसोहळा, प्रेम, पाऊस, आणि थोडं सनस्क्रीन!
रिसेप्शनमध्ये सुंदर दिवे, अप्रतिम डेकोर, आणि अशा कॉकटेल्स ज्यांची नावं उच्चारता आली नाहीत पण नाचायला भाग पाडलं.
या भल्यामोठ्या कार्यक्रमाच्या मध्ये आम्ही काउईचा आत्मा अनुभवला, धबधबे जे स्वतःसाठी टाळ्या वाजवत होते, नागमोडी रस्ते, सूर्यास्ताची चित्रात बसणारी शांतता, आणि ताज्या फळांनी ओथंबलेलं आठवणींचं ताट!
अन्नप्रेमींसाठी स्वर्ग म्हणजे पोके—हवाईयन पद्धतीने तयार केलेला ताज्या माशाचा (टूना/सॅल्मन) चविष्ट व एकदम chilled असा पदार्थ.
साशिमीचा हवाईनं पिळवटून घेतलेला पुन्हा जन्म!

शांततेचा अनुभव मिळाला एका आश्चर्यकारक हिंदू मठात—बांबूच्या वाटा, मंत्रमुग्ध करणारा निसर्ग, आणि निळसर रुद्राक्ष फळं, ज्यांना म्हणतात “शिवाचे अश्रू.” सुंदर, पवित्र, आणि थोडं महाग.



आणि मग… नाट्यमय ट्विस्ट!

नापाली कोस्टवर डिनर क्रूजसाठी जाताना अचानक सुनामीसाठी सायरन वाजले. डिनर रद्द, समुद्रकिनारा बंद, आणि आम्ही आमच्या गॅलरीवर—चिप्स, न्यूज आणि समुद्राकडे चिंतेनं बघत बसलो. काही घडलं नाही, पण कथा मिळाली पक्की.



काउईनं दिला एक भन्नाट तडका—हास्य, धक्के, अध्यात्म आणि प्रेम. खरं सौंदर्य सापडतं कुठं माहितीय? वाऱ्याच्या हलक्याशा स्पर्शात, अनपेक्षित वळणांमध्ये, आणि आयुष्यभर सोबत असणाऱ्या त्या हसऱ्या डोळ्यांमध्ये!



राजीव गोखले

रजनीताई पटवारी

एक अविस्मरणीय व्यक्तिमत्व



रजनीताई व आमची ओळख वीस-पंचवीस वर्षांपूर्वी थोडीशी झाली होती पण त्यांची खरी ओळख चार-पाच वर्षांपूर्वी त्या जेव्हा आम्हाला गीता आणि दासबोधाची शिकवण द्यायला लागल्या तेव्हा झाली.
आमच्यासारख्याच अशा इतरही कित्येकांच्या जीवनाला त्यांच्या शब्दाने, त्यांच्या ज्ञानाने त्यांनी स्पर्श केला व त्या प्रत्येक व्यक्तीच्या अंत:करणावर स्वत:चा कायमचा ठसा उमटवला.
स्वत:च्या वैद्यकीय व्यवसायाचा उपयोग समाजामधल्या गरजू व्यक्तींच्या मदतीसाठी केला व त्या वेळेस वेळेचे, श्रमाचे बंधन पण त्यांनी ठेवले नाही.

गेली वीस वर्षे स्वत:च्या जीवनामधले दु:ख बाजूला सारून परमार्थाला आपले जीवन वाहून घेतले. भगवद्गीतेचा व त्यामुळे श्रीकृष्ण भक्तीचा त्यांना जणू ध्यासच लागला होता. त्या नेहमी म्हणायच्या, “माझे जीवन म्हणजे गीता एके गीता!”. गीता ही त्यांची गुरू, देव, सखा, सोबती होती. गीतेच्या अठरा अध्यायांमधील प्रत्येक शब्द नि शब्द त्यांचा तोंडपाठ होता! एवढेच नाही, तर गीतेतील शिकवण त्यांच्या पेशीपेशीत, रंध्रारंध्रात मुरली होती! त्यामुळे उर्वरित जीवनामधला प्रत्येक दिवस, दिवसाचा प्रत्येक क्षण गीतेच्या शिकवणीप्रमाणे त्यांनी घालवला. जीवनाचे प्रयोजन त्यांना समजले व त्याबरोबर मृत्यूचे सत्यत्व पटले.
त्यामुळेच कशाचीही खंत मनात न ठेवता, कशातही आसक्ती न ठेवता शांत मनाने त्यांनी या लौकिक जगाचा निरोप घेतला.

त्यांच्या अंत:दर्शनाला जो जनसमुदाय जमला होता त्यावरून त्यांच्या अपरंपार कार्याची लोकप्रियता कळून आली. त्यांनी शिकविल्यामुळेच केवळ डोळ्यातले अश्रू महत्प्रयासाने डोळ्यातच थोपवले जात होते. नि:शब्दरीत्या त्यांना निरोप दिला जात होता! मनांत प्रकर्षाने बा. भ. बोरकरांच्या दोन ओळी आठवत होत्या.
“दिव्यत्वाची जेथ प्रतीति
तेथे कर माझे जुळती ॥”

उमा दिघे.

संगीत थोडे अधिक जाणून घ्या

संगीत म्हणजे कानांना मधुर वाटेल असा स्वर समूह. वाद्यातून येणारा नाद असो किंवा कंठातून येणारे स्वर असोत. निसर्गात जे निरनिराळे आवाज ऐकू येतात, पण ज्या आवाजांची कंपनसंख्या नियमित असते त्यांनाच स्वर म्हणतात. निसर्गात प्राणी पक्षी यांचे काही आवाज व आपल्या कंठातून काढता येणारे आवाज हे सारेच समान म्हणजे नेहमीच ठरावीक कंपन संख्येचे ध्वनी नसतात.

पूर्वीच्या ऋषीमुनींनी सामवेद संथा करताना मंत्र व ऋचा ज्या स्वरावलीत म्हटल्या, तेथे संगीत प्रथम जन्मले, कारण त्या उच्चारणाच्या स्वरांसह मनाला एक प्रकारची तंद्री लागत असे. सामवेदाचा प्रचार वापर वाढला. निरनिराळ्या पूजाअर्चांमधील मंत्र व देवांची स्तोत्रे सुरात म्हटली जाऊ लागली. ती चालीत वआरोहावरोहात म्हटली गेली. त्याच्याच निरनिराळ्या प्रकारच्या उपयोगामधूनच स्वर ज्ञान व त्याबरोबरच संगीताला भाषा प्राप्त झाली. सारे संगीत सप्त स्वरांवर आधारलेले आहे. हे सप्तस्वर निसर्गातूच प्राप्त झाले.

सा -षड्ज हा मोराच्या आवाजातून मिळाला.
रे- रिषभ- चातकाचा आवाज,
ग - गंधार बकरीकडून,
म - मध्यम क्रौंच पक्ष्याकडून,
प- पंचम कोकिळाकडून,
ध- धैवत बेडकाच्या आवाजातून,
तर नि- निषाद हत्तीच्या ओरडण्यातून मिळाला.

नंतर या सात शुद्ध स्वरांमुळे रे, ग, ध नी हे विकृत (कोमल) स्वर कंपन संख्येतील बदलाने निर्माण झाले. तसाच मध्यम तीव्र झाला. असे सप्तकात बारा स्वर तयार झाले. या स्वरांवरच संगीताची इमारत उभी आहे. निरनिराळी काव्ये, भजनं, दोहे इत्यादी प्रकार सुरात कंठस्थ झाले व प्रचलित होत गेले पण हा संगीताचा प्रसार फक्त उत्तम कंठ असणाऱ्यांनी तो अधिक सुरावटींनी खुलवला व भजन विविध स्वर रचनांमध्ये गाऊन त्यात रंगत आणली. त्यांना राजांनी आश्रय दिला म्हणून शास्त्रीय संगीत राज दरबारी पोहोचले. ज्याला राजाश्रय नसेल ते संगीत म्हणजे मनात चंचल आनंद लहरी निर्माण करणारे असे हलकेफुलके संगीत!

ते कोठ्यावर ऐकू येऊ लागले, म्हणूनच स्त्रियांना संगीत शिकता येत नव्हते. एकोणिसाव्या शतकात विष्णू दिगंबर पलुस्करांचा जन्म झाला, तेव्हा शास्त्रीय संगीत गुरुगृही राहूनच शिकता येत होते, त्यामुळे निरनिराळी घराणी निर्माण झाली, परंतु त्या काळात दोन दिग्गज संगीत तज्ज्ञांनी शास्त्रीय संगीताचा प्रसार करण्यासाठी भारतामध्ये चारी दिशांनी प्रयत्न केले. एक विष्णू नारायण भातखंडे व दुसरे विष्णू दिगंबर पलुस्कर.

विष्णू दिगंबर पलुस्करांचा जन्म १८ऑगस्ट १८७२ ला कुरुंदवाड, महाराष्ट्र येथे झाला. त्यांचे वडील कीर्तन करीत असत त्यामुळे त्यांना संगीताची गोडी लागली. विष्णू दिगंबर पलुस्करांचे गुरू इचलकरंजीकर बुवा हे होते. त्यांच्याकडून पलुस्करांनी शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. त्यात रागरागिण्यांचा अंतर्भाव होता. सुंदर चिजा, तराणे व सरगम तालात बांधलेली होती. एक प्रकारचा नियमबद्ध स्वरसमूह म्हणजेच राग. हे उत्तर हिंदुस्तानी संगीत पुढे जनतेत प्रसिद्ध झाले.

पलुस्करांनी संगीतातील शब्द बदलून नवीन बंदिशी बांधल्या, कारण पूर्वीच्या संगीतात मुसलमानी राजवटीमध्ये हिंदीचा अधिक अंतर्भाव होता म्हणून त्यांनी मराठीत बंदीशी बांधल्या. त्यांच्या सुरावटींचे गोडवा हे वैशिष्ट्य होते. त्यांनी संगीतातली पलुस्कर शास्त्रीय लेखन पद्धती विकसित केली. त्यांनी अनेक शिष्य तयार केले व शास्त्रीय संगीताचा महाराष्ट्रात प्रसार केला.उत्तरेकडे लखनौ ग्वाल्हेर येथेही त्यांनी गांधर्व संगीत महाविद्यालये स्थापन केली.

विष्णू नारायण भातखंडे यांचा जन्म १८६० साली मुंबईत झाला. ते वाळकेश्वर येथे राहत होते त्यांच्या वडिलांना संगीताबद्दल खूप ओढ होती. विष्णू नारायण भातखंडे यांनी बी. ए. एल. एल. बी. शिक्षण पूर्ण केल्यावर संगीतामध्ये संशोधन करायचे ठरवले. त्यांनी गुरू वल्लभदास यांच्याकडे शास्त्रीय संगीताचे शिक्षण घेतले. त्यांनी थाटपद्धतीमध्ये सर्व रागांचे विवरण केले. त्यांनीही अनेक चिजा ,छोटे ख्याल, विलंबित ख्याल, तराणे व सरगम बांधल्या. नवीन लेखन पद्धती तयार केली.अनेक शिष्य तयार केले. शास्त्रीय संगीताची लेखन पद्धती विकसित केली.

हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताचा उत्तर हिंदुस्तान, बंगाल, अलाहाबाद, दिल्ली, लखनौ व महाराष्ट्रात त्यांनी आपल्या शिष्यांकडून अनेक विद्यालये स्थापन करून प्रसार केला. त्यामुळे सामान्य घरातील स्त्रियांना शास्त्रीय संगीत शिकण्याची संधी मिळाली, शास्त्रीय संगीताचा प्रसार झाला. त्यांनी दक्षिण भारतातील कर्नाटक संगीताचाही तुलनात्मक अभ्यास केला. पुढे संगीत म्हणजे गायन ,वादन व नृत्य म्हणू लागले. कारण तिन्ही कला परस्पर पोषक आहेत. काही उत्तम गायकांच्या नावाने त्यांची घराणी प्रसिद्ध झाली. घराणे म्हणजे गायन पद्धती.

त्यापैकी विविध घराणी म्हणजे आग्रा घराणे ,ग्वाल्हेर घराणे, पटियाला घराणे, अत्रोली घराणे, किराणा घराणे इत्यादी. गुरूशिष्य गायन पद्धतीतून शिकून विद्यार्थी बाहेर पडून संगीत विद्यालय काढून संगीताचा प्रचार आणि प्रसार करू लागले. त्यात मुंबईत गाजलेले गायक म्हणजे श्री. नारायणराव व्यास यांनी व्यास संगीत विद्यालय स्थापन केले, तसेच श्री. मनोहर बर्वे यांनी मनोहर संगीत विद्यालय काढले.

श्री. राम मराठे यांनी ठाण्यामध्ये संगीत विद्यालय काढले, गिरगावमध्ये मुंबईतच मास्टर नवरंग यांनी. अशा प्रकारे शास्त्रीय गायनाचा प्रसार व प्रचार मुंबईमध्ये झाला. त्याचप्रमाणे पूर्ण महाराष्ट्रात सुद्धा अनेक संगीत विद्यालये काढली गेली घरोघरी पण शास्त्रीय संगीत शिकवले जाऊ लागले.काही प्रसिद्ध गायक म्हणजे आग्रा घराण्याचे डागर बंधू, साजन राजन मिश्रा तसेच पटियाला घराण्याचे बडे गुलाम अली खान, अत्रोली घराण्याच्या किशोरी अमोणकर, ग्वाल्हेर घराण्याचे नारायणराव व्यास, किराणा घराण्याचे पंडित भीमसेन जोशी, डॉक्टर रातंजनकर, सडोलीकर, वसंतराव राजोपाध्ये हे व्यासांचे शिष्य. त्यांनी व डॉ .रातंजनकरांनी संगीतशास्त्रावर अनेक पुस्तके लिहिली. पतियाळा घराण्याचे गायक बडे गुलाम अली खान खूप प्रसिद्ध होते त्याशिवाय प्रसिद्ध गायक गायिका म्हणजे गंगुबाई हनगल, मोगूबाई कुर्डीकर, कुमार गंधर्व ,मास्टर दीनानाथ मंगेशकर असे अनेक दिग्गज संगीतसूर्य होऊन गेले.

दीनानाथ मंगेशकर यांचे गुरू रामकृष्णबुवा वझे हे होते, तर त्यांचे आदर्श बालगंधर्व हे होते. भीमसेन जोशींचे गुरू सवाई गंधर्व हे होते. नाटकात शास्त्रीय गायन(पदे)) व अभिनय करणारे काही दिग्गज म्हणजे नारायणराव राजहंस म्हणजेच बालगंधर्व, सवाई गंधर्व ,गणपतराव बोडस, मास्टर कृष्णा, राम मराठे, रामदास कामत, भालचंद्र पेंढारकर, प्रकाश घांग्रेकर, कीर्ती शिलेदार, जयराम व जयमाला शिलेदार, फैयाज,वसंतराव देशपांडे,आशा खाडिलकर, बकुल पंडित, आनंद भाटे, राहूल देशपांडे इ. काही नावे मी इथे दिली आहेत. पं. जसराज, पं. जितेंद्र अभिषेकी, शौनक अभिषेकी इत्यादी उत्तम गुरू तसेच थोर गायकही आहेत.

शोधायला गेले तर शास्त्रीय संगीताचा महासागरच आहे हे जाणवेल. संतांचे अभंग ,दोहे हेपण शास्त्रीय पद्धतीने आळवून गायलेले तुम्ही ऐकले असतीलच.

शास्त्रीय संगीतातील राग रागिण्यांच्या सुरावटीतच नाट्यसंगीत जन्माला आले. उत्तम शास्त्रीय संगीत गायक या नाटकात स्टेजवर उभे राहून गात असत म्हणजे आता आम जनतेला नाटकातील गद्य प्रकाराबरोबरच राजदरबाराची बैठक सहज उपलब्ध झाली. शास्त्रीय पदे म्हणजे छोटेख्याल स्टेजवर समाजाला ऐकायला मिळाले. कितीतरी नाटकातील पदे निरनिराळ्या रागांच्या छोट्या ख्यालवरच आधारित असत. पूर्वीचे सिनेसंगीत रागरागिण्यांवरती आधारित होते. तेच पुढे विविध बदलाने व वाद्यांनी मिश्र झाले. त्यात भारतीय तबला, तानपुरा, वीणा, एकतारी, टाळ, चिपळ्या, मृदंग इत्यादी वाद्यं असत. त्याबरोबरच आता काही पाश्चिमात्य वाद्ये पण समाविष्ट झाली. अशा प्रकारे संगीताचा प्रकार अतिरंजक केला गेला.संगीताचा घाटही बदलत गेला तरी तो गाताना उत्तम संगीत श्रवणीय होण्यासाठी शास्त्रीय बैठक हवीच.

आता आपल्याला तबला, तानपुरा हे सारे एका मोबाईलवरही मिळते. पण गुरु शोधा आणि सुरू करा, कारण “गुरु बिन कौन बतावे वाट” किंवा ‘मधुबनमे राधिका’ राग हमीरमध्ये म्हणा किंवा किंवा ‘मनमोहना बडे झूठे’ जयजयवंती रागात गा किंवा ‘जब दीप जले आना’ यमनमध्ये गा, कळायला लागले तर अति आनंद मिळतो. आवाजही घोटून सुंदर होतो. गाण्याचा सराव सोडू नका. घोटून तयार झालेला सुंदर गळा उत्तम आलाप व ताना गाऊ शकतो, बारीक कणसुरांसह गीत खुलवू शकतो, पण जर सातत्य सोडले तर काय होते, हे जाणकारांना ठाऊक आहे. संसारात मन दुःखी झाल्याने किंवा संसारातून पार विरक्त झाल्याने एखादी व्यक्ती साधे भजन पण गाणे सोडून देते, किंवा वयाप्रमाणे कंठातील स्नायूही ताण सहन करू शकत नाहीत. आवाज तार सप्तकापर्यंत चढवता येत नाही हळूहळू गाणे बंद होते. असा गायनाशी संबंध सोडल्याने रागांची नावे सुद्धा स्मरत नाहीत.. तुम्ही मिळवा पण गमावू नका .”गाता गळा व शिंपता मळा नेहमी बहरतो,”



नीला जोशी

संगीत

'संगीत' हा जो तीन अक्षरी शब्द आहे ना, दिसायला लहान असला तरी त्याची व्याप्ती इतकी मोठी आहे, की त्यावर थोडक्यात आणि तेही गद्यात मांडणं खरंच कठीण आहे. खरं तर जे गद्यात म्हणता येत नाही, अथवा भावना नीट व्यक्त करता येत नाही त्या सीमेरेषेवरूनच तर पुढे संगीताची दुनिया सुरू होते.

संगीतात असलेल्या अनेक रचना आणि विविधता, शब्दबद्ध करणे कठीणच आहे. गद्य पद्य आणि संगीत याच्या सीमारेषेवर वावरणारी अमृतरायांची गणेश स्तुतीपर कटावृत्तातील रचना ऐकली, की हे अजून जाणवतं.. ती म्हणताना मनाची लागणारी एकाग्रता, श्वासाचं नियंत्रण, शब्द बरोबर उच्चारणे, ते शुद्ध उच्चारणे किती महत्वाचे आहे ते कळते. त्यामुळे शब्दांना एक अंतर्गत लय निर्माण होते व त्यामुळे शब्दांत नाद निर्माण होतो. तो नाद आपल्याला गुंगवून टाकतो. त्या शब्दात, त्या नादात जी प्रचंड शक्ती आहे, तिने आपल्याला सभोवतालचा विसर पडतो. आपण अंतर्मुख होतो. आपल्या आत बघायला शिकतो आणि जणू भगवंताचा साक्षात्कार होतो.

संगीतात ही नाद निर्माण करण्याची जी शक्ती आहे ती खरंच अद्भुत आहे. म्हणूनच तर आपण म्हणतो,
"नादातुनि या नाद निर्मितो, श्रीराम जय राम जय जय राम".
संगीत दर्जेदार असेल तर अर्थ कळला नाही, तरी नाद कळतो. नाद कळला नाही तरी गुंजन कळतं. आणि गुंजन जाणवत राहतं. त्या गुंजनाचा नंतर अर्थ विचारावासा वाटतो ते खरे संगीत.
अगदी अलीकडील काळातले गाडगेबाबांचे प्रबोधनपर असलेले संगीत. त्याचा तर उल्लेख करायलाच हवा. साधी दगडाची झांज आणि डब्याचा ठेका यावर गोड गळ्यातून उमटलेले कीर्तन तर विलक्षणच. गावागावातून जनजागृती करणारे संगीत आहे त्यांचे.
खरं सांगू, संगीत हे एका थेरपीचे काम करत असते.

"आली कुठूनशी कानी टाळ मृदुंगाची धून
नाद विठ्ठल विठ्ठल उठे रोमरोमातून"

नुसता हा अभंग ऐकला तरी मन भक्तिरसात बुडून जाते. एक विलक्षण शांतीचा अनुभव मनाला येतो. सगळे विकार दूर होऊन मन शांत शांत होऊन जाते.
मन आणि शरीर वेगळे थोडीच आहेत? मनाच्या स्वास्थ्यावरच शरीराचे स्वास्थ अवलंबून असते, हे वेगळे सांगण्याची गरजच नाही.

संगीतात इतकी शक्ती आहे, की जसे संगीत, तसे भाव मनात उमटत जातात. "वेडात मराठी वीर दौडले सात" असं म्हटलं, की वीरश्रीपूर्ण भावनेने मन भरून जाते.
"सारे जहाँ से अच्छा हिंदोस्ताँ हमारा" हे गाणं ऐकलं, की देशभक्तीने, राष्ट्रभक्तीने मन आणि शरीर दोन्हीही भारून जाते.

भूपाळीचे कोमल स्वर कानावर पडताच, सुंदर पहाटेचे आपोआपच दर्शन होते.
भारुड, भक्तिगीत, भजन यामुळे आपण अलगद ईश्वराच्या सानिध्यात आल्याचा भास होतो. मनाला आणि शरीराला एक ऊर्जा मिळाल्याचे समाधान मिळते.
संगीत, मग ते निसर्गाच्या सानिध्यातले असो किंवा एखाद्या व्यक्तीच्या सुरातले असो, मनाला प्रसन्नतेचा अनुभव देऊन जाते. समुद्राची गाज, पक्ष्यांचा किलबिलाट, पानांची हलकेच होणारी सळसळ हेही सगळे संगीतच निर्माण करतात. माणसाच्या रूक्ष जीवनाला हलकेच दंवाचा शिडकावा करतात.
शब्दांना जेव्हा एक लय आणि ताल याची साथ मिळते, तेव्हा सुरेल संगीत उमटते. बासरीचे हलके सूर असोत अथवा एखादे ठेक्यातील गाणे असो, आपले मन गुंगवून टाकते. ह्या भारलेल्या क्षणांनी माणूस आपल्या शारीरिक व्याधी विसरून जातो.
झाडांनाही जीवन असते. आपला अनुभव आहे, की तुम्ही जर झाडांच्या जवळ सुंदर शांत संगीत लावलं, तर ती अधिकच बहरतात.
भक्ती रस, वीर रस, वात्सल्य रस, प्रेमभाव कुठलीही भावना जेव्हा पराकोटीला जाते, तेव्हा शब्द हे संगीतमय होऊन बाहेर पडतात. भावना बाहेर व्यक्त होण्याचा संगीत हा एक अतिशय विलक्षण असा अनुभव आहे.
मन स्वस्थ असेल तर शरीरही नक्कीच स्वस्थ राहील, हे निरनिराळे प्रयोग करून माणसाने सिद्ध केले आहे. याच्यावर विस्ताराने बोललं अथवा लिहिलं तर खूपच विस्तार होईल.
शरीर, मन व संगीत यांचे एक अतूट असे नाते आहे. सात सुरांची ही सुगंधी अत्तराची कुपी, माणसाला तनमनाने स्वस्थ राहण्यास अमूल्य मदत करते.
हे सगळे झाले वैयक्तिक विषय. पण संगीतात अजून एक शक्ती आहे, जी समाजाला, राष्ट्राला एका सूत्रात बांधून टाकते, खिळवून ठेवते. अगदी हलकेफुलके संगीत सुद्धा हे घडवू शकते. विश्वास नाही बसत ना? आठवा, पूर्वीच्या काळी 'बिनाका गीत माला' हा कार्यक्रम दर बुधवारी लागत असे. अमीन सयानी यांच्या 'बहनो और भाईयों'या मधुर वाक्याने सुरुवात होऊन, एकेक चढत्या पायदानाची हलकी फुलकी सिनेमातली गाणी रेडिओवर ऐकायला पूर्ण देश जणू रेडिओला चिकटून बसत असे. त्या स्वरगंगेत सगळे बुडून जात आणि नकळत समाज एका धाग्यात बांधला जात असे.
आणि परमोच्च संगीत म्हणून राष्ट्रगीताचा उल्लेख तर आपल्याला करावाच लागेल. प्रचंड राष्ट्रभक्ती, राष्ट्रभावना निर्माण करणारे ऊर्जापूर्ण संगीतमय गान म्हणजे राष्ट्रगीत. सगळ्या देशबांधवांना एकत्र बांधणारे, देशाला मानवंदना देणारे गीत म्हणजे राष्ट्रगीत.
राष्ट्र स्वस्थ तर आपण स्वस्थ. शरीराने आणि मनाने सुद्धा.
संगीतावर गद्यात किती मांडणार न? गद्यात जे जमत नाही ते भाव व्यक्त करायलाच तर संगीत उमटते. हो न? असो. बराय मंडळी.
जयहिंद. नमस्कार.



अलका धाराशिवकर

कविता

THREE POEMS

MEMORIES

When I rest my eyes after a long day
A cascade of old memories come knocking
On my heart.

And I can feel the glow upon my closed eyes-
Of the light that once streamed through the weave of leaves.
I can feel the dense, cooling shadows of the mango trees
On hot summer days,
Lingering fragrance of the mangoes,
And a deliciously sweet taste on my tongue.

I still remember-
The caress of warm gentle rain on my face
The soft touch of the delicate coral lilies in my palms,
Sweet calls of the nightingales.

Vibrant colors,
In the gardens and the bazzars
Bright sunny days and starlit nights,
And drifting off to sleep on the terraces
Watching the falling stars.

Holy basil in its decorated pot
In the backyard
And a quiet oil lamp burning besides it
Giving serenity to the already tranquil evenings.

Simple were the days then,
Simpler the wishes.
After the busy day was over,
All we needed was
Mother's hopeful stories of princesses and fairies
And her voice still echoing in our dreams
As we drifted off to sleep.

Illusion

One evening in Autumn
I sat mesmerized
At the foot of a maple tree
Watching the splashes of crimson
Where sky met the earth
At the glowing horizon.
Birds gliding, bathed in the glow of sky
I wish I could join them, I could fly

A gentle breeze rustling my unruly hair,
About to engulf me was the gray of dispair
From their perch on the high branches
Gently landed beside me, a pair of goldfinches
On the carpet of red and gold leaves
I sat under a wishing tree, I believe.

Complete was the beautiful illusion
Or my wish came to fruition?
Scarlet and gold beneath me and up high
As if, with the goldfinches I was flying in the sky.

POND

I walk to the pond
Nestled in the forest beyond
To calm my heart in its blue serenity
To experience its pristine clarity
To soothe my soul
To mend my fragmented self whole
I don’t have wings to fly
How can reach the blue expanse up high?
So I go the pond to see
In the image of sky, the reflection of me.

,



© Shraddha Bhat
From her book ‘Sunshine On The Dewdrop’

प्रिय सुजाताताईस

प्रिय सुजाताताई,

तुमचे शिकागोतील वास्तव्य संपून भारतात परत जात आहात. पण भारतातूनही तुम्ही साहित्यकट्टा, 'रचना' सुरू ठेवणार आहात याचा आनंद आहे. हे स्नेहबंध असेच कायम रहोत. भाषेत रमणाऱ्या तुम्हाला भेट द्यावी तर ती शब्दांचीच.. हा विचार करून तुम्हाला शब्दांत मांडण्याचा प्रयत्न करते आहे. 🙏



शांत प्रसन्न। शालीन संपन्न।
आनंदाचा घन। रूप तिचे॥
अखंड वाचन। साहित्य लेखन
आणि अध्यापन। करीतसे॥

शब्दांचे धन।शब्दांचे मन
शब्दांचा मान। राखतसे॥
भाषेचा संग्रह। भाषेचा निग्रह।
भाषेचा आग्रह। तिच्या ठायी॥

ऱ्हस्व-दीर्घ ऊकार। यांनी जे बेजार।
त्यांचा तारणहार। तीच असे॥
मराठीच ध्यास। मराठीच श्वास।
अखंड प्रवास। तिच्यासाठी॥

मराठीची गोडी। प्रत्येका थोडी।
लावूनि जोडी। आनंदासि॥
वर्णावी किती। तिची महती।
साक्षात् सरस्वती।आम्हासाठी॥

मराठीचा महामेरू।मैत्रीण तत्त्वज्ञ गुरू।
वाटे काय करू। तिजसाठी॥
तिच्यासाठी तरी।चालावी खरी।
मराठीची वारी। जन्मोजन्मी॥

मराठीचा छंद।स्नेहाचा बंध।
ऐसा आनंद । अखंड राहो ॥



शिल्पा देशपांडे

कविता

(१)

पुस्तकात जपलेलं फूल
पानांवर उमटतं
अक्षरं उष्टी होतात
उष्टी अक्षरं मुकी असतात
पुस्तकात मुसमुसतात
फुलाचा गंध पुस्तकात विरतो
अनेक कपटांच्या अंतरात
धुळीखाली दडलेली
सुगंधित पुस्तकं दरवळत असतात..

(२)

जुन्या भिंतीवरचे
जीर्ण पापुद्रे
खरवडणे बरे नाही
नखांमध्ये रंग उरून जातात,
त्यात रमणे काही खरे नाही
प्रत्येक वळणावर
पुढचा रस्ता शोधावा,
मैलाचा दगड होण्यात सुटका नाही
मी, ती, तू, ते आणि ते सर्व
तसेच काही राहिले नाही
नव्यामध्ये जुने शोधणे,
यात काही मजा नाही
म्हणून म्हणतो
काही स्वप्नं भंगू द्यावी,
त्याशिवाय नवी जाग नाही
कारण
नखांमध्ये रंग उरून जातात
त्यात रमणे काही खरे नाही



अवधूत जोशी

कविता

(१)

चारी बाजूंनी ढग दाटून यावे,
सरी येणार म्हणून वाट पाहावी,
पण वाट्याला यावा फक्त अंधार,
आणि एक उष्ण निःश्वास,
या अस्वस्थतेतून सुटण्यासाठी...

अधीर धरती, तहानलेली,
सुकली झाडे, आसुसलेली,
नदी कोरडी, आटून गेलेली,
पिल्ले चातकाची, केविलवाणी...

आणि 'मी' उभा असतो शांत,
घरातल्या नितळ आरशासमोर,
बाहेरील तापणारं ऊन बघत,
उगीच विचार करत बसतो...
चातकाच्या तहानलेल्या पिल्लाचा...

आणि माझ्या पायाशी निःश्वास टाकीत,
केविलवाणा होऊन उभा असतो,
माझाच मुलगा कधीतरी माझ्यासोबत,
खेळण्यासाठी... नदीत पोहण्यासाठी...
डोंगरदऱ्या पालथ्या घालण्यासाठी...
पावसात चिंब भिजण्यासाठी...

(२)

सरत आली रात्र तरी,
सल मनीचे सरता सरेना.
काळ्या तमाने गढूळलेला,
खोल तळ निवळता निवळेना.

मन जणू रे वस्त्र रेशमी,
कसा मी काशिदा विणू?
धागे धागे जुळता जुळता,
गुंताच विचारांचा लागे उतरू.

गुंततो त्याच गुंत्यात मी,
वाट मोकळी कुठे दिसेना,
श्वास हे तडफडती, फडफडती,
धाप परी ही जाता जाईना.

रात्र अवघी सरती झाली,
गारवाही गहिवरून जाई,
कूस बदलताच चांदणे,
दीर्घ उसासे पुनःश्च देई.

'वेदना'च जागी सोबती,
मैत्र माझे जागवी,
शांतावाया दाह हा,
निजवते मज थोपटूनी..



योगेश जाधव

केव्हा तरी पहाटे...

केव्हा तरी पहाटे...
आठवण तुझी आली
आस प्रीतीची मनी जागता
नेत्रातल्या अश्रूंनी
कड उशीची ओलावली

केव्हा तरी पहाटे...
स्वप्नामधील गावा
भेट तुझी झाली
अन् का कुणास ठाऊक
मनी हुरहूर दाटून आली

केव्हा तरी पहाटे...
मनी अनामिक असता ओढ
तुजसमवेत रहाण्याची
स्वप्नातहि परि मनी या
भीती अपूर्णतेची असावी
केव्हा तरी पहाटे...
तू जवळी असताना
गुंफून हात हाती
हलकेच मिठीत शिरूनी
पापण्यांची कवाडे हळुवार मिटुनी घ्यावी

केव्हा तरी पहाटे....
त्या मिटल्या नेत्रांनी

तुलाच रे पहावे
पुन्हा पुन्हा त्या स्वप्नांच्या
गावी मी विहरावे

केव्हा तरी पहाटे....
त्या गोड आठवात रमूनी
खुशाल नयनांतील
अश्रूंची फुले वहावी
ओठांची अलवार महिरप
नकळत
विलग होऊन खुलावी

केव्हा तरी पहाटे....



अश्विनी कुंटे

श्रावण संगीत

अलगद थेंब हे मातीसी गुज करिती
जणु देव्हाऱ्यात घंटा किणकिणती |
नर्तकीचा पदन्यास भासे भूवरती
वृक्ष पर्णही ताल धरूनि सळसळती ||

श्रावणाच्या सरी हलके ओघळती
जणू जलतरंगावर हलके बोटे फिरती |
सुरतालावर जलथल फेर धरती
आनंदाच्या बघा स्वरलहरी उठती ||

रोमारोमातूनी पडसाद उमटती
श्रावण आला श्रावण आला,सांगती |
तनमन अचानक मोहरून उठता,
सहस्त्र किरणे ही वरून बरसती ||

वाऱ्याचाही पावा घुमला
साथ देत ह्या मैफिलीला |
फुलाफुलातुनि हा सूर उमटला,
रंगात रंगुनी,सुगंधात ल्याला ||

रंध्रारंध्रातूनि रोमांच उठता
कणकण हे भारुन जाती |
श्रावणाच्या ओल्या धाग्यांनी
अलगद मनात शेला विणती ||



अलका धाराशिवकर

अध्यात्मपीठाची ज्ञानदात्री



कै. रजनीताई पटवारी यांनाआदरांजली

होती माझी सखी पाच -सहा वर्षांनी धाकटी
ज्ञान व मनसामर्थ्याने होती सर्वाहून मोठी
वागण्याबोलण्यातलं प्रेम व शब्द मृदू
गीता सार्थ सांगू लागताच मनावर होई जादू
तिचे निरूपण जणू वाटे
मलाच समजावणे
तिला वाटे हेच तिचे समाजाला देणे
वयाची ज्येष्ठता तिने ज्ञानदानाने मिरवली
तिच्या स्मरणशक्तीपुढे आमची शिरे नमली
तुम्ही असा कितीही मोठे
आपापल्या क्षेत्रात
तिचा मात्र दृढभाव वसे श्रीकृष्णात
संसारात सारीच नाती होती
तरीही कृष्ण मनात जपलेला
त्याच्या बुद्धिमत्तेला अन् शक्तीला
सदाच आदर वाहिलेला
अशी ही ज्ञानदात्री माऊली
कुठे अंतर्धान पावली?
मन शोधत राहील
सापडेल का दुसरी सावली?
देत राहिली तिजजवळचे सारे
माझी कुठे योग्यता कळण्या
तिचे ज्ञानाचे वारे?
त्या वाऱ्यासह ती कुठे लुप्त झाली ?
चुटपुट लावून गेली म्हणावे की
चंदनाची उटी हरवली?
आले डोळ्यात पाणी,
कृतज्ञतेने लवली पापणी
निरोप देताना आवरते मनाला
जोडोनी दो हात
वंदन रजनीताई तुम्हाला
वंदन रजनीताई तुम्हाला॥



नीला जोशी

विसर्जन

लाल माती हाती| घेऊनी मळूनी|
जल मिसळूनी| केला गोळा||
अवयव सारे| साकार झाले|
आकारी आले| गणराज||
सुकवी मातीला| ऊन आणि वारा||
येऊन भरारा| दृढ मूर्ती||
आप, तेज, वायू| पृथ्वीचे आभार|
शरीर साकार| झालेची ते||
स्थापिला मखरी| सुशोभित देह|
ॐकारा जुळते| शब्दब्रह्म||
.....
रुप, रस, गंध| शब्द आणि स्पर्श|
होई परामर्श| देहेची ह्या||
जोडिले हे हात| भाव मिसळले|
एकरूप झाले| देहभान||
साजिरे हे रूप| सोडवी ती कोडी
पिंडी ते ब्रह्मांडी| अनुभव||
विसर्जन होता| सद्गती मिळे|
पार्थिव मिसळे| निसर्गात||
मन शांत होई| मिटवी संदेह|
सोने होई देह| निर्वाणीला||



संजीवनी कुलकर्णी

पूर्वेचा कलंदर

पूर्वेचा कलंदर मी, पश्चिमेस शोधित आलो
विसरून मर्यादा,पश्चिमेस समजावीत राहिलो

जगण्याचा ध्यासच मी जिव्हारी रुतवून बसलो
इथल्या तळ्यात मी प्राजक्त शोधित फिरलो

उणे उणे हे अधिकच करीत बसलो
गुण्यागोविंदाचे गणित शोधित राहिलो

जगण्याची संस्कृती ही निवडीत बसलो
माझाच मला मी इथेच हरवून फसलो

घेऊन रंग माझे फुलतील का गुलाब इथले
गंध माझ्या मातीचा रुजवेल का वाऱ्यात इथले.

कातळ माझ्या मनातला सोसवेल का इथल्या मातीला
रुजवेल का गुलाबही पूर्वेचा पश्चिमेला

आर्तता माझ्या मनाची मी एकटाच शोधित होतो
घेऊन सारा पसारा मी पसाराच करीत बसलो

मी माझ्या सुखदुःखाचा हिशोब करीत बसलो
तेव्हाच रात्र झाली,मी पहाटेचा तारा शोधित राहिलो.



दीपक वाकडे

फक्त तू

तू गेल्यावर दूरदेशी,मी तुझ्याच आठवणीत रमतो
चाहूल तुझ्या असण्याची,मी घरात शोधित असतो

सोडूनि मजला पूर्वेस, तू गेली निघून पश्चिमेस
अस्तित्व माझे इथे जरी,मन तुझ्याच सोबतीस

तू नाही म्हणता घरात, हे घरही उदास होते
शुभंकरोति म्हणताना मनही कातर होते

असणे तुझे घरासाठी किती अनमोल असते
तू नसता इथे घरात, मला तुझे मोल कळते

नको मला ऐश्वर्य,क्षण हवेत तुझ्या सोबतीचे
तूच आहे माझ्यासाठी,आनंदी रिंगण सुखाचे



दिपक वाकडे

पांडवांचे प्रकटीकरण

(गीत महाभारत भाग दोन: युद्ध पर्व यातील पहिली कविता व तिची पार्श्वभूमी: पांडवांचे प्रकटीकरण. दुर्योधनाने राजसूय यज्ञ करण्याचे ठरवले. त्यासाठी लागणारे द्रव्य मिळवण्यासाठी त्याने प्रथम विराट नगरीवर आक्रमण केले व विराटचे गोधन पळविले. तेव्हा विराट पुत्र उत्तर व बृहन्नडा (अर्जुन) यांनी कौरवांना पळवून लावले व सर्व गोधन परत मिळविले. संध्याकाळ झाल्याने युद्ध थांबले आणि त्याच दिवशी पांडवांचा अज्ञातवास संपला. दुसऱ्या दिवशी सकाळी पांडव आपली सेवक वस्त्र टाकून राजवस्त्र परिधान करून दरबारात आले. युधिष्ठराला आपल्या सिंहासनावर बसलेले पाहून विराटला त्याचा राग आला. पण त्याच्या पुत्राने, म्हणजे उत्तराने त्याला अर्जुनाचा पराक्रम सांगून ते सर्व पांडवच आहेत असे सांगितले. राजा खजील झाला. त्याने युधिष्ठराची क्षमा मागितली. विराट राजा, अर्जुनाला त्याची मुलगी उत्तरा तिच्याबरोबर विवाह करण्याचा आग्रह करू लागला. पण अर्जुनाने ती माझी शिष्या असल्यामुळे ती माझी मुलगी झाली. त्यामुळे मी तिच्याशी विवाह करू शकत नाही. पण माझा मुलगा सुभद्रानंदन म्हणजेच अभिमन्यू याच्याशी तिचा विवाह कर असे सांगितले. लगेचच विवाह करण्याचे ठरले. सर्व राजांना निमंत्रणे गेली. सर्व राजे आपले एक-एक औक्षहानी अक्षौहिणी सैन्य घेऊन आले. सर्वांच्या उपस्थितीत अभिमन्यू- उत्तरा विवाह पार पडला. आता पांडवांचा, राज्य मिळविण्यासाठी काय करावे त्याचा विचार चालू झाला. मग ध्रुपदाने एका हुशार पुरोहिताला धृतराष्ट्राकडे पाठविले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. तेव्हा विदुर व कृष्णाने युद्ध टाळण्यासाठी धृतराष्ट्रास पांडवांना त्यांचे राज्य द्यावे, असे सुचवले. दुर्योधनास ते अमान्य झाल्याने युद्ध अटळ होते.)

वनवासाचे दिवस संपले
सेवक पण ते सोडून दिधले
पांडव म्हणूनही प्रगट जाहले
विराटासी नवल वाटले
विराट कन्या स्नुषा जाहली
अभिमन्यूला माळ घातली
विराट राजा धन्य जाहला

सुंदर झाला लग्न सोहळा
पांडवा आता सज्ज झाले
हाती घेण्या राज्य आपुले
द्रुपदाने मग सूचना देऊनी
विप्र धाडिला हस्तिनापुरी
सारे राजे गोळा झाले
सैन्य आपले घेऊन आले
सावध करण्या धृतराष्ट्राला
विप्र विदुर आणि कृष्णही गेला
धृतराष्ट्राला विचार पटले
राज्य अर्धे धर्मा दिधले
दुर्योधन तो आडवा पडला
तसूभर भूमी देण्याला
बोल तयाचे ऐकुनी कानी
कृष्ण जाहला रुष्ट मनी
परतुनी गेला पांडव सदनी
सज्ज राहण्या कथिले त्यांनी



श्रीमती सुहासिनी येवलेकर

महाल पहाडी..

उंच पहाडी डोंगरमाथा
किती तुडवल्या रानवाटा,
पल्याडच्या त्या शिखरावरती
गणरायाचा महाल मोठा..

त्याच्या भव्य प्रवेशद्वारी
घंटा पितळी वाजते आहे,
घंटेचा तो मधुर नाद
आसमंत घुमवत राहे..

महालाच्या रम्य अंगणी
गर्द वनश्री भुलवू पाहे,
जास्वदींच्या फुलासंगे
धरणी माता बहरत आहे..

आतील दरबारातून दिसते
गणेशाची शेंदुरी मूर्ती,
होते पूर्ण मनोकामना,
अशी तयाची आहे कीर्ती..

दुर्वाहार गळा लेवूनी
लागला भाळी अष्टगंध,
गाभाऱ्यातील मंद धुपाचा,
परिमल उधळे बेधुंद..

परतून येता महालामधुनी
उनाड वारा घाली साद,
अभंग तृप्ती मन पावते,
मुखी पेढ्याचा प्रसाद..



श्रेया शेखर नेवाळकर.



MMC गणेशोत्सव वृत्तान्त

'काळाय तस्मै नमः'

📅 शनिवार, २३ ऑगस्ट २०२५
गणेशोत्सव म्हणजे डीजेचा गडगडाट, अडखळत नाचणारे 'आयटम नंबर', आणि पैशांचा दिखावा, ही सवय भारतात हळूहळू वाढली आहे. पण MMC चा गणेशोत्सव २०२५ वेगळाच होता, लोकमान्य टिळकांनी स्वप्नात पाहिलेलं ऐक्य, भक्ती आणि संस्कृती याचं सुंदर दर्शन.

Barrington High School मध्ये प्रवेश करताच यश हटकर यांच्या चित्रप्रदर्शनाने मन जिंकले. बॉलिवूडच्या चेहऱ्यांपासून ते गीता मेडिटेशन सेंटरच्या उपक्रमांपर्यंत कला, अध्यात्म आणि परंपरेचं अनोखं मिश्रण दिसलं. तरुणाईच्या हातून बनलेला ईको-फ्रेंडली गणपती आणि साडी स्टॉलवरची गर्दी म्हणजे भक्ती आणि खरेदी हातात हात घालून चालली होती.

बाप्पा दर्शन आणि पूजा-आरतीने भक्तिभावाची सुरुवात झाली. त्यानंतर आली सांस्कृतिक मेजवानी—अद्भुत गणेश वंदना नृत्य, गंभीर स्वरांत गुंजलेलं अथर्वशीर्ष पठण, गीतेचा नववा अध्याय, सुरेल भक्तिगीत, आणि जोशात भरलेला देवीचा गोंधळ. वातावरणात श्रद्धा, जोश आणि भक्ती तिन्ही घटकांनी थिरकायला लावलं.

सूत्रसंचालनाची धुरा रश्मी चाफेकर यांनी उत्तमरीत्या सांभाळली. त्यांच्या गोड, नेटक्या पण हलक्या-फुलक्या विनोदाने रंगलेल्या प्रस्तावनांनी कार्यक्रमाला हवे तसे वलय प्राप्त झाले. फिलाडेल्फियाहून आलेल्या हास्यजत्रेने तर प्रेक्षकांना खळखळून हसवलं, मुख्य जेवणाच्या आधीची चविष्ट मेजवानी!

आणि जेवण? अहो विचारू नका! उकडीचे मोदक, तुपाने टचकन ओथंबलेले. सुरुवातीला मी जरा घाबरलो, पण कुणीतरी कानात कुजबुजलं—"प्रसादाला कॅलरी लागत नाहीत." मग काय, हात आपोआप दुसऱ्या मोदकाकडे वळला.

यानंतर माजी आमदार बाळासाहेब दांगट यांचा गौरव झाला. मराठी कार्य महाराष्ट्रात सुरू झालं, पण आज ते जगभर पोहोचलंय, याचा प्रत्यय आला. मग रंगमंचावर फिलाडेल्फिया पुरस्कारप्राप्त नाटक 'काळाय तस्मै नमः' विनोदात गुंफलेला गंभीर संदेश—स्वाभिमान, समानता आणि स्वातंत्र्याचा—रसिकांना हसवतही गेला, विचारातही पाडून गेला.

शेवटी ढोल-ताशा, लाठी-लेझीम, भगवे झेंडे आणि फुगडी यांनी विसर्जन सोहळ्याला शिखर गाठलं.

हा उत्सव म्हणजे फक्त सोहळा नव्हता तर भारतामध्ये हरवत चाललेला हेतू, परंपरा आणि संस्कृती परदेशात पुन्हा जिवंत करणं होतं.

या संपूर्ण सोहळ्याचं यश हे नमीताताई, उर्मिलाताई, मनोजजी, योगेंद्रजी, विशालजी, तसेच सर्व टीम्स, RISING YOUTH व DEDICATED PARENTS, सदैव हसतमुख व थकून न जाणारे स्वयंसेवक, आणि वरिष्ठ नेतृत्वाची धुरा सांभाळणाऱ्या ट्रस्टी मंडळींमुळे शक्य झालं. हेच खरं MMCचं बळ आहे.

लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने गणेशोत्सव सुरू केला—समाजाला एकत्र आणण्यासाठी—तोच उद्देश या उत्सवातून पुन्हा नव्याने अनुभवायला मिळाला.
'मैत्र जीवनाचे!'

आणि हो… शेवटी माझं डाएटसुद्धा मोदकांसोबत थाटामाटात विसर्जित झालं! 😄



राजीव गोखले

5K वृत्तान्त

स्पर्धकसंख्येच्या उच्चांकांमुळे गाजली महाराष्ट्र मंडळ शिकागोची पाच किलोमीटर धावणे स्पर्धा

ह्यावर्षी महाराष्ट्र मंडळ शिकागो कार्यकारिणीने 'जागतिक मैत्री दिना'च्या दिवशी तिसरी पाच किलोमीटर (5K) धावण्याची स्पर्धा यशस्वीरीत्या आयोजित केली. ही स्पर्धा नेहेमीच्या प्रघातापेक्षा वेगळी म्हणता येईल, कारण महाराष्ट्र मंडळ शिकागो कार्यकारिणीने एका विशेष उपक्रमाला देणगी देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन केले होते. श्री. यजुवेंद्र महाजन यांनी चालविलेल्या 'दीपस्तंभ मनोबल' या उपक्रमाला या स्पर्धेतून मिळालेली रक्कम पाठवली जाईल. ही स्पर्धा गेली तीन वर्षे आयोजित केली जात आहे. स्पर्धकांनी यावर्षी मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत उच्चांक गाठला. स्पर्धकांनी आणि पुरस्कर्त्यांनी स्पर्धेला भरपूर प्रतिसाद दिला. विशेष म्हणजे यात इतर अमराठी मंडळे व स्थानिक अमेरिकन लोकसुद्धा सहभागी झाले होते, हे अभिमानाने नमूद करावेसे वाटते, आणि हीच महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या उपक्रमांच्या यशस्वितेची खरी पोचपावती होती.



स्पर्धेचे परिपत्रक



स्पर्धेआधी वार्मअपमध्ये भाग घेणारे स्पर्धक

महाराष्ट्र मंडळ शिकागो केवळ मराठी लोकांसाठीच आहे असे नाही, तर सर्वांनाच आपल्या मराठी संस्कृतीची ओळख करून देत आहे व अमेरिकन समाजात आपला ठसा उमटवत आहे.

रविवारी, सकाळी उत्साहवर्धक हवामानात बसे वुडज् पार्क - रोलिंग मेडोज्च्या (Busse Woods Park - Rolling Meadows) लांब निसर्गरम्य झाडीतून व सरोवरावरील छोट्याशा पुलावरून भव्य धावपट्टीवर स्पर्धक धावतील अशी योजना होती. शिकागो परिसरातील सर्व लोकांसाठी ही स्पर्धा खुली होती. स्पर्धेत दीडशेहून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला.



स्पर्धेत सहभागी झालेले वेगवेगळ्या गटातील स्पर्धक

स्पर्धेच्या आयोजनासाठी आणि तयारीसाठी विशाल नवलकर व मंडळाच्या फिटनेस क्लब चमूने कित्येक आठवडे आधीपासून खूप मेहनत घेतली होती. स्पर्धेसाठी भव्य मोठी जागा निवडणे, शहर व सार्वजनिक उद्यानाची (park district) परवानगी घेणे, परिपत्रक तयार करणे, निमंत्रणे पाठविणे, स्पर्धेसाठी प्रायोजक (स्पॉन्सर) मिळविणे, नोंदणी टेन्ट उभारणे, स्पर्धकांची नोंदणी करणे, जलपान, नाश्ता व खाण्याची व्यवस्था करणे, स्पर्धेच्या कार्यक्रमाचे व स्पर्धा पूर्ण करताना स्पर्धकांचे फोटो घेणे व स्पर्धकांच्या धावण्याच्या वेळेची नोंदणी करणे, स्पर्धकांसाठी पदके (मेडल्स), प्रत्येक गटातील विजेत्यांसाठी करंडक व पारितोषिक चषक (Trophies) आणणे, या कार्यक्रमानिमित्त वाटल्या जाणाऱ्या खास टी-शर्टवरचे चित्र व लोगो डिझाइन करणे, स्पर्धेदरम्यान सर्वांची देखभाल करणे अशा अनेक बारीक-सारीक गोष्टींची त्यांनी सुंदर व्यवस्था केली होती.



स्पर्धेचे आयोजक व प्रायोजक (sponsors)

स्पर्धेच्या दिवशी स्पर्धकांना खास भारतातून मागविलेले टी-शर्ट व त्यावर लावण्यासाठी मोठे ठळक अक्षरातले स्पर्धक क्रमांक दिले गेले. ज्या ठिकाणी स्पर्धा सुरू होणार होती तेथे प्रायोजक, स्वयंसेवक आणि आयोजक जमले होते. जर स्पर्धेदरम्यान कोणाला शारीरिक इजा झाली, तर प्रथमोपचारासाठी फिजिओथेरपिस्ट देखील तेथे उपस्थित होते

भास्कर शेडगे, प्रियेश देशपांडे, माधव गोगावले, अमोल श्रीपाल, चेतन रेगे, सोहम जोशी, अनिरुद्ध दामले, मनोज भट, ज्योतिका जाधव, शलाका पालकर रेगे, ज्योती गोगावले, विशाल नवलकर इत्यादींनी नोंदणी टेन्ट व टेबल मांडणीसाठी नोंदणी भागाची पूर्वतयारी केली होती. मंडळाच्या सजावट चमूतील पल्लवी बेटसूर यांनी सुंदर व आकर्षक असा फलक (Board) तयार केला होता. बहुतेक सर्व स्पर्धक आपले फोटो त्या फलकासमोर काढत होते.

स्पर्धकांची नोंदणी झाल्यानंतर ह्या वर्षी प्रथमच फिटनेस क्लबचे सहआयोजक आनंद देशपांडे यांनी स्पर्धेआधी वार्मअप व्यायाम आणि स्पर्धा संपल्यानंतर कूल डाऊन व्यायाम कसा करावा याचे प्रशिक्षण स्पर्धकांना दिले. याला सर्व स्पर्धकांनी व जमलेल्या प्रेक्षकांनी विशेष दाद दिली आणि सर्वांनी यात भाग घेऊन अनेक नवीन व्यायामप्रकार आत्मसात केले. त्यानंतर आयोजकांनी स्पर्धेचे नियम व इतर सूचना दिल्यावर कधी एकदा स्पर्धा सुरू होते, याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते.

या प्रसंगी बालमित्रांनी अमेरिकेचे राष्ट्रगीत छान म्हंटले तर जमलेल्या सर्व भारतीय प्रौढ व्यक्तींनी भारताचे राष्ट्रगीत जबरदस्त आवाजात म्हंटले. राष्ट्रगीतानंतर स्पर्धा सुरू झाली. "गेट... सेट... रेडी" असा स्पर्धा सुरू होण्याचा हुकूम आयोजकांकडून मिळताच दहा वर्षांच्या बालकांपासून ते सत्तरी ओलांडलेल्या स्पर्धकांपर्यंत सर्वांनी धावण्यास अगर चालण्यास सुरुवात केली. त्यात काही मुरलेले, मॅरेथॉन स्पर्धेत सहभागी होणारे अनुभवी स्पर्धकही होते. धावपट्टीवर काही ठिकाणी जलपान व शीतपेयांची सोय केली होती. प्रेक्षक टाळ्या वाजवून स्पर्धकांना प्रोत्साहन देत होते. आपापल्या शारीरिक क्षमतेप्रमाणे सर्व स्पर्धक धावत किंवा चालत होते. ज्या ठिकाणी स्पर्धा संपते त्या ठिकाणी अनेक प्रेक्षक व आयोजक आनंदाने जल्लोष करत त्या सर्व स्पर्धकांचे कौतुक करत होते. प्रत्येकाला अखेरची रेषा ओलांडण्यासाठी खास दोरी लावली गेली होती. स्पर्धक ती रेषा ओलांडण्याचा आनंद घेत होते.

ह्यावर्षी मंडळाच्या ढोल ताशा पथकाचे आयोजक अनिरुद्ध दामले आणि त्यांचे सहकारी ढोल ताशाच्या गजरात स्पर्धा पूर्ण करणाऱ्या स्पर्धकांचे अभिनंदन करत होते. या स्पर्धेचे फोटो शलाका ब्रिजेन सावंत यांनी काढले आणि स्पर्धकांच्या वेळेचीनोंदणीसाठी चेतन रेगे आणि सहकाऱ्यांची मदत झाली. पाच किलोमीटर स्पर्धा पूर्ण केल्यानंतर प्रत्येकाला खास बनविलेले पदक देण्यात येत होते. दमलेल्या स्पर्धकांसाठी शीतपेये, फळे, व इतर पदार्थ अल्पोपाहार म्हणून देण्यात येत होते.

मंडळाचा कुठलाही कार्यक्रम असला की त्यात सगळे आयोजक मंडळाच्या अध्यक्षा नमीताताई वेदक यांच्या नेतृत्वाखाली खेळीमेळीने, एकजुटीने आनंदी वातावरणात कार्यक्रम साजरे करतात. हा कार्यक्रम पण त्याला अपवाद नव्हता. सजावट चमू आणि खाद्यपदार्थांचे प्रायोजक देखील स्पर्धेच्या आनंदी वातावरणात सहभागी झाले होते. शेवटच्या स्पर्धकाने स्पर्धा पूर्ण केल्यानंतर ज्याची सर्वजण वाट पाहत होते तो बक्षीस वितरणाचा कार्यक्रम सुरू झाला. मंडळाच्या अध्यक्षा नमीताताई वेदक व मुख्य आयोजक विशाल नवलकर आणि चमू यांनी प्रायोजकांचे आणि स्पर्धकांचे आभार मानले.



प्रायोजकांना आपल्या उपक्रमाबद्दल माहिती देण्यास सांगितले. एकल विद्यालयाचे ज्येष्ठ स्वयंसेवक व विभागीय अध्यक्ष ऋत्विज भट, डॉक्टर चंद्रा वेदक (Horizon Behavioral Health), मंडळाचे विश्वस्त माधव गोगावले, अध्यक्षा नमीताताई वेदक, नरेंद्र आणि नंदा काळे यांच्या हस्ते स्पर्धेच्या वेगवेगळ्या गटातील विजेत्यांना पारितोषके व चषक देण्यात आले. या प्रसंगाला उत्साहवर्धक ढोल ताशा गजराची साथ होती. एकंदरीत वातावरण अगदी जल्लोषमय झाले होते. शेवटच्या, साठ वर्षावरील पुरुष गटातील विजेते यांचे नाव जाहीर करण्यापूर्वी विशाल नवलकर यांनी प्रेक्षकांना विचारले, “या गटातील विजेते कोण असतील?” अनेक स्वयंसेवक, स्पर्धक आणि प्रेक्षक जल्लोषात म्हणाले, “एकच वादा माधव दादा”. विशाल नवलकर यांनी परत म्हटले, “इज देअर सरप्राईज विनर ?” परत प्रेक्षकांनी आणखी मोठ्या आवाजात “एकच वादा, माधव दादा” अशा टाळ्यांच्या कडकडाटात आरोळ्या ठोकल्या. मुख्य आयोजक नलवकर म्हणाले, “मंडळाचे अनेक क्षेत्रात प्रेरणास्थान असलेले माधव दादा गोगावले यांनी सतत तीन वर्षे (Three-peat) ह्या गटात विजय मिळवला आहे.”



यशस्वी स्पर्धकांची नावे:

अठरा वर्षाखालील युवा गट - अजय विरामिथु
अठरा वर्षाखालील युवती गट - हर्षिणी राजेश
एकोणीस ते साठ वर्षे पुरुष गट - विरामिथु करूप्पूसामी
एकोणीस ते साठ वर्षे महिला गट - अश्विनी पिंगळे
साठ वर्षांवरील पुरुष गट - माधव ना. गोगावले
साठ वर्षेवरील महिला गट - रश्मी चाफेकर

बक्षीस वितरण समारंभानंतर सर्व स्पर्धक व स्वयंसेवकांनी पिझ्झा, शीतपेये आणि बहुतेकांचा आवडता चविष्ट बटाटेवडा, पन्हं आणि शिरा इत्यादी खाद्यपदार्थांचा आस्वाद घेत परस्परांशी संवाद साधला. मंडळाच्या अन्नपूर्णा गटातील अपर्णा खळदकर, उर्मिला दामले, अश्विनी कुंटे, अर्चना श्रीपाल, अनुप देशमुख, अरुंधती जाधव, चेतन रेगे, नमीताताई वेदक आणि त्यांचे सहकारी हे सर्व खाद्यपदार्थाची तयारी करून अगदी आग्रहाने स्पर्धकांना व स्वयंसेवकांना खमंग व रुचकर पदार्थ वाढत होते.
या स्पर्धेसाठी एकल विद्यालयाचे अधिकारी - ऋत्विज भट्ट, निशंदू बक्षी, निरमेश पटेल व इतर स्वयंसेवक, अन्य संस्थांचे प्रायोजक - डॉक्टर चंद्रा वेदक, श्री. नरेंद्र आणि नंदा काळे, महाराष्ट्र मंडळाच्या कार्यकारिणीचे सदस्य, मंडळाचे काही विश्वस्त आणि स्वयंसेवक सभासदांनी वेगवेगळ्या आघाड्यांवर केलेल्या मदतीमुळे, महाराष्ट्र मंडळ शिकागोच्या इतिहासातील हा स्पर्धकांचा उच्चांक असलेला आणि 'दीपस्तंभ मनोबल' या उदात्त उपक्रमाला मदत करणारा कार्यक्रम यशस्वी झाला.
धडाडीच्या कार्यकर्त्या आणि मंडळाच्या ज्येष्ठ विश्वस्त उल्का नगरकर यांनी वेगवेगळ्या समूहांवर आवाहन करून जास्तीत जास्त स्पर्धकांना या कार्यक्रमात सहभागी करून घेण्यासाठी मोलाची मदत केली.
जून- जुलै या काळात अमेरिकेत आलेली उष्णतेची लाट, कॅनडातील अनेक जंगलांना लागलेले वणवे आणि त्यामुळे झालेले प्रदूषण या पार्श्वभूमीवर स्पर्धेपूर्वीच्या दोन-तीन दिवसांच्या मस्त, आल्हाददायक हवामानाचा आनंद घेण्यात मग्न झालेले शिकागोनिवासी, उन्हाळ्याची सुट्टी अशा अनेक गोष्टींमुळे कार्यक्रमास कितपत प्रतिसाद मिळेल, याची आयोजकांना चिंता होती, परंतु शुभ संकल्प, सर्व कार्यकर्त्यांची सकारात्मक वागणूक, लागेल तेथे झटून कामे करत मनापासून एकमेकांना मदत करण्याची प्रवृत्ती या सगळ्या सकारात्मक गोष्टींमुळे दीडशेहून अधिक स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले. 'दीपस्तंभ मनोबल' संस्थेला मदत, स्पर्धकसंख्येचा उच्चांक, स्पर्धेआधी वार्मअप आणि स्पर्धा संपल्यानंतर कूल डाऊन व्यायाम प्रशिक्षणाचा नवीन उपक्रम, ढोलताशाचा गजर, सतत तीन वर्षे (Three -peat) स्पर्धा जिंकणारे स्पर्धक अशी अनेक आगळीवेगळी वैशिष्ट्ये असलेली आणि धूमधडाक्यात पार पडलेली ही स्पर्धा नक्कीच सर्वांच्या लक्षात राहील.



संकलन: माधव ना. गोगावले

शिकागोच्या भूमीवर घुमला 'ज्ञानोबा-माऊली' चा जयघोष!

स्वातंत्र्यदिनाचा अभूतपूर्व सोहळा!

संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त शिकागो महाराष्ट्र मंडळाचा अनोखा 'पालखी' सोहळा ठरला आकर्षणाचे केंद्र!



शिकागो, १६ ऑगस्ट: भारतभूमीपासून हजारो मैल दूर, अमेरिकेच्या शिकागो शहरात भारतीय स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सवी जल्लोष साजरा होत असताना, एकीकडे तिरंग्याला मानाची सलामी दिली जात होती आणि दुसरीकडे 'ज्ञानोबा-माऊली-तुकाराम' चा गजर आसमंतात घुमत होता. परंपरा टीममधील सभासदांनी पालखीसमोर ढोलताशाच्या गजराच्या तालावर धरलेला फेर, खेळलेल्या फुगड्या लोकांचे प्रमुख आकर्षण बनले होते. आशिया मेडिया वार्ताहरांनी तर फुगड्यांची आणि फेराची पुन्हा पुन्हा चित्रफीत केली. शिकागो आणि उपनगरांतील भारतीयांनी साजरा केलेला स्वातंत्र्यदिनाचा सोहळा यंदा एका विशेष कारणासाठी अविस्मरणीय ठरला - तो म्हणजे शिकागो महाराष्ट्र मंडळाने (MMC) संत ज्ञानेश्वर महाराजांच्या ७५० व्या जयंतीनिमित्त आयोजित केलेला नयनरम्य 'पालखी' सोहळा! शिकागोच्या रस्त्यांवर भक्तिभावाने सजलेल्या पालखीसोबत पारंपरिक रीतीने, मराठमोळी मिरवणूक काढण्यात आली होती "माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंहि पैजा जिंके ।" (ज्ञानेश्वरी ६.१४)



शिकागो महाराष्ट्र मंडळाने स्वातंत्र्याच्या जल्लोषाला आध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरेची एक सुंदर जोड दिली होती. संत ज्ञानेश्वर महाराजांचे हे ७५०वे जयंती वर्ष, आणि याच औचित्याने मंडळाने माऊलींच्या पालखीचा एक सुशोभित कार्यक्रम तयार केला होता, दोन वेगवेगळ्या ठिकाणी भव्य मिरवणुका काढण्यात आल्या. आळंदीच्या पवित्र भूमीतून प्रेरणा घेऊन, शिकागोच्या रस्त्यांवर पारंपरिक वारकऱ्याप्रमाणे गळ्यात तुळशीची माळ, कपाळावर चंदनाचा टिळा, डोक्यावर पांढरी टोपी, घातलेल्या ज्ञानदेव माऊलींच्या भक्तांनी भक्तिभावाने सजलेली पालखीची मिरवणूक काढली.

बफेलो ग्रोव्ह येथे झालेल्या मिरवणुकीत MMC च्या स्वयंसेवकांनी पारंपरिक मराठी वेशभूषा परिधान करून ढोल ताशांच्या गजरात पालखीचे स्वागत केले. 'लेक काऊंटी इंडियन असोसिएशन' कार्यक्रमाच्या सह-आयोजक स्वाती संतोष कुकियन यांनी माधवदादा गोगावले यांना संत ज्ञानेश्वरांची पालखी व ढोल ताशा मिरवणूक निघण्याच्या एक तासअगोदर महाराष्ट्र मंडळाच्या कार्यक्रमाबद्दल माहिती देण्यासाठी स्टेजवर आमंत्रित केले. त्यावेळी जमलेल्या प्रेक्षकांना माधवदादा यांनी महाराष्ट्र मंडळ शिकागो करत असलेल्या वेगवेगळ्या उपक्रमांबद्दल तसेच पारंपरिक ढोल ताशा लेझीम आणि संत ज्ञानेश्वर माऊलींचे ७५०वे जयंती वर्ष, ज्ञानेश्वरी, आणि पालखीबद्दल थोडक्यात माहिती सांगितली. या कार्यक्रमाचे विशेष महत्व म्हणजे या मिरवणुकीला इलिनॉय राज्याच्या ५९व्या जिल्ह्याचे प्रतिनिधी (State Representative) श्री. डॅनियल डिडेच (Daniel Didech) यांनी आवर्जून उपस्थिती लावली. इतकेच नव्हे, तर बफेलो ग्रोव्ह शहराचे पोलीस आयुक्त आणि अग्निशमन दलाचे वरिष्ठ अधिकारीही, भारताचे कन्सुलेट जनरल मा. सोमनाथ जी घोष या आनंदात सहभागी झाले होते. श्री. डिडेच यांनी भारतीय समुदायाच्या उत्साहाचे आणि आपल्या संस्कृतीवरील प्रेमाचे कौतुक केले. माधवदादांकडून माऊलीच्या कार्याची महती समजावून घेतली. अमेरिकन प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीमुळे या सोहळ्याला एक वेगळीच उंची प्राप्त झाली. सोहळ्याची सुरुवात बफेलो ग्रोव्ह (Buffalo Grove) उपनगरात आयोजित केलेल्या शानदार मिरवणुकीने झाली. सकाळच्या उत्साहपूर्ण वातावरणात, भारतीय नागरिक तिरंगा ध्वज अभिमानाने फडकावत सहभागी झाले होते.







या मिरवणुकीत शिकागो महाराष्ट्र मंडळाची 'माउलींची पालखी' सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. या पालखीने केवळ महाराष्ट्राच्या समृद्ध संत परंपरेचे दर्शन घडवले नाही, तर अमेरिकेत वाढणाऱ्या नव्या पिढीला आपल्या मुळांची ओळख करून देण्याचे मोलाचे कार्यही केले.
दिवसाचा मोठा कार्यक्रम शॉम्बर्ग (Schaumburg) येथील 'नॅशनल इंडिया हब' येथे दुपारी ४:३० वाजता आयोजित करण्यात आला होता. हे ठिकाण भारतीय समुदायासाठी एक सांस्कृतिक केंद्र बनले आहे. या ठिकाणी अक्षरशः जनसागर लोटला होता. अंदाजे ३ ते ४ हजार भारतीय नागरिक या सोहळ्यासाठी जमले होते आणि भारतभूमीच्या जयजयकाराच्या घोषणा देत होते. संपूर्ण परिसर तिरंग्याच्या तीन रंगांनी आणि देशभक्तीच्या भावनेने भारलेला होता.



नॅशनल इंडिया हब'मधील कार्यक्रमात देशभक्तिपर गीतगायन, पारंपरिक नृत्य आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल होती. भारतीय खाद्यपदार्थांच्या स्टॉल्समधून येणारा खमंग सुवास आणि सोबतीला देशभक्तीच्या गीतांचे सूर, यामुळे संपूर्ण वातावरण एखाद्या जत्रेसारखे झाले होते. या उत्सवी वातावरणात, मराठी संस्कृतीचे प्रमुख वैशिष्ट्य असणारा सोहळा, माऊलींची पालखी म्हणजे जणू काही शांततेचा, ज्ञानाचा आणि भक्तीचा संदेश देणारी एक शीतल लहर होती. महाराष्ट्राचं आद्य दैवत, वारकरी संप्रदायाचे कुलदैवत आणि अवघ्या विश्वाची माऊली - विठू माऊली!! श्री ज्ञानेश्वर माऊलींनी जिच्या चरणी संपूर्ण जगासाठी पसायदान मागितले त्या ज्ञानेश्वरांची प्रतिमा जमलेल्यांना एक चेतना देत होती. अनेक भक्तगण पालखी जवळ येऊन माऊलींचे दर्शन घेत होते. दुपारचे रणरणतं ऊन, घाम गाळणारं तापमान मधेच पडलेल्या मुसळधार पावसानंतर देखील लोक मिरवणुकीत सहभागी होण्यापासून परावृत्त झाले नाहीत. जसजसा पाऊस जोरात येत होता तसतसे ढोलताशा पथक तितक्याच जोरात वाद्य वाजवीत होते. अशा पावसाला न जुमानता पालखी व ढोल ताशा पथक आपल्या मार्गावर पुढे पुढे वाटचाल करत होते. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आपण या पालखी सोहळ्यात सहभागी झाल्याचं समाधान दिसत होतं.



ह्या कार्यक्रमाचे काटेकोर नियोजनाचे श्रेय श्री. माधवदादा गोगावले आणि त्यांची टीम, नमीताताई वेदक, उर्मिला दामले, मनोज भट, चेतन रेगे यांच्याकडे जाते. ढोलताशा पथकाचे नेतृत्व श्री. अनिरुद्ध दामले यांनी केले. लेक काऊंटी इंडियन असोसिएशन येथे महाराष्ट्रातील प्रतापगडाचा अप्रतिम देखावा पल्लवी बेटसूर आणि अश्विनी कुंटे यांनी सजविला होता. प्रतापगड किल्ला महादेव व मनीषा दिवेकर यांनी केला होता. किल्ल्यावर ठेवलेली छत्रपती शिवाजी महाराजांची मूर्ती सर्वांचे लक्ष वेधून घेत होती. माऊलींची पालखी दीपा व नरसिंह कामत यांनी केवळ तीन दिवसात आकर्षकरीत्या सजवून तयार केली.



पालखीचे भोई माधवदादा गोगावले, श्रीदत्त राऊत, नरसिंह कामत आणि मनोजदादा भट होते. विशेष म्हणजे, युवा पिढीतील जतिन जाधव, सोहम व श्लोक आगाशे, श्री रेगे, साना कुळकर्णी, सिया जोशी यांनी उत्कृष्ट- ढोलताशा वाजवला. मंडळाच्या ढोल ताशा पथकात चैतन्य, सोनल, श्लोक,आगाशे, सोहम जोशी, सदानंद, तेजस्विनी, सिया, जौशी काकू, चेतन, श्री, राम रेगे, श्रुती, रिद्धीश, साना कुळकर्णी, मंजुषा पांडे, मयुरा, रियाना देशपांडे, कविता वाडकर, सणस परिवार, शिल्पा देशपांडे, शलाका सावंत, अनुराधा पुष्कर, अनुपमा भट, तेजस्विनी जोशी, श्रुती कुलकर्णी, मीनाक्षी हेडाऊ, नम्रता भुलेशकर, मयुरा देशपांडे, साना कुलकर्णी, सिया जोशी, सोहम जोशी, नवीन आणि रुद्र शेणॉय, ज्योतिका,अरुंधती, अरविंद जाधव, अनिरुद्ध, उर्मिला, अर्ची दामले, माधवदादा गोगावले, नमीता वेदक, डॉ. चंद्रा वेदक, ब्रिजेश व शलाका सावंत, अर्चना आणि अनिरुद्ध भिडे, संकल्प लागते, कबोरी पाटील, दीपा व नरसिंह कामत, पवार परिवार, सुनीला आणि प्रसाद कुलकर्णी. मंडळातील अनेक ज्येष्ठ नागरिक श्वेता व विष्णू महाडेश्वर, श्रीधर व प्रभा दामले, माधवदादा गोगावले, रेखाताई व सुभाषकाका देवधर, सुचिता व विकास भालेराव, अलकाताई रिसवाडकर, अनिताताई गोडबोले, प्रकाशकाका अंतुरकर, अनुपमाताई भट, नमीताताई व डॉ. चंद्रा वेदक, आशाताई खासबागे व इतर पालखी सोहळ्यामध्ये भक्तिभावाने तल्लीन झाले होते. नेहमीप्रमाणे उल्का नगरकर सर्वांना प्रोत्साहन देत होत्या.

शिकागो महाराष्ट्र मंडळाने पुन्हा एकदा दाखवून दिले की, देह जरी परदेशात असला, तरी मन आणि आत्मा कायम भारतभूमीच्या आणि आपल्या समृद्ध परंपरेच्या चरणी लीन आहे. MMC च्या सहभागामुळे महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा आणि संत परंपरेचा गौरव जागतिक स्तरावर पोहोचवण्यात आला.

भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ।।



संकलन: श्रीदत्त राऊत

शब्दकोडे



आडवे शब्द्

१. खबदाड, गुंफा, दगडातील विवर
३. कापडावरील नक्षीकाम, कशिदा काढण्याची कला
६. चांदणी
८. माळरानावर गुरे चारण्याची परवानगी मिळवण्यासाठी द्यायचा पैसा
९. साखळी लवलेला टांगुन ठेवाण्याजोगा पितळी दिवा
१०. दहावी रास
११. उघडणे व बंद करणे अशी क्रिया
१३. धोबी, परीट
१५. सुखकर, मंगलमय
१६. अंतरिक्षात जाऊन आलेला
१८. डावखुरा
२०. घाईघाईनं
२१. फौजेसाठी पाठवण्याचा दाणागोटा
२२. बाजी प्रभूंनी लढवलेली खिंड
२४. ओझे वाहून नेणारा
२६. प्रथम सामना
२७. कुऱ्हाडीने लाकूड तोडण्याची कृती
२८. शांत

उभे शब्द्

१. करुणा, अनुकंपा
२. पळपुटा, पलायन करणारा, ऋषी कपूर / नीतू सिंग चित्रपट!
३. चांगुलपणा
४. लगेचच्या लगेच
५. इमारतीचा माळा, माडी
६. रक्षण करणारा
७. एक प्रकाशमान किडा
१०. इतरांच्या मनातील विचार ओळखणारा
११. आयुष्याचा अखेरचा भाग
१२. माघारी वळवून
१४. कंबरपट्टा
१७. बेढब, वेडावाकडा
१९. चैत्र शुक्ल पक्षाचा नववा दिवस
२१. जमिनीतून शोषलेले पाणी झाडाच्या इतर भागांना पोचवणारी सूक्ष्म नलिका
२२. स्वामी स्वरूपानंदांची समाधी येथे आहे
२३. लहान अंगरखा, कुडता
२४. निष्फळ, व्यर्थ
२५. अनुकंपा, दया



संकलन - अभिजित रायरीकर

गंमत शब्दांची

आठवडा

'आठवडा' या शब्दाची गंमत अशी आहे, की याचा अर्थ आहे 'सात दिवसांचा कालावधी', आणि यात 'आठ' हा शब्द समाविष्ट आहे. त्यामुळे इतिहासाचार्य राजवाडे किंवा प्रो. कृ. पां. कुलकर्णी इत्यादी भाषासंशोधकांना या शब्दाची कशी व्युत्पत्ती लावावी, असा प्रश्न पडला आहे. त्यातल्या त्यात पटणारी व्युत्पती अशी आहे, की नेमाडी भाषेत सात ह्या संख्येला हाट म्हणतात. सात दिवसांची मजुरी देतात तिला हाटवटी म्हणतात. हाट म्हणजे बाजार असाही अर्थ आहे. बाजाराच्या दिवशी मागील सात दिवसांची मजुरी देतात. बहुधा या हाटवटी शब्दावरून हाटवडा असा शब्द निघाला असावा, असं महाराष्ट्र शब्दकोशकार म्हणतात.

कालगणनेनुसार आठव्या दिवशी पहिल्या वाराची आवृत्ती होते. म्हणजे तोच वार परत येतो. त्यामुळे जे कालमापन संपल्यावर आठव्या दिवशी परत पहिला वार येतो ते सात दिवसांचे कालमापन म्हणजे आठवडा, असंही एक मत आहे.

डॉ. विश्वनाथ खैरे यांनी या मतापेक्षा वेगळे मत सूचित केलेलं आहे. ते म्हणतात, "आठ हा शब्द संस्कृत 'अष्ट' वरून आला असं धरलं तरी आठवडा हा 'आठ' या मराठी शब्दावरून साधलेला मराठी शब्द आहे. त्यामुळे ' अष्टवृत्त' या पंचांग परिभाषेतल्या संस्कृत शास्त्रीय शब्दाशी त्याचा संबंध जोडण्याचं कारण दिसत नाही.

आजही खेड्यापाड्यातली बाया माणसं ' बुधवार बुधवार आठ' असे दिवस मोजतात. मराठीच्या आदिकाळातल्या अडाण्यांच्या दिनमापनाचा हा शब्द आहे. पाचांचा समूह तो ' पाचुंदा' असाच आठांचा तो आठवडा. असा 'आठवडा' शब्द आठ या मराठी आकड्यावरून आला. समाजात बाजार वगैरे असल्यामुळे 'हाट'(बाजार) हे आठवड्याचे मूळ म्हणून सुचवण्यात कालविपर्यास होतो. शिवाय आठवड्याचा बाजार या अर्थी 'साते' हा ' सात' वरून आलेला शब्द जुन्या मराठीत आहेच. ('दुडीवर दुडी सातें निघाली.')

तात्पर्य काही काही शब्द भाषेत असे असतात, की त्यांची व्युत्पत्ती काही नीट लावता येत नाही. भाषा संशोधकांसमोर असे शब्द अगदी आव्हान म्हणूनच उभे ठाकतात. आठवडा हा शब्द असा आहे.



डॉ.द. दि. पुंडे

सुख नव्हे सुखरूपता

परमपूज्य श्री. मंगेशदादा फडके हे कॅलिफोर्निया येथे वास्तव्यास असून प.पू. श्रीकृष्ण दत्तात्रय देशमुख उपाख्य प. पू. डॉक्टरकाका यांचे कृपांकित शिष्य आहेत व त्यांच्याच कृपेने आज स्वतः सद्गुरुपदी विराजमान आहेत. सद्गुरूंच्या कार्यासाठी आपल्या यशस्वी व्यावसायिक कारकीर्दीतून निवृत्ती घेऊन अनेक पारमार्थिक कार्यक्रमाचे आयोजन, विविध आध्यात्मिक विषयांवरील निरूपणे व प्रवचनांच्या माध्यमातून ते सातत्याने प्रबोधन करीत असतात. त्यांच्या निरूपणाचा लाभ अध्यात्मपीठावरील श्रोते घेतच असतात; पण त्यांच्या या अध्यात्मविषयक सदरातून आपल्याही अनेक प्रश्नांचे निरसन होईल अशी आमची खात्री आहे - टीम रचना)

भाग ३

।। श्री गणेशाय नमः ।।

आपल्या सर्वांच्याच मनात अध्यात्म किंवा परमार्थ याविषयी कुतूहल असते, काही प्रश्न असतात. पुढील काही लेखांमध्ये शास्त्रप्रणीत म्हणजे वेदान्तशास्त्राच्या आधारे व संतप्रणीत म्हणजे संतांच्या उपदेशाच्या आधारे परमार्थाविषयी मूलभूत संकल्पना आपण समजून घेणार आहोत, ज्यायोगे आपल्या प्रश्नांची उत्तरे मिळण्यास मदत होईल.
साधकाच्या प्रामाणिक प्रश्नांची उत्तरे मिळण्याची ईश्वरीय व्यवस्था असते. ईशकृपेचे ते स्वरूप आहे. 'रचना' संकल्पित 'सुख नव्हे सुखरूपता' ही लेखमालिका त्याचाच एक भाग आहे ही आमची श्रद्धा आहे.

मागील अंकात आपण विषयसुखाचा अनुभव तीन स्तरांवरती कसा येतो हा विचार बघितला. त्याचप्रमाणे सुखासाठी विषयप्राप्ती आवश्यक नाही हे झोपेच्या उदाहरणाने समजून घेतले. भोगाचा एकही विषय नसताना, इंद्रियांचा काहीही सहभाग नसताना व अंतःकरण पूर्ण शांत असताना सहज अनुभवाला येते, ती 'सुखरूपता'. त्यालाच परमार्थशास्त्रात 'आनंद' असे म्हणतात; असे थोडक्यात सुखाचा अनुभव, तर्क व शास्त्र या तीन दृष्टीने विचार केला.

या अंकात विचारांची (चिंतनाची) तीच शृंखला सुरू ठेवून निर्माण होणाऱ्या काही प्रश्नांची उत्तरे बघू या -

१) विषयातून प्राप्त होणाऱ्या सुखाची नेमकी प्रक्रिया काय आहे ?

प्रत्यक्ष विषयभोगाच्या क्षणी जेव्हा आपले अंतःकरण शांत होते, तेव्हा आपल्या हृदयात सतत असलेल्या सुखरूपतेचा प्रत्यक्ष अनुभव येतो. परंतु, भ्रमाने मला विषयामुळे सुख मिळाले असे वाटते. उदा. चहाचा पहिला घोट (शांतपणे घेतला असल्यास) प्रिय, मोद व प्रमोद या क्रमाने अंतःकरणाच्या मन, बुध्दी, चित्त व अहंकार या चारही वृत्ती क्षणमात्र शांत होतात व आत असलेले आत्मसुख प्रगट होते. परंतु, चहाने सुख दिले असा (गैर)समज होतो.

म्हणूनच ज्ञानेश्वर महाराज नवव्या अध्यायात उपदेश करतात "तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्वसुखाचा आरामु । की भ्रांतासी कामु । विषयांवरी" ॥ज्ञा ९.६०॥

भावार्थ - त्याप्रमाणे योगी ज्याच्या स्वरूपात रममाण होतात, सर्व सुखाचे जणू उद्यान असा मी आत्माराम हृदयात असताना भ्रांताला इच्छा विषयाची असते. (आहे एका ठिकाणी व शोधतो दुसऱ्या ठिकाणी त्याला भ्रांत म्हणतात.)

समर्थ रामदास स्वामी तत्सम उपदेश करतात "सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन । त्यासी कैंचे समाधान । लोलंगतासी" ॥दा ३.१०.६२॥

भावार्थ - आनंदरूप राम सोडून जो अस्थिर विषयांच्या चिंतनात राहतो त्या विषयासक्ताला समाधान मिळणे शक्य नाही.

सारांश - शास्त्र, संत, व माझा सांसारिक अनुभव मला एकमुखाने शिकवीत असतात, की सुख विषयात नाही. विषयप्राप्तीच्या निमित्ताने अंतःकरण तात्पुरते शांत झाले, की तेवढ्यापुरते आतले सुख प्रकट होते. त्यामुळे तो विषय कायम राहिला, तरी त्यातील सुख ओसरत जाते (उर्वरित चहाच्या घोटांप्रमाणे) आणि आपले मन दुसऱ्या कुठल्यातरी वासनापूर्तीच्या मागे धावून निश्चलता गमावून बसते. परिणामी आत्मसुखाचा येणारा अनुभव येईनासा होतो.

२) सुख आणि सुखरूपता (आनंद) यात नेमका फरक काय आहे ?

वरील प्रश्नाच्या उत्तराच्या पार्श्वभुमीवर सुख (विषयसुख) व आनंद (आत्मसुख किंवा सुखरूपता) यातील फरक लक्षात घेऊ.

अ) विषय सुखाच्या भोगासाठी देह व इंद्रिये पूर्ण बलवान असावी लागतात. ती कुठे कमी पडल्यास आत्यंतिक दुःख होते. आत्मसुखात इंद्रियांची काही गरजच नसते. त्यामुळे देह असून नसल्यासारखा होतो (बाध).

आ) विषय सुखाच्या भोगासाठी विविध विषयांची आवश्यकता असते. विषय (वस्तूजन्य किंवा व्यक्तिजन्य) हवा तेवढा, हवा तितका, हवा तसा, हवा तेव्हा मिळत नाही. हेच पारतंत्र्य! आत्मसुखात विषयाची मुळी गरजच नसते. हेच स्वातंत्र्य!

इ) आजारी, अशक्त, वृद्ध यांना विषयसुख भोगणे कठीण होते. त्यासंबंधीचे प्रयत्न केविलवाणे ठरतात. आत्मसुख अखंड असल्याने त्याला वय, आरोग्य इत्यादी अटी नसतात. या संदर्भात पावसच्या स्वामी स्वरूपानंदांचे उदाहरण प्रसिद्ध आहे. त्यांच्या आयुष्याची शेवटची कित्येक वर्षे अंथरुणाला खिळून असलेल्या अवस्थेत गेली तरी प्राप्त आत्मस्थितीला, आनंदाला यत्किंचितही धक्का नव्हता. ई) विषय सुखाचा काही काळानंतर वीट येतो, तर आत्मसुखाची गोडी अवीट असते.

उ) विषयसुख सातिशय असते म्हणजे एका विषयसुखापेक्षा दुसरे विषयसुख जास्त असू शकते. तर आत्मसुखाची गोडी अवीट असते. ते निरतिशय असते. तैत्तिरीय उपनिषद, मनुष्यापासून ब्रह्मदेवापर्यंत प्राप्त विषयसुखापेक्षा आत्मसुख सर्वश्रेष्ठ आहे असे प्रतिपादन करते.

ऊ) विषयसुखात मनाची तात्पुरती तृप्ती होते व विषयप्राप्तीची वासना वाढती राहते. आत्मसुखात मन जसे तृप्त होऊ लागते तसे विषयसुखांची इच्छा कमी होऊ लागते. अखेर मनाचे मनपण नाहीसे होऊन (उन्मन) होऊन ते सुखरुप होऊन जाते. कधीही न ढळणारी शांति प्राप्त होते.

ए) विषय सुखासाठी देह फार आवडतो. 'देह म्हणजेच मी' ही समजूत भक्कम राहते. देहाचे मरण अतिदु:खकारक वाटते. विषयवासना भरपूर शिल्लक राहून कर्मानुसार पुन्हा जन्म प्राप्त होऊन सुखदु:खांची मालिका कायम राहते. आत्मसुखात देहाचे प्रेम कमी कमी होत जाते. 'मी देह' असे न वाटता निराकार, निरवयव, व सुखरुप आत्मा मी आहे असा प्रत्यक्ष अनुभव येतो. उर्वरित आयुष्य अत्यंत आनंदात जाऊन, त्याच आनंदात या देहाचा व जगाचा निरोप घेता येतो.

ऐ) विषयभोगासाठी पुढील जन्म माणसाचा मिळतोच असे नाही. आत्मसुख प्राप्तीनंतर पुन्हा जन्म नाही कारण शेष प्रारब्ध उदासीन वृत्तीने भोगून संपते व संचित ज्ञानाग्नीने भस्म होऊन जाते.

ओ) अखंड विषयभोगाने शक्ती क्षीण होते. प्रपंच व परमार्थ कोठेच प्रगती होत नाही. आत्मसुखात अखंड तृप्ती असल्याने परमार्थ व कर्तव्यरूपी प्रपंच दोन्ही उत्तम करता येतात.

पुढील अंकात, निद्रेतून प्राप्त होणाऱ्या सुखाची प्रक्रिया काय आहे, तसेच जीवाला फक्त सुखाचीच अपेक्षा असून दु:ख अनिवारपणे त्याच्या वाट्याला का येते? इत्यादी प्रश्नांचा विचार करू.

।। जय जय रघुवीर समर्थ ।।



परमपूज्य श्री. मंगेशदादा फडके

तन-मनाचा भोवरा

सोशल एनक्साईटी डिसऑर्डर

आई संगीत विशारद, वडील तबला वादक अशा कलाकार जोडप्याची एकुलती एक मुलगी सानिका वय वर्षे १७. 'सरगम' विद्यालयात सर्वांची लाडकी, गाण्याचे बाळकडू तसे जात्याच मिळालेले. आकाशवाणी, दूरदर्शन, शाळा आंतरमहाविद्यालयीन, विभागीय सगळ्याच स्तरांवर सरावलेली. पण आता मात्र सगळे एकदम कोलमडले सानिकाचे. टीव्ही शोमधल्या एका ऑडिशनसाठी गेली आणि गायला सुरुवात करताना अचानक तिची कानशिलं गरम झाली, चेहरा लाल झाला. छातीत धडधडायला लागले. घसा कोरडा पडला. हातपाय लटलट कापायला लागले आणि आल्या पावली सानिका परत गेली.

बिनसले असेल काहीतरी म्हणून आई-वडिलांनी दुर्लक्ष केले. पण त्यांनंतर झाले असे, की सानिकाने गाणेच पूर्णपणे सोडून दिले. आईबाबा तिला घेऊन मानसोपचार तज्ज्ञाकडे आले. मागील सर्व घटनाक्रम कथन करून आई म्हणाली, "गाणे तर सुटलेच पण यात अधिक भर म्हणून सगळ्या तोंडी परीक्षांत तिचा परफॉर्मन्स ढासळत गेला. कॉलेजचे रिपोर्ट कार्ड्स आले. थिअरी परीक्षेत अगदी छान मार्क्स; पण तोंडी परीक्षेत सगळीकडे लाल रेघा. सगळ्यांत उज्ज्वल प्रतिमा असलेली सानिका हिरमुसून, कोमेजून गेली आहे. घरात कोणी पाहुणे आले, मित्रमंडळी आली तर ही खोलीच्या बाहेरसुद्धा निघायला तयार होत नाही. ज्या हिरिरीने, उत्साहाने सानिका पेटी हातात घ्यायची तीच पेटी आता धूळ खात पडली आहे." सगळे काही आई सांगत होती. पण सानिका मात्र मान खाली घालून बसलेली होती. "अगं, बोल काहीतरी" म्हणून बराच आग्रह केला आईने, पण सानिका काही बोलेना! नंतर मग डॉक्टरांनी आई- बाबांना बाहेर बसवले. सानिकाला विश्वासात घेतले. तिला सांगितले, "सानिका, बऱ्याच जणांना असा त्रास होतो. सोशल फोबिया हा एक प्रकारचा भयगंड आहे. जमावासमोर आपला परफॉर्मन्स देताना आपल्याला लोक हसतील का? नावं ठेवतील का? काहीतरी टीकाटिप्पणी करतील का? अशा विचारांनी खूप जास्त भीती वाटायला लागते आणि आपला परफॉरमन्स बिघडून जातो." तिला या सर्व गोष्टींबद्दल कल्पना दिली. हळूहळू सानिका बोलायला लागली.

या सोशल फोबियाबद्दल कल्पना तर दिली पण आता सानिकाचा प्रश्न होता, "निघायचे कसे यातून डॉक्टर ? मला हा त्रास जास्त अस्वस्थ करतो आहे. गाण्याची इच्छा तर खूप जास्त आहे पण पुन्हा तशी फजिती, फसगत होऊ नये असे भीतीचे विचार मनात येतात आणि मग शेवटी गाणेच नको असे म्हणून मी गाणेच पूर्णपणे टाळते." डॉक्टर म्हणाले, "सानिका, सगळ्यात पहिला उपाय म्हणजे स्वगत! स्वगत म्हणजे काय, तर स्वतःच स्वतःशी साधलेला संवाद! हा संवाद उमेदीचा, आत्मविश्वासाचा ठेवणे. एक प्रकारचे किलिंग इन्स्टिंक्ट ठेवणे, ही या सरावाची पहिली पायरी. अर्थातच हे सरावाने येणार आहे. ' अरे बापरे! आता कसे होईल? काहीच खरे नाही! अशा विचारांची कल्पना मनात न येऊ देता मी धीटपणे माझा परफॉर्मन्स देईन, मी शंभर टक्के परफॉर्मन्स देईन आणि स्वतःला या त्रासातून बाहेर काढेन अशा दृष्टीने स्वतःला बजावायचे. रंगीत तालमी वाढवायच्या.

तोच ड्रेस, तीच वेळ,अगदी घरी माईक हातात घेऊन जास्तीत जास्त सराव करायचा, स्वतः आरशासमोर उभे राहून स्वतःच्या देहबोलीतून प्रकटणाऱ्या भावभावांचे नीट निरीक्षण करायचे. 'लोक मला काय म्हणतील? हसतील का? नावे ठेवतील का?' असे निरर्थक विचार डोक्यात घोंघावणारच. पण दुसऱ्या विचारांची दिशा कुठली हे सुद्धा आपल्याच हातात आहे. मी सगळे काही व्यवस्थित पार पाडणारच अशा विचारांचे वजन त्रास देणाऱ्या विचारांच्या वजनापेक्षा जर जास्त ठेवले आणि तुझ्या सकारात्मक विचारांचे पारडे जड पडले तर नक्कीच तुझ्या त्रासाला वाट मिळेल. या जुन्या विचारांना टक्कर देण्यासाठी तुला जास्तीत जास्त सराव व चांगल्या विचारांची स्वगतांची प्रॅक्टिस करावी लागेल. थोड्या दिवसांसाठी तुला गोळ्या, औषधं देईन. नंतर मग तुझा त्रास पूर्णपणे कमी होईल. 'इंग्लिश -विंग्लिश' सिनेमा आठवतो का तुला? इंग्लिश वाचता सुद्धा न येणारी श्रीदेवी हॉटेलमध्ये रांगेत उभी असते. तिला विचारण्यात येते, ' तुम्हाला काय हवे?' तिला उत्तर देता येत नाही. ती गडबडते, गोंधळते, थांबवून जाते आणि तिला रडू फुटते आणि ती तिथून पळून येते. पण सरावान्ती, तीच श्रीदेवी अस्खलित इंग्लिश बोलते आणि तिचा या भयगंडावर विजय होतो."

सानिकाला तिच्या त्रासाबद्दल कल्पना दिली. तिला खरंच कळून चुकले, की अशा प्रकारचा त्रास सहन करणारी ती एकटीच नसून, स्टेजवर परफॉर्मन्स करणारे कितीतरी डान्सर्स, गायन वादनाचे स्पर्धक, वक्ते .. हे सगळं तर राहू द्या पण शाळा कॉलेजमधील प्रॅक्टिस, एग्झॅमिनेशन, तोंडी परीक्षा हे तर कुणाला चुकलेले नाही. या सगळ्या स्तरांवर कधी ना कधी कोणाची तारांबळ उडणे हे सगळ्यांनी आपल्या आजूबाजूला अनुभवले आहे. एवढेच काय भरलेल्या वर्गात जर शिक्षकांनी उभे करून एखाद्या प्रश्नाचे उत्तर विचारले तरी सगळे काही व्यवस्थित येत असूनही भीतीपोटी तोंडातून उत्तर निघत नाही हे सुद्धा सानिकाने पाहिले आहे. आता तिला स्वतःच्या त्रासाचे स्वरूप अजून चांगल्या प्रकारे कळायला लागले. सानिका डॉक्टरांकडे नियमितपणे सहा आठवडे गेली. तिने डॉक्टरांनी सांगितली तशी स्वगतंसुद्धा तयार केली. सरावसुद्धा अगदी व्यवस्थित चालू ठेवला. नंतर काही त्यांची सानिकाची भेट झाली नाही. तीन-साडेतीन महिने उलटले आणि टीव्ही चॅनलवर अचानकपणे बघितले तर, 'हा चेहरा कुठेतरी ओळखीचा वाटतो' नीट बघितले तर काय! सानिका!! सानिकाने एक परफॉर्मन्स दिला, दुसरा दिला, तिसरा दिला. डॉक्टर तिचे एपिसोड्स पाहत गेले. प्रत्येक एपिसोडमध्ये तिला वन्स मोरची रिक्वेस्ट यायची. सगळ्या परीक्षकांकडून तिचे कौतुक व्हायचे. असे सगळे पाहिले आणि खरंच डॉक्टरांना प्रश्न पडला, की स्टेजवरून हातपाय गार पडलेत, हातापायांना कापरं भरलंय, कानशिलं लाल झालीत म्हणून तशीच पळून येणारी सानिका आज वरचेवर वन्स मोर घेत चालली आहे, त्यांना खूप आनंद वाटला.



रश्मी वडवळकर

खव्य्येगिरी

केरवळ्या

ही एक अत्यंत वेगळी व सहसा कुणाला माहीत नसलेली पाककृती आहे. हा पदार्थ पाठारे प्रभू ह्या न्यातीची खासियत आहे. ह्या पदार्थात ज्या केळयांचा उल्लेख आहे ती आपली नेहमीची केळी नाहीत, तर ही plantains ही केळी आहेत. भारतात मुद्दाम राजेळी केळी आणून हा पदार्थ अगदी आवर्जून केला जातो, पण इथे राजेळी केळी कुठे मिळणार म्हणून plantains नी दुधाची चव ताकावर भागवायची !!

साहित्य :
केळी २
साखर १/२ वाटी
खवलेला ताजा नारळ १ वाटीभर
१ किंवा २ वेलच्या
थोडेसे बेदाणे
चवीपुरतं मीठ
थोडे तांदळाचे पीठ
तूप व तेल एकत्र तळायला



कृती :
१. आपण उकडीच्या मोदकाला करतो तसे साखर घातलेले सारण करून घेणे, त्यात वेलची व बेदाणे घालणे.
२. पिकलेली दोन केळी सालासकट कुकरमध्ये वाफवून घेणे.
३. थोडी गरमच असताना लगेच सोलून मिक्सरमधून मॅश करून घेणे, थंड होईपर्यंत थांबलात तर ती कडक होतील आणि हा पदार्थ फसेल.
४. त्यात थोडेसेच चवीपुरतं मीठ घालून गोळा करून घेणे.
५. जर गोळा होत नसेल, तर गोळा होण्याइतपतच तांदळाचे पीठ घालणे.
६. छोटे गोळे करून त्याची वाटी करायची व त्यात केलेले सारण भरायचे व वाटी व्यवस्थित बंद करायची
७. दोन केळ्यांच्या चार ते पाच केरवळ्या होतील, त्या भरून तयार झाल्या, की त्या तयार केरवळ्या तांदळाच्या पिठात घोळवून घेणे.

८. तेल आणि तूप एकत्र एका पॅन किंवा कढईत गरम करणे. गरम झाल्यावर हलक्या हाताने केरवळ्या सोडणे
९. छान गुलाबी रंगाच्या तळल्या गेल्या, की तेलातून बाहेर काढणे
१०. गणपतीच्या सणासाठी करायच्या असतील तर मोदकाचा पण आकार देऊ शकतो

टीपः plantains नाहीत म्हणून साध्या केळ्याच्या केरवळ्या करायचा प्रयत्न पण करू नका, कारण plantains मध्ये स्टार्च असतो म्हणून त्याची वाटी वळू शकतो, साध्या केळ्यामध्ये स्टार्च नसल्याने त्याची वाटी वळू शकणार नाही.





सौ. ज्ञानदा पवार

'रचना' गणपती विशेषांक चित्रकला स्पर्धा निकाल

अ गट (आठ वर्षाखालील)







अथश्री वांदिले

(परीक्षक : प्राजक्ता जोशी , शीतल देशपांडे)

'रचना' गणपती विशेषांक चित्रकला स्पर्धा निकाल

अ गट (आठ वर्षाखालील)







अविका नाईक

(परीक्षक : प्राजक्ता जोशी , शीतल देशपांडे)

रचना' गणपती विशेषांक चित्रकला स्पर्धा निकाल

ब गट (८ ते १६ वर्षे)







रिद्धीश कुळकर्णी

(परीक्षक : प्राजक्ता जोशी , शीतल देशपांडे)

रचना गणपती विशेषांक चित्रकला स्पर्धा निकाल

बगट (८ ते १६ वर्षे)







स्वरा जोशी

(परीक्षक : प्राजक्ता जोशी , शीतल देशपांडे)

अ गट (आठ वर्षाखालील)





साहस टिवळेकर

अ गट (आठ वर्षाखालील)





स्माही कऱ्हाडे

ब गट (८ ते १६ वर्षे)





अथर्व मोहित वांदिले

ब गट (८ ते १६ वर्षे)





प्रिशा शिंदे

ब गट (८ ते १६ वर्षे)





विदिता खासबाग

ब गट (८ ते १६ वर्षे)





विहान खासबाग





श्रेया गवस

MMC गणेशोत्सव २०२५ निमित्त झालेल्या अथर्वशीर्ष पठण स्पर्धेचा निकाल

ज्युनियर गट (वय ४ ते ९)

प्रथम क्रमांक - विदिता खासबाग
द्वितीय क्रमांक - श्रीया खरे

सिनियर गट (वय १० ते १६)

प्रथम क्रमांक - तन्वी खरे
द्वितीय क्रमांक - विवान सेठ

(परीक्षक : रेखा देवधर, हर्षा थत्ते, माधव गोगावले)

वेदक परिवार



डॉ. चन्द्रा वेदक, नमीता वेदक, प्रियंका वेदक-नॉर, लैला आणि टोरिन

पोळ परिवार



पंढरीची वारी



रवी पोळ, वीरांश पोळ, प्रेषिता पोळ

वांदिले परिवार



अथर्व मोहित वांदिले, अथश्री मोहित वांदिले



मोहित वांदिले, श्वेता मोहित वांदिले

शब्दकोडे उत्तर

क	पा	र	■	भ	र	त	का	म	■	ता	र	का
ण	■	फ़	■	ला	■	ड	■	ज	■	र	■	ज
८ व	न	च	रा	ईं	■	का	■	९ ला	म	ण	दि	वा
■	■	क्क	■	■	■	फ	■	■	■	हा	■	■
१० म	क	र	■	११ उ	घ	ड	झा	१२ प	■	१३ र	ज	१४ क
न	■	■	■	त	■	की	■	र	■	■	■	म
१५ क	ल्या	ण	का	र	क	■	१६ अं	त	रा	ळ	वी	र
व	■	■	■	का	■	१७ औ	■	ब़	■	■	■	बं
१८ ब्रा	व	१९ रा	■	२० ल	ग	ब	ब़	न	■	२१ र	स	द
■	■	म	■	■	■	ड	■	■	■	स	■	■
२२ पा	व	न	खिं	२३ ड	■	थो	■	२४ भा	र	वा	ह	२५ क
व	■	व	■	ग	■	ब	■	क	■	हि	■	ण
२६ स	ला	मी	■	२७ ला	क़	ड	तो	ड	■	२८ नी	र	व

अध्यात्मपीठ


महाराष्ट्र मंडळ शिकागो २०२५
अध्यात्मपीठ
गुरुवार ४ सप्टेंबर २०२५
शिकागो वेळ: रात्री ८ ते ९:३०
गणपती अथर्वशीर्ष
निरूपण भाग २५
निरूपणकार
प. पू. मंगेशदादा फडके
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, ऊर्मिला दामले, अनिरुद्ध दामले, हर्षा थते, नमीता वेदक


महाराष्ट्र मंडळ शिकागो
|| अध्यात्मपीठ ||
सादर करीत आहे प्रवचनमाला
विषय: 'आजच्या भाषेत लोकमान्यांचे गीतारहस्य - भाग ५'
गीता रहस्य
प्रवचनकार: प्राचार्य डॉ. मुकुंद दातार
दिनांक: गुरुवार, २१ ऑगस्ट २०२५
वेळ: रात्री ८:०० - ९:३० (शिकागो स्थानिक वेळ)
भारतीय वेळ: शुक्रवार २२ ऑगस्ट २०२५ सकाळी ६.३० ते ८
आयोजन: माधव गोगवले, रेखा देवधर, शिल्पा देशपांडे, हर्षा थते, अनिरुद्ध दामले, ऊर्मिला दामले, नमिता वेदक

इतिहासमंच


महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच प्रस्तुत करत आहे,
Itihas Manch Session # 157
DRDO's Contribution to India's Defense Preparedness and Future Challenges
Date: Friday, October 3, 2025 ; Time: 8 pm - 10 pm (CT)
BRAHMOS
BRAHMOS
Mr. Anil Datar
Former Director General
ACE, DRDO, India
आयोजन- चेतन रेगे, माधव गोगावले, विशाल नवलकर, वैष्णवी नवलकर, प्राजक्ता जोशी व नमिता वेदक


महाराष्ट्र मंडळ शिकागो
इतिहास मंच प्रस्तुत करत आहे,
Itihas Manch Session # 158
गळाभेट ते गळचेपी- भारत-अमेरिका संबंधात नेमकं चाललंय काय?
(Decoding India-America Bilateral Relations)
दिनांक: शुक्रवार १० ऑक्टोबर २०२५ वेळ : रात्री ८.०० वाजता, (शिकागो वेळ)
श्री. प्रमोद देशपांडे
आयोजन- चेतन रेगे, माधव गोगावले, विशाल नवलकर, वैष्णवी नवलकर, प्राजक्ता जोशी व नमिता वेदक

आम्ही सारे गवय्ये



आरोग्यधाम



भ्रमणगाथा


Maharashtra Mandal Chicago
Bhramangatha Team Presents,
Topic : Hawaii - 'Volcanos National Park',
Big Island and
U.S. Coast Guard Experience
Date :- October 28th ,8 pm CT,
Zoom link will be provided
Speaker - Manjiree Barve
Bhramangatha Team - Nameeta Vedak, Kavita Kulkarni, Manoj Bhat , Ratnangi Malpekar

साहित्यकट्टा


महाराष्ट्र मंडळ शिकागो
बोलका कट्टा सानंद सादर करत आहे,
" पोलीसनामा "
कर्तव्याने पोलीस असणारे, पण कर्तव्य पार पाडत असताना हया सेवेत कार्यरत असलेल्या आपल्या सारख्याच सहकाऱ्यांच्या मनातील भावभावना, अनुभव लेखणीतून उतरवणारे एक संवेदनशील लेखक,अनुवादक श्री.अशोक इंदलकर, यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम
दिनांक - रविवार, २७ जुलै २०२५
वेळ - सकाळी ९.००-११.०० (शिकागो वेळेनुसार)
संध्याकाळी७.३०-०९.३० (भारतीय वेळेनुसार)
यूट्यूब लिंक - https://www.youtube.com/watch?v=dQw4w9WgXcQ
आयोजक- नमीता वेदक, सुजाता महाजन, रश्मी चाफेकर, अश्विनी कुंटे, रश्मी वडवळकर


महाराष्ट्र मंडळ शिकागो
बोलका कट्टा सानंद सादर करत आहे,
गप्पागोष्टी...
सुप्रसिद्ध कवयित्री, बालसाहित्यकार, साहित्य अकादमी पुरस्कार विजेत्या डॉ.संगीता बर्वे यांच्याशी गप्पागोष्टी आणि काव्यवाचनाचा कार्यक्रम ॥
दिनांक: रविवार २८ सप्टेंबर,२०२५
वेळ: सकाळी ९.०० (शिकागो वेळेनुसार)
संध्याकाळी ७.३० (भारतीय वेळेनुसार)
यूट्यूब लिंक: https://www.youtube.com/watch?v=dQw4w9WgXcQ
आयोजक- नमीता वेदक, सुजाता महाजन, रश्मी चाफेकर, अश्विनी कुंटे, रश्मी वडवळकर


धन्यवाद